म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र. ८५४३

IRBK-0108143
IRBK-0108143

ना.ग्रं:२न.ठाणे.

७

दा. क्र. ८७४३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५(८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

1 APR 1971

6 FEB 1975

6 MAR 1975

1975

17 AUG 1976

प्रकाशिका :

सौ. उषा म. कुलकर्णी,
सदभिरुचि प्रकाशन,
७७३ सदाशिव, पुणें २.

आवृत्ति पहिली
जानेवारी १९६०

: मुद्रक :

शं. त्र्यं. आवटे,
इंदिरा प्रिंटिंग प्रेस,
१००५ सदाशिव, पुणें २.

अल्लाउद्दीनच्या जादूच्या दिव्यापेक्षांहि
अतर्क्य आणि अकल्पनीय लीला
करणाऱ्या परमेश्वराच्या चरणीं

IRBK-0108143

IRBK-0108143

# अल्लाउद्दीन आणि जादूचा दिवा

चीन देशांतल्या एका शहरांमध्यें एक गरीब शिंपी रहात होता. कपडे शिवून जे काय पैसे मिळत त्यावर तो आपला आणि आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवीत असे. त्याला एक मुलगा होता. त्याचं नांव अल्लाउद्दीन. तो लहानपणापासून उनाड होता. दिवसभर तो उनाडक्या करीत फिरत असे. शाळेंत पाठविला तर शाळेंत जात नसे. कांहीं काम सांगितलं तर तें करीत नसे. थोडक्यांत म्हणजे तो आळशी आणि कुचकामी होता.

त्याच्या वयाला दहा वर्षं पूर्ण झालीं तरी तो उनाडक्या करीत गांव फिरत असे. त्याच्या बापाला वाटलं कीं, मुलाला आतां आपला धंदा तरी शिकवावा. म्हणून त्यानं अल्लाउद्दिनाला आपल्या दुकानांत शिंपीकाम शिकण्यासाठीं नेलं. परंतु सदैव उनाड मुलांबरोबर धिंगामस्ती करण्याची संवय जडल्यामुळं त्याचं कामाकडे जराहि लक्ष लागेना. बाप बाहेर गेला कीं तो ताबडतोव दुकानांतून पोबारा करीत असे आणि आळींतल्या उनाड भिकारी पोरांबरोबर खेळत असे. नेहमीं तो असाच वागत असे. त्याला कितीहि समजावून सांगितलं तरी तो समजून घेत नसे. त्याला कितीही मार दिला तरी तो ऐकत नसे. त्याच्या आईनं आणि बापानं त्याला नाना तऱ्हेनं समजावलं, प्रेमानं त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला; प्रेमानं सांगून ऐकत नाहीं म्हणून त्याला राग भरून पाहिलं; त्याला उपाशी ठेवलं, मारहाण केली. परंतु त्याच्या वर्तनांत काडीचीहि सुधारणा झाली नाहीं. मुलाचं वागणं पाहून शिंपी अतिशय दुःखी बनला. मुलाच्या दुर्वर्तनामुळं त्याला अन्नपाणीहि गोड लागेना. तो आजारी पडला आणि शेवटीं देवाघरीं गेला.

परंतु अल्लाउद्दिनाला मुळींच दुःख झालं नाहीं. तो आपला पूर्वीं-सारखाच वागत राहिला. मुलगा उनाड आणि कुचकामी आहे, असं जेव्हां

त्याच्या आईनं पाहिलं, तेव्हां तिनं दुकान आणि आंतली सर्व चीज वस्तु विकून टाकली. ती स्वतः सूत कातून आणि इतर कष्ट करून स्वत:साठीं आणि मुलासाठीं मीठभाकरी मिळवूं लागली. परंतु आपल्या आईला त्रास पडतो ह्याची अल्लाउद्दिनाला मुळींच दया आली नाहीं. त्याला त्याबद्दल वाईटही वाटलं नाहीं. उलट बापाच्या कचाटयांतून सुटल्यामुळं तो जास्तच शेफारून गेला. उलट त्याचा आळशीपणा वाढला. त्याला बऱ्याच घाणेरडया संवयीहि जडल्या. जेवणाच्या वेळेशिवाय तो कधीं घरांत सांपडतच नसे. वयाच्या पंधराव्या वर्षापर्यंत त्याचं असंच चाललं होतं. त्याची आई मात्र अतिशय काबाडकष्ट करून त्याचं आणि स्वत:चं पोट भरीत होती.

एके दिवशीं अल्लाउद्दीन आपल्या मोहल्यांत उनाड सवंगडयांबरोबर खेळण्यांत दंग झाला होता. इतक्यांत पाश्चिमात्य देशांतील म्याग्रीन या ठिकाणचा एक दरवेशी त्या ठिकाणीं आला. त्या मुलांकडे पहातां पहातां त्याचं लक्ष अल्लाउद्दिनाकडे गेलं. त्याबरोबर तो त्याच्याकडे अगदीं एकाग्रतेनं पाहूं लागला. बाकीच्या मुलांकडे त्यानं पूर्ण दुर्लक्ष केलं.

हा दरवेशी मोरोक्कोच्या अंतर्भागांतील मूर जातीचा होता. तो जादूगर होता. जादूच्या जोरावर तो कांहींहि करूं शकत असे. शिवाय ज्योतिष शास्त्रांत तो फार प्रवीण होता. अल्लाउद्दिनाकडे अत्यंत बारीक नजरेनं पाहिल्यावर तो स्वत:शींच म्हणाला, ' ज्याच्या शोधासाठीं मी माझा देश सोडून इथं आलों तो हाच मुलगा ! '

ताबडतोब त्यानं एका पोराला हाताशीं धरून बाजूला नेलं आणि अल्लाउद्दिनाकडे बोट दाखवून तो कोण, कुठें रहातो वगैरे माहिती काढून घेतली.

नंतर तो जादूगार अल्लाउद्दिनाजवळ आला आणि त्याला म्हणाला, " मुला तूं शिप्याचा मुलगा ना ? "

" होय. पण माझे बाबा केव्हांच वारले. " अल्लाउद्दीन म्हणाला. तें ऐकतांच त्या जादूगारानं अल्लाउद्दिनाला कडकडून मिठी मारली व त्याला प्रेमानं कवटाळीत तो रडूं लागला. त्यामुळं अल्लाउद्दीन अगदीं बुचकळयांत पडला. त्यानं कांहींसं गोंधळून विचारलं, " महाराज, तुम्हांला एकाएकीं रडायला काय झालं ? आणि तुम्ही माझ्या बाबांना ओळखतां काय ? "

"मी ओळणार नाहीं तर कोण ओळखणार?" जादूगार अत्यंत मृदु आणि भावनाशील आवाजांत म्हणाला, तुझा बाप तो माझा भाऊ! तो माझा अगदीं सख्खा भाऊ! फार वर्षांपूर्वी त्याच्याशीं भांडून मी दुसऱ्या देशांत जाऊन राहिलों. आतां भावाला भेटून जुन्या गोष्टीबद्दल क्षमा मागून राहिलेले दिवस त्याच्याजवळ राहून घालवायचे म्हणून मी इथं आलों. पण तो मेला असं सांगून तूं माझ्या हृदयाला मोठा धक्काच दिलास. परंतु रक्त रक्ताला ओळखतं. मी पाहिल्याबरोबर ओळखलं तूं माझा पुतण्या, माझ्या भावाचा मुलगा म्हणून! ह्या सर्व मुलांतून तुला मी नेमका ओळखून काढला. मी तुझ्या बापाशीं भांडून गेलों तेव्हां तो एकटा होता, त्याचं लग्नहि झालेलं नव्हतं. मग तुझ्या जन्माचा प्रश्नच नव्हता. एवढं असूनहि माझं हृदय नेमकं तुझ्याकडेच ओढ घेऊं लागलं."

—आणि पुन्हा एकदां त्यानं अल्लाउद्दिनाला मिठी मारली. त्याला छातीशीं धरून तो म्हणाला, "आतां तुझ्याशिवाय मला दुसरं कोण आहे! बाकी तूं तुझ्या बापाची जिवंत प्रतिमा आहेस." असं म्हणून त्यानं आपली पिशवी उघडली आणि तिच्यांतून दहा सोन्याच्या मोहरा काढून त्या अल्लाउद्दिनाला देऊन तो म्हणाला, "बेटा, तुझं घर कुठं आहे? आणि तुझी आई, माझी वहिनी कुठं आहे?"

अल्लाउद्दिनानं चटकन त्याला आपल्या घराची वाट दाखविली. पण तो जादूगार म्हणाला, "हे पैसे घे आणि तुझ्या आईला दे. तिला सांग तिचा दीर परदेशांतून आला आहे. उद्यां मी तिला नमस्कार करीन. माझा भाऊ बसत होता ती जागा पाहीन. आणि शेवटीं कबरस्थानांत जाऊन त्याच्या कबरीचं दर्शनहि घेईन."

हे ऐकतांच अल्लाउद्दिन झपाट्यानं आपल्या आईला भेटायला घरीं आला. त्याला त्यावेळीं घरीं आलेला पाहून त्याच्या आईला फारच आश्चर्य वाटलं कारण तो जेवणाच्या वेळेशिवाय कधींच घरीं येत नसे.

तो आईजवळ गेला आणि सोन्याच्या त्या दहा मोहरा आईजवळ देऊन मोठ्या हर्षानं म्हणाला, "आई, तुझ्यासाठीं मी मोठी आनंदाची बातमी आणली आहे!"

"कसली बातमी? आणि ह्या मोहरा कुठून आणल्यास?" आईनं गोंधळून विचारलं.

" माझा काका, इतकीं वर्षं परदेशांत होता , तो आला आहे. त्यानंच मला ह्या मोहरा दिल्या आणि तुला त्यानं नमस्कार सांगितला आहे." अल्लाउद्दीन म्हणाला.

" बेटा, तूं माझी मस्करी करीत नाहींस ना ? " त्याच्या आईनं विचारलं, " अरे हा कोण कुठचा काका ? तुला काका होता कधीं ? "

" आई, तूं कसं म्हणतेस ? त्यानं मला मिठी मारली. हृदयाशीं कवटाळलं. दु:खानं अश्रू ढाळले आणि तुला सांगायला माझ्या बरोबर निरोपही दिला. आणि तूं म्हणतेस मला कोणी काका नाहीं ! " अल्लाउद्दीन जास्तच गोंधळून म्हणाला.

" तुला एक काका होता खरा ! पण तो फार वर्षांपूर्वींच वारला. दुसरा कोणी काका तुला नाहीं. " आई म्हणाली.

आईच्या ह्या सांगण्यानं अल्लाउद्दीन जास्तच बुचकळ्यांत पडला आणि स्वत:शींच आश्चर्य करीत राहिला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो जादूगार अल्लाउद्दिनाला भेटायला म्हणून निघाला. अल्लाउद्दिनाला सोडायला त्याचं मन तयार नव्हतं. त्यामुळं त्याला शोधीत हमरस्त्यानं तो जात असतांना अल्लाउद्दीन नेहमींप्रमाणं उनाड पोरांबरोबर, भटकतांना त्याला दिसला. अल्लाउद्दीन जवळ येतांच जादूगारानं त्याच्या जवळ जाऊन त्याला हृदयाशीं कवटाळलं आणि खिशांतून सोन्याच्या दोन मोहरा काढून त्याला देत तो म्हणाला, " बेटा अल्लाउद्दीन. तुझ्या आईला सांग कीं आज संध्याकाळीं मी तुमच्या घरीं जेवायला येईन, ह्या सोन्याच्या मोहरा घे आणि चांगलं चमचमीत जेवण तयार कर. परंतु घरीं जायच्या अगोदर मला पुन्हा एकदां तुझ्या घराचा रस्ता नीट दाखव पाहूं. "

" हा. नाकासमोरचा रस्ता सरळ माझ्या घराकडे जातो !" अल्लाद्दिन हात पुढं करून म्हणाला.

जादूगारानं तो रस्ता नीट लक्षांत ठेवला आणि अल्लाउद्दिनाला सोडून तो आपल्या वाटेनं निघून गेला.

जादूगार निघून गेल्यावर अल्लाउद्दीन झपाटच्यानं घरीं गेला आणि आईकडे पैसे देऊन म्हणाला, " आई, माझा काका आज संध्याकाळीं इथं

जेवायला येणार आहे. त्यानंच हे पैसे दिले आहेत आणि चांगलं चमचमीत जेवण तयार करायला सांगितलं आहे."

मुलाचं बोलणं ऐकून ती सरळ बाजारांत गेली आणि बाजार करून ती आपल्या घरीं परतली. शेजाऱ्याकडून तिनं भांडींकुंडीं आणलीं आणि जेवण तयार केलं. जेवण तयार झाल्यावर ती अल्लाउद्दिनाला म्हणाली, "बेटा जेवण तर तयार झालं. तुझ्या काकाला कदाचित् आपल्या घराचा पत्ता सांपडणार नाहीं. तूं पुढं जाऊन रस्त्यावर उभा रहा."

आईची आज्ञा ऐकतांच अल्लाउद्दीन जायला निघाला. इतक्यांत घराल्या पुढील दरवाजावर थाप ऐकूं आली. अल्लाउद्दिनानं चटकन् पुढं होऊन दरवाजा उघडला.

दारांत तो जादूगार आणि त्याच्या मागं एक छोकरा मद्य व सुकामेवा घेऊन उभा होता. जादूगार आंत आला. त्या छोकऱ्यानं आपल्या हातांतल्या जिनसा घरांत ठेवल्या आणि तो आपल्या मार्गाला लागला.

जादूगारानं आंत येतांच आपल्या भावजयीला नमस्कार केला आणि तो अश्रू ढाळूं लागला. बराच वेळ अश्रू ढाळल्यावर मग तो तिला म्हणाला-" जिथं माझा भाऊ बसत असे ती जागा कोणती ? "

तिनं जागा दाखवितांच तो त्या ठिकाणीं गेला. त्यानं आपल्या पायांतले जोडे काढून बाजूला ठेवले आणि त्या ठिकाणीं बसून त्यानं प्रार्थना म्हटली. प्रार्थना संपतांच तो त्या जागेवर गडबडा लोळला आणि रडत रडत म्हणाला, " तूं मला भेटला नाहींस म्हणून किती दुःख होत आहे म्हणून सांगूं ? किती दुर्दैवी मी ! मी तुला मुकलों. तूं माझा जीव कीं प्राण होतास. कसा रे तूं मला टाकून गेलास ? तुझ्याऐवजीं मला देवानं न्यायला हवं होतं !" असं बोलून तो आक्रोश करूं लागला आणि शेवटीं दुःखानं तिथंच पडून राहिला.

तें पाहून अल्लाउद्दिनाच्या आईची खात्री झाली कीं तो अल्लाउद्दिनाचा काकाचा आहे. तिनं त्याच्याजवळ जाऊन त्याला उठविलं व ती म्हणाली, " आतां दुःख करून काय उपयोग ? जें व्हायचं होतं तें होऊन गेलं. आतां कितीहि दुःख केलं म्हणून ते थोडेंच परत येणार आहेत ?"

मग तो उठून बसला आणि तीं दोघं गप्पा मारूं लागलों. तो म्हणाला, " वहिनी, तूं मला यापूर्वीं कधींहि पाहिलं नाहींस किंवा माझ्या-बद्दल कांहीं ऐकलं नाहींस. तुला आश्चर्य वाटणं साहजिक आहे. त्याचं असं झालं. चाळीस वर्षांपूर्वी मी हें शहर सोडलं आणि माझ्या जन्मभूमीपासून दूर गेलों. सर्व हिंदभर आणि सिंधभर मी फिरलों. नंतर इजिप्तमध्यें गेलों. तेथील सर्वांत चांगल्या अशा शहरांत बरींच वर्षं मी राहिलों. तें शहर म्हणजे जगांतलं एक आश्चर्य आहे. नंतर मी मावळत्या सूर्याच्या प्रदेशांत गेलों आणि तिथं मी तीस वर्षं राहिलों. एके दिवशीं मी एकटाच बसलों असतां माझ्या डोक्यांत माझ्या देशाबद्दल विचार घोळूं लागले आणि एकाएकीं मला माझ्या भावाची आठवण झाली. त्याला डोळे भरून पहाण्यासाठीं माझा जीव तळमळूं लागला. माझ्या मनानं त्याचा ध्यासच घेतला. त्यामुळं मी दिवसेंदिवस खंगत चाललों. माझ्या डोळ्यांतून सारखे अश्रू वाहूं लागले. अन्नपाणीहि मला गोड लागेना. माझं मन सारखं घराकडे धांव घेऊं लागलं. शेवटीं भावाला भेटण्यासाठीं मी जन्मभूमींत जाण्याचा निश्चय केला. माझं मन मला म्हणूं लागलं, ' तूं किती वर्षं तुझ्या जन्मस्थानापासून आणि तुझ्या घरापासून अरबांसारखा दूर दूर भटकत राहशील ? अरे तुला कांहीं जास्त भाऊ नाहींत. फक्त एकच भाऊ आहे तुला. तेव्हां ऊठ आणि त्याला भेटायला नीघ. मरण यायच्या अगोदर त्याला एकदां कडकडून भेट. कारण जगांत केव्हां काय घडामोडी घडतील याचा नेम नाहीं. तुझ्या भावाची आणि तुझी भेट झाली नाहीं तर तुला एवढी मोठी संपत्ती लाभली आहे तिचा काय उपयोग ? कदाचित् तुझा भाऊ गरीब स्थितींत असेल आणि तुझ्या मदतीची त्याला फारच आवश्यकता असेल. तशा स्थितींत तो मेला तर ती फारच वाईट गोष्ट होईल. ' तेव्हां मी प्रवासाला लागणारे जिन्नस बरोबर घेतले आणि प्रवासाला निघालों. प्रवास करीत करीत आणि नाना संकटं सोसत देवाच्या कृपेनं सुखरूप या शहरांत आलों. इथं आल्यावर भावाला शोधण्या-साठीं सारं शहर धुंडाळलं. पण मला कुणीच कांहीं बातमी सांगेना. अशा स्थितींत भटकत असतांना काल हा मुलगा इतर मुलांबरोबर खेळतांना मला दिसला. आणि त्याला पाहिल्याबरोबर माझं हृदय त्याच्याकडे ओढ घेऊं लागलं. रक्ताला रक्त मिळतं म्हणतात तेंच खरं ! माझ्या अंतरात्म्यानं

मला सांगितलं कीं माझ्या भावाचा मुलगा, माझा पुतण्या तो हाच ! त्याला पाहिल्याबरोबर मला फार फार आनंद झाला. पण जेव्हां त्यानं मला माझ्या भावाच्या मृत्यूबद्दल सांगितलं तेव्हां मला मोठा धक्काच बसला. निराशेनं माझं हृदय भरून गेलं. मला फार फार दुःख झालं. वास्तविक मी बेशुद्ध होऊन पडायचा ! माझ्या पुतण्यानं तुला सर्व सांगितलं असेलच. मी माझं दुःख बाजूला सारलं आणि मनाशी म्हणालों, ' माझा भाऊ मेलेला नाहीं. मुलाच्या रूपानं त्यानं आपली प्रतिमा मागं ठेवलेली आहे. '

त्याचे हे शब्द त्याच्या भावजयीनं ऐकले तेव्हां तिला त्याचं म्हणणं पटून फार दुःख झालं. जुन्या आठवणी पुन्हां जाग्या झाल्या आणि ती रडूं लागली.

आपलं नाटक बरोबर वठत चाललेलं पाहून जादूगार मनांतल्या मनांत खूष फाला. ती रडत असलेली पाहून त्याची खात्री झाली कीं आपलं ढोंग पचलं. तो अल्लाउद्दिनाकडे वळला. तसं करण्यांत त्याच्या मनांत निराळाच उद्देश होता. एक म्हणजे तिच्या पतीबद्दल तिला वाटत असलेलं दुःख हलकं करावं आणि दुसरं अल्लाउद्दिनाच्या बाबतींत आपलं कार्य सिद्धीस न्यावं. ह्या उद्देशानं त्यानं अल्लाउद्दिनाला विचारलं, " काय रे अल्लाउद्दिन, आतां-पर्यंत तू काय काय शिकलास ? तूं कोणता धंदा करतोस ? आपलं स्वतःचं आणि आईचं पोट भरूं शकेल अशी कोणती कला तूं आत्मसात् केली आहेस ? "

हा प्रश्न ऐकतांच अल्लाउद्दिनाला फारच शरम वाटली. त्यानं शरमेनं मान खालीं घातली.

पण त्याची आई तितक्यांत म्हणाली, " काय सांगूं भावजी तुम्हांला ? एवढा मोठा झाला पण त्याला कांहींहि येत नाहीं. एवढा मठ्ठ मुलगा मी कुठंहि पाहिला नाहीं. दिवसभर आळींतल्या उनाड आणि द्वाड पोरांबरोबर खेळत व धिंगामस्ती करीत असतो. सारा दिवस उनाडक्या करीत वणवण भटकत असतो. त्याच्या बापानं मरतांना मागं कांहीं ठेवलं नाहीं. पण ह्याला त्याबद्दल कांहींच काळजी वाटत नाहीं. मी आपली दिवसरात्र सारखी खपून, रेशीम पिंजून, भांडीधुणीं करून दोघांच्या पोटापुरतं मिळवितें. हा पोरगा

फक्त जेवणापुरताच काय तो घरांत येतो. अशी ही माझी स्थिति आहे. आतां माझा जीव अगदीं रंजीस आला आहे. मनांत येतं कीं पोराला घराचा दरवाजा कायमचा बंद करावा म्हणजे तरी तो पोटापाण्यासाठीं कांहीं उद्योगधंदा पाहूं लागेल. आतां कांहीं काम करण्याची ताकद नाहीं माझ्या अंगांत ! आतां मी म्हतारी झालें आहें. अशा तऱ्हेचीं कष्टाचीं कामं करणं माझ्या शक्तीबाहेरचं आहे. खरं म्हणजे ह्या वयांत त्यानं मला पोसायचं ! पण दुर्दैवानं मलाच त्याला पोसावं लागतं. अजून काय काय हाल भोगायचे नशीबांत आहेत परमेश्वरालाच माहीत ! ''

तें ऐकून जादूगारानं तिच्याकडे सहानुभूतीनं पाहिलं आणि ती अल्लाउद्दिनाकडे वळून मोठ्या कळकळीनं म्हणाला, '' बेटा अल्लाउद्दीन, तुझी आई सांगते तें खरं का ? तू अशा वाईट तऱ्हेनं कां वागतोस ? अरे, तुझ्यासारख्या उमद्या तरुणानं अशा उनाडक्या करीत फिरावं हें चांगलं का ? तुलाच आतां हें सारं कळलं पाहिजे. तूं कांहीं मूर्ख नाहींस. तुला अक्कल आहे. तूं चांगल्या सज्जन माणसाचा मुलगा आहेस. तूं मनांत आणशील तर कांहींहि करूं शकशील. तुझ्या आईनं या वयांत काबाडकष्ट करून तुझं पोट भरावं आणि तूं दिवसभर उनाडक्या करीत फिरावं हें तुला शोभतं का ? ही मोठी लाजिरवाणी गोष्ट आहे. खरं म्हणजे तूं कसलातरी उद्योगधंदा करून आपल्या आईचं पोट भरायला पाहिजेस. तिला आतां ह्या वयांत घरबसल्या सुख देणं हें तुझं मुख्य कर्तव्य आहे. बेटा अल्लाउद्दीन, जरा आपल्या परिस्थितीचा विचार कर. तुला कोणताहि धंदा करणं अशक्य नाहीं. आपल्या या शहरांत वेगवेगळ्या धंद्यांचं शिक्षण देणारे पुष्कळ शिक्षक आहेत. अशी सोय दुसऱ्या कोणत्याहि देशांत नाहीं. तुला आवडेल आणि ज्यामुळं स्वतःचं आणि आपल्या आईचं पोट भरतां येईल असा धंदा निवड. तुला तुझ्या बापाचा धंदा पसंत नसेल तर तुझ्या आवडीप्रमाणं दुसरा कोणताहि धंदा पसंत कर. मी तुला वाटेल ती मदत करीन ! ''

परंतु अल्लाउद्दीन कांहीं न बोलतां ठोंब्यासारखा स्वस्थच उभा राहिलेला त्यानं पाहिला. तेव्हां त्याची खात्री होऊन चुकली कीं त्या पोराला भटकण्याखेरीज दुसरा कोणताच धंदा प्रिय नाहीं. तो जादूगार जरा विचार करून म्हणाला, '' बेटा अल्लाउद्दीन, मी सांगितल्याप्रमाणं करणं तुला

कठीण वाटत असेल तर मला तसं सांग. तुला कामधंदा शिकण्याची हौस नसेल तर मी तुला उंची मालाचं एक दुकान काढून देतों. म्हणजे तूं या शहरामध्यें एक प्रसिद्ध व्यापारी म्हणून गणला जाशील. देणं, घेणं, खरेदी करणं या बाबतींत तुझं नांव सर्वांच्या तोंडीं होईल!"

त्याचं हें बोलणं ऐकून अल्लाउद्दिनाला फार फार आनंद झाला. आपण ख्वाजा व्यापारी व एकदम प्रसिद्ध गृहस्थ बनणार ह्या कल्पनेनं त्याला मोठा हर्ष झाला. कारण व्यापारी लोक मोठा भपकेबाज पोषाख करतात आणि मोठ्या इतमामानं राहून मौजमजा करतात हें त्याला माहीत होतं. त्यांच्या प्रमाणंच आपल्यालाहि वागायला मिळणार ह्या कल्पनेनं त्याचा चेहरा उजळून निघाला. परंतु जादूगाराकडे पहाण्याचा त्याला धीर झाला नाहीं. मान खालीं घालून जरासा हंसत तो म्हणाला, "मला हा बेत पसंत आहे."

जादूगारानं अल्लाउद्दिनाकडे पाहिलं आणि त्याचा हंसरा आणि आनंदी चेहरा पहातांच त्याची खात्री झाली कीं पोराला फार आनंद झाला आहे; आणि व्यापारी होण्याचा बेत त्याला अगदीं पसंत आहे.

तो त्याला म्हणाल, "बेटा, दुकान उघडण्यास आणि व्यापारी बनण्यास तूं मोठा उत्सुक दिसतोस. पण त्यासाठीं तूं लायक आहेस हें सिद्ध केलं पाहिजेस. उद्यां मी तुला बाजारांत घेऊन जाईन आणि व्यापारी वापरतात तसले कपडे घेऊन देईन. दुसरं म्हणजे दुकानाबद्दलहि मी बोलल्याप्रमाणें करीन."

अल्लाउद्दिनाच्या आईला त्याचं बोलणं ऐकून आनंद झाला. सुरवातीला तिला तो आपला दीर आहे याबद्दल संशय आला होता. परंतु आपल्या मुलाला त्यानं दुकान थाटून देण्याचं वचन दिलेलं ऐकून तिचा तो संशय पार नाहींसा झाला. त्याच्याबद्दल विनाकारण संशय घेतल्याबद्दल तिच्या मनाला पश्चात्ताप वाटूं लागला. तिची आतां अगदीं खात्री पटली कीं तो आपल्या नवऱ्याचा भाऊच आहे. दुसरा कोणी. परका माणूस असता तर तिच्या मुलाच्या बाबतींत एवढं असं करता ना. ती आपल्या मुलाला उपदेश करूं लागली, "बेटा अल्लाउद्दीन, आतां तूं आपल्या डोक्यांतून मूर्खपणा काढून टाक. चांगल्या अक्कलवान माणसारखा वागून तूं लायक माणूस आहेस हें सिद्ध कर. तुझ्या काकांना तूं शहाणा आणि हुशार आहेस हें पटवून दे.

उनाडक्या करण्यांत आतांपर्यंत आयुष्य फुकट घालविलंस तें आतां चांगल्या वर्तनानं भरून काढ. ह्यापुढं तुझ्या काकाच्या आज्ञेप्रमाणं वागत जा. त्यांतच तुझं भलं होईल !"

मुलाला उपदेश केल्यावर तिनं जमिनीवर चादर पसरली. नंतर तिनं जेवण आणून ठेवलं आणि मग तीं तिघं एकत्र बसून जेवलीं. जेवण उरकल्यावर जादूगार अल्लाउद्दिनाबरोबर व्यापाराबाबत बराच वेळ बोलत राहिला. अल्लाउद्दीनहि त्यांत अगदीं रमून गेला. झोपेची वेळ झाली असूनहि त्याची झोप पार उडाली. शेवटीं बरीच रात्र झाल्यावर जादूगार उठून म्हणाला, "आतां मी जातों. उद्या सकाळीं येऊन मी तुला बाजारांत नेऊन चांगले भपकेदार कपडे करून देईन !"

असं आश्वासन देऊन तो निघून गेला.

सकाळ होते न होते तोंच जादूगारानं दारावर थाप मारली. अल्लाउद्दिनाच्या आईनं दार उघडलं. दारांत दिराला पाहून तिला आनंद झाला. तिनं त्याला आंत यायला सांगितलं. पण तो म्हणाला, "आंता मी आंत येत नाहीं. लवकर बाजारांत गेलं पाहिजे. अल्लाउद्दिनाला कपडे घ्यायचे आहेत. शिवाय मोठमोठ्या व्यापाऱ्यांना भेटून त्यांच्याशीं त्याची ओळख करून दिली पाहिजे. इथंच उशीर व्हायला नको. आतां अल्लाउद्दिला पाठव बघूं माझ्याबरोबर !"

तिनं लगेच अल्लाउद्दिनाला त्याच्याबरोबर पाठविलं. जादूगारानं त्याचा हात धरला आणि दोघे बाजारांत जायवला निघाले. बाजारांत आल्यावर जादूगारानं अल्लाउदिनाला एका तयार कपड्यांच्या दुकानांत नेलं आणि दुकानदाराला अतिमौल्यवान आणि भपकेदार असे कपडे आणायला सांगितलं. व्यापाऱ्यानं सुंदर सुंदर तयार कपडे आणून त्याच्यापुढं ठेवले. तेव्हां जादूगार अल्लाउद्दिनाला म्हणाला, "बेटा, ह्यांतले तुला आवडतील ते कपडे पसंत कर."

काकानं आपल्यालाच कपडे पसंत करण्यास सांगितलेलं पाहून अल्लाउद्दिनाला फार आनंद झाला. त्यानं त्या सर्व कपड्यांतून स्वतःला पसंत असे कपडे निवडले. जादूगारानं ते व्यापाऱ्याकडून बांधून घेतले व त्याचे पैसे चुकते केले. नंतर तो अल्लाउद्दिनाला घेऊन एका स्नानगृहांत गेला. तिथं

दोघांनींहि आंघोळी केल्या. आंघोळ झाल्यावर ते थंडगार आणि गोड सरबत प्याले. मग अल्लाउद्दिनानं मोठ्या आनंदानं ते नवीन कपडे आपल्या अंगांत चढवले व त्या कपड्यांबद्दल काकाचे मोठ्या तत्परतेनं आभार मानले.

नंतर तो मग्राबी जादूगार अल्लाउद्दिनाला घेऊन व्यापारी पेठेंत गेला. तिथं त्यानं अल्लाउद्दिनाला व्यापाराची खरेदी विक्री कशी होते ती दाखविली व म्हणाला, " हें पहा अल्लाउद्दीन, आतां व्यापार हाच तुझा धंदा होणार आहे. तेव्हां त्यांतील सर्व खांचाखोचा तुला माहीत झाल्या पाहिजेत. येथील सर्व व्यापारी लोक तुझ्या परिचयाचे झाले पाहिजेत. त्यांच्या चालीरीती, त्यांचं वागणं, ते गिऱ्हाईकाशीं कसं बोलतात चालतात हें सारं तुला समजलं पाहिजे. तेव्हां अगदीं नीट लक्ष देऊन निरीक्षण कर. "

बाजारपेठ दाखवून झाल्यावर ते संबंध शहरभर फिरले. नंतर ते दोघे एका भटारखान्यांत नेले. तिथं चांदीच्या थाळींत त्यांनीं पोटभर भोजन केलं. भरपूर जेवण झाल्यावर मग ते पुढच्या मार्गाला लागले. जादूगारानं त्याला मोठ मोठे बंगले दाखवले. सुलतानाच्या राजवाड्यांत नेऊन त्याला तेथलीं भव्य भव्य सजवलेलीं दालनं दाखवलीं. शेवटीं तो जिथं उतरला होता त्या खानाकडे ते दोघेजण गेले. तिथं आणखीहि बरेच दूरदूरचे व्यापारी उतरले होते. त्यांना त्या जादूगारानं आपल्या जवळ बोलावलं. नंतर ते सारे जेवावयास बसले. जेवतांना जादूगारानं त्या व्यापाऱ्यांशीं अल्लाउद्दिनाची ओळख करून दिली आणि त्यांना तो आपला पुतण्या असल्याचं सांगितलं. त्यांचं खाणंपिणं उरकेपर्यंत बरीच रात्र झाली. नंतर त्या जादूगारानं अल्लाउद्दिनाला त्याच्या आईकडे पोंचतं केलं.

तिनं जेव्हां अल्लाउद्दिनाला त्या भपकेदार आणि रुबाबदार कपड्यांत पाहिलं तेव्हां तिला तो कुणीतरी मोठा व्यापारीच वाटला. त्याला पाहून तिला आनंद झाला. आनंदानं तिचं हृदय भरून आलं. क्षणभर ती देहभानही विसरली. तिनं त्या जादूगाराचे, आपल्या खोट्या दिराचे, आभार मानले व ती म्हणाली, " मी कांहीं फार बोलत नाहीं, पण इतकंच सांगतें की माझ्या मुलाला चांगल्या मार्गाला लावल्याबद्दल मी तुमची सदैव ऋणी राहीन ! "

" भाबी हें काय बोलणं झालं ?" जादूगार चटकन म्हणाला. " मी

कांहीं कुणावर कृपा करीत नाहीं. अल्लाउद्दिन मला मुलाच्या ठिकाणीं आहे. आतां मीच त्याला बापाच्या ठिकाणीं नाहीं का? त्याला योग्य मार्गाला लावणं हें माझं कर्तव्यच आहे. तेव्हां तूं कांहीं एक मनांत आणूं नकोस."

"परमेश्वर तुम्हांला दीर्घायू करो!" ती म्हणाली, "म्हणजे तुमच्या कृपेची पखरण माझ्या मुलाला मिळेल आणि तुमच्या हातांखाली त्याची भरभराट होत जाईल!"

"आतां अल्लाउद्दीन अक्कलवान झाला आहे. तो सन्माननीय बापाचा मुलगा आहे." जादूगार म्हणाला. "तो आपल्या बापाच्या पावलावर पाऊल टाकून तुझ्या डोळ्यांचं पारणं फेडल्याशिवाय रहाणार नाहीं! परंतु मला वाईट वाटतं कीं उद्यां शुक्रवार असल्यामुळं दुकान खोलायला सवड मिळणार नाहीं. शुक्रवारीं सर्व व्यापारी दुकानं बंद करून बागेंत फिरायला जातात आणि थोडीफार मौजमजा करतात. तेव्हां देवाच्या मनांत असेल तर आपण रविवारीं दुकान उघडूं. उद्यां सकाळीं मी येईन आणि अल्लाउद्दिनाला फिरायला घेऊन जाईन. कदाचित् शहराबाहेरचा भाग त्यानं पाहिला नसेल. तेथें सुद्धां व्यापारी लोकांची गाठ पडेल व मुलाखत होईल. अल्लाउद्दिनाच्या व्यापारध्येयाला तें योग्य आहे. आतां मी जातों." असं म्हणून मग्राबी जादूगार निघून गेला आणि आपल्या निर्वासस्थानीं जाऊन आराम करून झोंपला.

इकडे अल्लाउद्दिनाला रात्रभर झोप आली नाही. अगदीं सकाळींच उठून स्नान उरकून आणि नवा पोषाख अंगावर चढवून तो आपल्या काकांची वाट पहात बसला. इतक्यांत जादूगारानं दारावर थाप मारली. अल्लाउद्दिनानं दार उघडलं तेव्हां दारांत आपल्या काकाला पाहून त्याला फार आनंद झाला.

जादूगारानं त्याला प्रेमानं आपल्या हृदयाशीं कवटाळलं आणि नंतर त्याचा हात धरला व ते दोघे घराबाहेर पडले. रस्त्यावर आल्यावर जादूगार म्हणाला, "बेटा अल्लाउद्दीन, आज मी तुला जन्मांत कधीं पाहिलं नसशील असं कांहीं तरी दाखविणार आहे!"

असं म्हणून त्यानं त्याला मोठ्या गमतीच्या गोष्टी सांगून हंसविलं. त्याच्या गोष्टी ऐकण्यांत कसा वेळ गेला आणि आपण बोलतां बोलतां

केव्हां शहराबाहेर आलों हें सुद्धां अल्लाउद्दीनाला कळलं नाहीं. इतका तो त्याच्या गप्पांत रंगून गेला होता. शहराच्या बाहेर येतांच जादूगारानं त्याला बागबगीचे दाखविले. मौजमजेचीं ठिकाणं दाखविलीं आणि मोठ-मोठ्या सुंदर इमारती दाखविल्या. त्याला घेऊन तो एका सुंदर उद्याना-जवळच्या राजवाड्यापाशीं आला. त्याला तें उद्यान आणि राजवाडा दाखवून जादूगारानं विचारलं, "काय रे अल्लाउद्दीन, हें आवडलं कीं नाहीं तुला?"

कधीं जन्मांत न पाहिलेल्या गोष्टी पाहिल्यामुळं अल्लाउद्दीन आनंदानं अगदीं वेहोप झाला. त्याला आपण जागे आहोंत कीं स्वप्नांत आहोंत हेंच समजत नव्हतं.

अशा तऱ्हेनं त्या जादूगारानं त्याला निरनिराळ्या प्रेक्षणीय जागा दाखविण्यांत बराच वेळ घालविला. बरंच फिरून दमल्यावर शेवटीं मग ते एका मोठ्या बागेपाशीं आले. अल्लाउद्दीन अगदीं डोळे विस्फारून त्या बागेकडे पहात राहिला.

फुलांच्या ताटव्यांतून लहान लहान झरे वहात होते. सोन्यासारख्या पिवळ्या सिंहाच्या तोंडांतून पाण्याचे फवारे उडत होते. पक्षी मधुर किल-बिलाट करीत स्वच्छंदपणं विहार करीत होते. फुलांचा मोहक सुवास वाता-वरणांत दरवळलेला होता. हें दृश्य पाहून अल्लाउद्दिनाच्या डोळ्यांचं पारणं फिटलं त्याचं हृदय आनंदित झालं. आणि साऱ्या श्रमांचा त्याला विसर पडला.

त्या बागेंतल्या एका लहानशा सरोवराच्या काठीं ते दोघे विश्रांती घेण्यासाठीं बसले. अल्लाउद्दीन अगदीं खूष होऊन गेला. त्या जादूगाराला खरा काकाच समजून तो त्याची थट्टामस्करी करूं लागला. अशा तऱ्हेनं कांहीं वेळ गेल्यावर जादूगारानं आपल्या जवळच्या पिशवींतून सुकीं फळं, सुका मेवा वगैरे जिन्नस बाहेर काढले आणि ते अल्लाउद्दिनापुढं ठेऊन तो म्हणाला. "बेटा, तुला बरीच भूक लागलेली असेल, नाहीं? तेव्हां आतां ह्यांतलं पाहिजे तेवढं खा, म्हणजे तुला जरा बरं वाटेल."

काकाचं बोलणं ऐकून अल्लाउद्दिनाचा आनंद द्विगुणित झाला. त्यानं त्यांतलीं सुकीं फळं आणि सुका मेवा पोटभर खाल्ला. जादूगारानंहि त्यांतले थोडे जिन्नस खाल्ले. नंतर त्यांनीं थोडी विश्रांती घेतली. गप्पागोष्टींत

आणि थट्टामस्करींत जरा वेळ घालविला. पुन्हां ताजेतवाने झाल्यावर जादूगार त्याला म्हणाला, " अल्लाउद्दीन, आतां आपण उठूं या. कारण आतां आपल्याला आणखी एका ठिकाणीं जायचं आहे. "

त्याबरोबर अल्लालद्दीन उठून उभा राहिला. मग ते दोघे चालूं लागले व एका बागेंतून दुसऱ्या बागेंत असं करीत करीत ते एका उंच आणि उजाड अशा टेकडीच्या पायथ्याशीं आले. अल्लाउद्दीन आपल्या संबंध आयुष्यांत कधीं इतका चालला नव्हता. नगराच्या वेशीबाहेरहि तो कधीं पडला नव्हता. तेव्हां सहाजिकच तो मग्राबी जादूगाराला म्हणाला, " काका, आपण कुठं चाललों आहोंत ? आपण तर एकूण एक बागा मागं टाकल्या. आतां आपण या उजाड डोंगराळ प्रदेशांत आलों आहोंत. तेव्हां जर आपल्याला आणखी पुढं जायचं असेल तर मला चालण्याची ताकद नाहीं माझे पाय अगदीं भरून आले आहेत. कोणत्या क्षणाला मी घेरी येऊन पडेन हें सांगतां येत नाहीं. शिवाय आतां पुढं तर बाग वगैरे दिसत नाहीं. तेव्हां आपण मागं फिरून शहरांत जाऊं या "

" अजून कांहीं संपलेलं नाहीं ! " जादूगार म्हणाला. " आपण जातों आहोत त्या ठिकाणीं असे कांहीं बागबगीचे आहेत कीं आतां तूं जे पाहिले आहेस ते त्यांच्यापुढं कांहींच नाहींत . ह्या बगीच्यांशीं त्यांची तुलनाच करतां येणार नाहीं असे सुंदर आहेत ते. तेव्हां तूं इतक्यांतच धैर्य सोडूं नकोस. शिवाय तू आतां तरणाबांड मुलगा आहेस. तूं कांहीं लेचंपेचं पोर नाहींस इतक्यांत दमून हातपाय गाळायला ! आतांच जर असं करायला लागलास तर मग पुढं काय करणार ? "

असं म्हणून त्यानं त्याला बऱ्याच हितोपदेशाच्या गोष्टी सांगितल्या. चमत्कारिक गोष्टी सांगून त्याचं मन आकर्षित केलं. त्याच्या मनांत उत्साह निर्माण केला आणि त्याला आपणाबरोबर चालायला लावलं. शेवटीं ज्या कामासाठीं म्हणून मावळत्या राष्ट्रांतून तो चीनपर्यंत आला होता तिथं तो अल्लाउद्दिनासह आला. तिथं पोंहचल्यावर तो अल्लाउद्दिनाला म्हणाला, " बेटा, आतां तूं थोडा वेळ विश्रांति घे. जिथं यायला पाहिजे होतं तिथं आपण आलों आहोंत. आतां मी तुला अशा कांहीं चमत्कारिक गोष्टी दाखवीन कीं त्या पृथ्वीवर कुणींच कधीं पाहिलेल्या नाहींत. ज्या गोष्टी तूं

आतां पहाणार आहेस त्याच्यावर अजून कुणाचीहि दृष्टी पडलेली नाहीं. तेव्हां आतां थोडी विश्रांति घे. आणि मग थोडे लाकडाचे तुकडे व काटक्या गोळा कर. आपण विस्तव पेटवूं व त्यानंतर तुला मी या जगापलिकडीचे चमत्कार दाखवीन. ''

जेव्हां अल्लाउद्दिनानं हे शब्द ऐकले तेव्हां त्याला आपला काका काय करतो हें पहाण्याची साहजिकच उत्सुकता लागली. त्याची तहान, भूक, थकवा सारं कांहीं नाहींसं झालं. तो चटकन् उठला आणि झटपट लाकडाचे तुकडे आणि सुक्या काटक्या गोळा करूं लागला. जादूगारानं त्याला पुरे कर म्हणून सांगितलं तेव्हांच त्यानं तें काम आटोपलं. नंतर जादूगारानं आपल्या खिशांतून पेटी काढून ती उघडली आणि तिच्यांतून सुगंधी द्रव्यं बाहेर काढलीं. नंतर त्यानं कांहींतरी मंत्रतंत्र म्हटले. ते कुणालाच कळण्यासारखे नव्हते. इतक्यांत आकाश काळंकुट्ट झालं. मेघांचा गडगडाट झाला. धरणी कंप पावून दुभंगली.

अल्लाउद्दीन हें पाहून इतका घाबरला कीं त्यानं तेथून पळून जाण्याचा बेत केला. परंतु तें जादूगाराच्या लक्षांत येतांच त्याला त्याचा अतिशय संताप आला. कारण त्या पोराशिवाय त्याचा बेत सफल होणार नव्हता. गुप्त खजिना अल्लाउद्दिनाच्या मदतीशिवाय उघडणं शक्य नव्हतं. तेव्हां अल्लाउद्दिनाचा पळून जाण्याचा बेत पाहून त्याचा संताप अनावर झाला व त्यानं त्याला इतक्या जोरानं थप्पड दिली कीं त्याचे दांत घशांत गेले आणि तो मूर्छित होऊन जमिनीवर पडला.

थोड्याच वेळांत जादूगाराच्या जादूमुळं तो शुद्धीवर आला आणि रडत रडत म्हणाला, '' काका, मी काय गुन्हा केला म्हणून तुम्ही इतक्या जोरानं मला मारलं ? ''

त्याबरोबर मग्राबी जादूगार त्याला प्रेमानं चुचकारीत म्हणाला, '' बेटा, तुला लायक मनुष्य बनविण्याचा माझा उद्देश आहे. तेव्हां आतां उगाच बोलण्यांत जास्त वेळ घालवूं नकोस. मी तुझा काका आहें नि तुला तुझ्या बापाच्या ठिकाणीं आहें. तेव्हां मी जें जें सांगेन तें तें सारं निमूटपणं ऐक. थोड्याच वेळांत तुझा सारा शीण नाहींसा होईल आणि मी तुला ज्या चमत्कारिक गोष्टी दाखविणार होतों त्या तुला दिसतील. ''

इतक्यांत जिथं भूमि दुभंगली गेली होती तिथं एक शिळा दिसू लागली. तिच्यांत एक तांब्याची कडी बसविली होती. त्या जादूगारानं आंकड्याचा एक चौकोण मांडला व तो अल्लाउद्दिनाकडे वळून म्हणाला, " आतां मी जें सांगतों तें तूं ऐकलं पाहिजेस. त्यामुळं तूं कोणत्याहि राजापेक्षां श्रीमंत बनशील. कारण याच्याखालीं जो खजिना आहे तो तुझ्यासाठींच आहें. तूं तो सोडून पळून जाण्याचा विचार केलास म्हणूनच मी तुला मारलं. पण आतां तूं नीट विचार कर आणि जमीन तुझ्याकरितांच दुभंगली तें नीट लक्षांत घे. त्या दगडाच्या खालीं मी वर्णन केलेला खजिना आहे. त्या कडीला धरून तो धोंडा वर उचल. तुझ्याशिवाय तो कुणीच उचलूं शकणार नाहीं. मग तुला तो दैवी खजिना दिसेल. तो तुझ्यासाठींच ठेवलेला आहे. पण त्यापूर्वी मी सांगतों त्याप्रमाणं तूं सर्व कांहीं केलं पाहिजेस. मी सांगतों त्यातलं अक्षरदेखील विसरतां कामा नये. मी जें हें सारं सांगतों आहें तें तुझ्या फायद्यासाठींच हें लक्षांत ठेव. जगांतल्या सर्व राजे लोकांचा खजिना जरी एकत्र केला तरी त्यापेक्षां हा खजिना मोठा आहे आणि तो फक्त तुझ्या आणि माझ्यासाठींच आहे."

बिचाऱ्या अल्लाउद्दिनानं थकवा बाजूला सारला. त्याचं रडं थांबवलं. जादूगाराच्या शब्दांनीं तो एकदम आश्चर्यचकित होऊन गेला. आपण एकदम सुलतानापेक्षांहि श्रीमंत होणार ह्या कल्पनेनं तो आनंदित होऊन म्हणाला, " काका, तुम्हांला जें जें कांहीं सांगायचं असेल ते सांगा; मी तें पूर्णपणं पार पाडीन !"

" बेटा, तूं मला माझ्या मुलाच्या ठिकाणीं आहेस आणि तशांत तूं माझ्या भावाचा मुलगा असल्यामुळं मला जास्त प्रिय आहेस. तुझ्याशिवाय मला कोणी नातलगहि नाहीं. तेव्हां तूंच माझा वारस आहेस. माझी सारी संपत्ती तुलाच मिळणार आहे !" असं गोड गोड बोलून तो अल्लाउद्दिनाजवळ गेला आणि मोठ्या प्रेमानं म्हणाला, " हे सारे कष्ट मी कोणाकरितां करीत आहें ? तुझ्यासाठींच ना ? यांतील प्रत्येक गोष्ट मी तुझ्यासाठींच करीत आहें. लक्षांत ठेव कीं, मी तुला अत्यंत श्रीमान व फार मोठा मनुष्य बनविणार आहें. तेव्हां मी जें काय सांगतों तें निमूटपणं कर. आतां सांगितल्याप्रमाणं ती कडी उचलून तो धोंडा बाजूला कर."

" पण तो एवढा मोठा धोंडा मला एकट्याला कसा उचलणार?" अल्लाउद्दीन म्हणाला. " तेव्हां तुम्हीहि येऊन मला मदत करा."

" नाहीं!" तो जादूगार म्हणाला, " मी मदत केली तर ती शिळा बाजूला होणं शक्यच नाहीं. मग आपले सर्व प्रयत्न फुकट जातील. तुझ्याशिवाय कोणीही ती उचलूं शकणार नाहीं. तूं फक्त जरा हात घाल आणि उचल म्हणजे ती तत्काळ उचलली जाईल. उचलतांना तूं फक्त तुझ्या आईचं आणि बापाचं नांव तेवढं घेत रहा म्हणजे तुला तिचं वजन जराहि भासणार नाहीं!"

अल्लाउद्दिनानं कंबर कसली आणि मोठ्या धैर्यानं व निग्रहानं जादूगारानं सांगितल्याप्रमाणं केलं. ती शिळा वर उचलून त्यानं ती बाजूला फेंकून दिली. त्याबरोबर त्याला खालीं एक भुयार दिसलं. त्यांत उतरायला सुमारें बारा पायऱ्या होत्या. तें पाहून अल्लाउद्दीन अगदीं चकित होऊन गेला.

" बेटा अल्लाउद्दीन," जादूगार म्हणाला, " आतां तुझं डोकं नीट ताळ्यावर ठेव आणि मी काय सांगतों तें ऐक. त्यांतलं कांहींएक विसरूं नकोस. तूं पहिल्यानं खालीं उतर आणि सरळ दिसणाऱ्या वाटेनं टोकापर्यंत जा. तिथं तुला चार मोठ्या खोल्या लागतील. प्रत्येक खोलींत तुला सोन्याच्या चार आणि चांदीच्या अनेक सुरया दिसतील. तेथेंच धोका आहे. त्यांना चूकूनहि शिवूं नकोस. तसंच तुझ्या अंगावरच्या कपड्यांचाहि त्यांना अगर भिंतींना स्पर्श होऊं देऊं नकोस. त्या सुरया तशाच तिथं राहूं दे. तूं त्यांच्याकडे लक्षहि न देतां चौथ्या खोलींत जा. जातांना कुठंही जरासुद्धां रमूं नकोस. तूं याच्याविरुद्ध जराहि वागलास तर तुझं रूपांतर तावडतोब काळ्या फत्तरांत होईल. तेव्हां नीट काळजी घे. चौथ्या खोलींत गेलास कीं तुला एक दरवाजा दिसेल. तो उघडतांना तूं धोंडा उचलतांना जे शब्द उच्चारले होतेस तेच शब्द उच्चार म्हणजे दरवाजा उघडेल. नंतर तुला एक बाग दिसेल, त्यांत चिक्कार फळझाडं असतील आणि तिथं तुला एक रस्ता दिसेल. त्या मार्गानं तूं ती बाग ओलांड. हा रस्ता पन्नास हात लांबीचा आहे. रस्ता ओलांडल्यावर तुला एक खोली दिसेल. त्या खोलींत तीस पायऱ्यांची एक शिडी आहे. तेथेंच छताला टांगलेला एक दिवा जळत आहे. तूं त्या शिडीवर चढ आणि तो दिवा घे. त्यांतील तेल वात वगैरे फेंकून दे

आणि तो तुझ्या आंगरख्यांत ठेव. आंगरख्याला तेल वगैरे लागेल म्हणून घावरूं नकोस. कारण त्या दिव्यांतलं तेल सामान्य नाहीं. येतांना लागेल त्या झाडाचीं फळं तोड. जोंपर्यंत तो दिवा तुझ्याकडे आहे तोंपर्यंत तेथील प्रत्येक वस्तु तुझीच आहे."

असं सांगून त्यानं आपल्या हातांतली आंगठी काढून ती अल्लाउद्दिनाच्या करंगळींत चढवली व तो म्हणाला, "बेटा, ही आंगठी जोंपर्यंत तुझ्या बोटांत आहे तोंपर्यंत तुला कसल्याहि संकटाची भीति नाहीं. पण मी सांगितलेलं सारं पूर्ण लक्षांत ठेऊनच वागलं पाहिजे. आतां ऊठ आणि खालीं उतर. तुझं धैर्य आणि निश्चय डळमळूं देऊं नकोस. आतां तूं लहान शेंबडं पोर नसून तरणाबांड मुलगा आहेस आणि थोडयाच वेळांत तूं अपरंपार संपत्तीचा मालक होणार आहेस. तुझ्याइतका श्रीमंत माणूस ह्या पृथ्वीवर शोधूनही सांपडणार नाहीं."

अल्लाउद्दीन उठला आणि मोठ्या धैर्यानं त्या भुयारांत उतरला. खालीं त्याला चार खोल्या दिसल्या. प्रत्येक खोलींत सोन्याच्या चार सुरया होत्या. त्या मोठ्या आकर्षक होत्या. त्यांत काय आहे हें पहाण्याची जिज्ञासा त्याच्या मनांत उत्पन्न झाली. परंतु काकानं दिलेल्या धोक्याच्या सूचनेची आठवण होतांच त्यानं त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं व आपल्या आंगरख्याचाहि स्पर्श कशाला होऊं न देतां तो बागेंत आला. बाग ओलांडून तो खोलींत आला. तिथें असलेल्या शिडीनं तो वर चढला आणि त्यानं दिवा काढला. नंतर त्यानं तो विझवला व आंतलं तेल ओतून टाकून तो काळजीपूर्वक आपल्या आंगरख्यांत ठेऊन दिला नंतर तो शिडीवरून उतरून बागेंत आला. तेथल्या झाडांकडे पहातांच त्याला मोठं आश्चर्य वाटलं. कारण त्या झाडांवर सुंदर सुंदर पक्षी बसलेले होते आणि ते आपल्या मधुर आवाजांत जगाच्या निर्मात्याचे गुण गात होते. आंत जातांना त्यानं हें पाहिलंच नव्हतं. प्रत्येक झाडावर फळांच्या आकाराचीं मौल्यवान रत्नं होतीं. प्रत्येक रत्न वेगळ्या आकाराचं आणि वेगळ्या घडणीचं होतं. आणि तीं रत्नं हिरव्या, पिवळ्या, पांढऱ्या, तांबड्या अशा निरनिराळ्या रंगांचीं होतीं. सूर्याचे किरण त्यांच्या-वर पडत असल्यामुळं तीं जास्तच तेजानं चकाकत होतीं. रत्नांचा आकार सांगण्यापलीकडे होता. मोठीं होतीं त्यांपैकीं एकहि पृथ्वीवरच्या एकाहि

बादशहाकडे सुद्धां सांपडलं नसतं. इतकंच नव्हे तर लहानांतलं लहान जरी रत्नं घेतलं तरी त्याच्या निम्म्याहून लहानहि पृथ्वीवर सांपडणं शक्य नव्हतं.

अल्लाउद्दीन त्या बागेंत खूपखूप फिरला. तेथील एक एक चमत्कार पाहून तो इतका भांबावून गेला कीं, त्याचं देहभान हरपलं. त्याला वाटलं आपल्याकडे झाडांना फळं येतात त्याऐवजीं ह्या झाडांना चांगल्या प्रकारचीं अशीं रत्नं आलीं आहेत. त्यामध्यें हिरे आणि इतर जातीचीं मौल्यवान रत्नं होतीं. त्यांत पाचू, नीलमणी व मोत्येंही होतीं. तीं माणसाचं देहभान हरपून टाकीत होतीं. अल्लाउद्दिनानं आपल्या संबंध आयुष्यांत अशीं रत्नं पाहिलेलीं नव्हतीं. शिवाय त्यांचं मोल कळण्याचं त्याचं तें वयहि नव्हतं. त्याच्या दृष्टीनं तीं रत्नं म्हणजे काचेचे अगर स्फटिकाचे मणीच होते. त्यापेक्षां तो त्यांना जास्त महत्त्व देत नव्हता. म्हणून त्यानं आपले खिसे भरून त्यांतलीं रत्नं घेतलीं. तीं अगदीं चकचकित असल्यामुळं त्याला वाटलं घरीं गेल्यावर आपल्या सवंगड्यांबरोबर खेळायला त्यांचा चांगला उपयोग होईल. ह्याच उद्देशानं त्यानं निरनिराळ्या झाडांवरचीं रंगीबेरंगी रत्नं काढून आपले सारे खिसे भरले. नंतर आपल्या शालीमध्यें बरींच रत्नं बांधून ती शाल आपल्या कमरेला घट्ट बांधली. त्याच्या मनांत त्यांच्या किंमतीबद्दल जरासुद्धां विचार आला नाहीं. तो त्यांना काचेपलीकडे कांहीं किंमत देत नव्हता.

नंतर तो घाईघाईनं निघाला. कारण आपल्याला उशीर झाला तर काका रागावेल अशी त्याला भीति वाटत होती. त्या चार खोल्या ओलांडून तो परत भुयाराच्या दाराजवळ आला. परत येतांना त्यानं त्या खोल्यांतील सुरयांकडे लक्षही दिलं नाहीं. तो त्या भुयाराच्या पायऱ्या चढून वर अगदीं शेवटच्या पायरीवर आला. परंतु ती पायरी सर्वांत उंच असल्यामुळें दुसऱ्याच्या मदतीशिवाय तो वर येऊं शकत नव्हता. तो चुलत्याला म्हणाला, " काका, मला जरा हात द्या वर यायला. "

अल्लाउद्दीन परत आलेला पाहून जादूगाराला अगदीं हर्ष झाला. तो म्हणाला, " दिवा आणलास का ? "

" होय ! " अल्लाउद्दीन म्हणाला.

" मग तो दिवा दे आधीं मला म्हणजे तुझ्याजवळचं ओझं तेवढंच कमी होईल. " जादूगार म्हणाला.

" पण काका, त्या दिव्याच्या ओझ्यानं कांहीं मी खालीं जात नाहीं." अल्लाउद्दीन म्हणाला, " तुम्ही मला हात देऊन वर काढा. मग मी लगेच तो दिवा तुम्हांला देऊन टाकीन."

पण त्या जादूगाराचा मुख्य उद्देश दिवा मिळवण्याचा असल्यामुळं कधीं एकदां तो दिवा आपल्या हातांत येतो ह्याची त्याला घाई झाली होती. तेव्हां तो पुन्हां पुन्हां अल्लाउद्दिनाला प्रथम तो दिवा देण्यासाठीं सांगूं लागला.

परंतु दिवा सर्व हिरेमाणकांच्या खालीं अडकून पडला होता. त्यामुळं अल्लाउद्दिनाला तो खिशांतून काढतांच येत नव्हता. पण जादूगार सारखा पुन्हां पुन्हां दिवाच मागूं लागल्यामुळं अल्लाउद्दीनही हट्टास पेटून सांगूं लागला, " आधीं मला वर घ्या, मगच दिवा देईन."

अशा तऱ्हेनं बराच वेळ गेला. अल्लाउद्दीन दिवा देत नाहीं असं पाहून तो जादूगार भयंकर भडकला. अल्लाउद्दिनानं वर येतांच दिवा देतों असं सांगितलं होतं. त्याचा त्यांत कांहींच वाईट उद्देश नव्हता. पण जादूगारानं जेव्हां पाहिलं कीं तो दिवा मिळण्याचं चिन्हं दिसत नाहीं, तेव्हां तो भयंकर संतापला. त्यानं तत्काळ त्या पेटत्या अग्नींत धूप वगैरे टाकून कांहीं मंत्र म्हटले आणि भुयाराच्या तोंडावर ती शिळा पूर्ववत् बसवून टाकली. जादूच्या प्रभावानं ती अगदीं घट्ट करून टाकली आणि बिचाऱ्या अल्लाउद्दिनाला आंत कोंडून टाकलं.

खरं म्हणजे तो जादूगार त्याचा कुणीच नातलग नव्हता. त्यानं आपण त्याचा काका आहों हें खोटंच सांगितलं होतं. त्याचा एकच उद्देश होता. तो म्हणजे कांहींहि करून अल्लाउद्दिनाकडून तो दिवा वर आणायचा. म्हणजे मग खालीं असलेली सारी संपत्तीं त्याला मिळाली असती. परंतु जेव्हां दिवा हातीं येत नाहीं असं त्यानं पाहिलं तेव्हां त्यानं अगदीं निष्ठुरपणं तें झांकण बंद केलं त्यावर माती टाकून अल्लाउद्दिनाला भुकेनं तडफडून मारण्यासाठीं आंत कोंडून टाकलं.

हा मग्रावी जादूगार आफ्रिकन होता. आफ्रिकेंतल्या अगदीं आंतल्या काळोखाच्या प्रदेशांत तो जन्मला होता. अगदीं लहानपणींच तो जादू शिकला होता. आफ्रिकेंतलं तें शहर अशा जादूबद्दल फारच प्रसिद्ध होतं. त्यानं

जादूवर पुस्तक वाचून, भाषणं ऐकून आपल्या ज्ञानांत बरीच भर घातली. पुन्हां पुन्हां त्यानं जादूचे वेगवेगळे प्रयोग करून आपलं ज्ञान वाढविलं. अशा तऱ्हेनं जेव्हां त्याला चाळिसावं वर्ष लागलं तेव्हां तो त्या विद्येंत अगदीं अग्रेसर झाला. एकदां तो असाच एक प्रयोग करीत असतां त्याला दिसून आलं कीं, चीनमधल्या अलकाल या शहरांत अतिशय अफाट असा रत्नांचा खजिना आहे. पृथ्वीवरचे सर्व राजेसुद्धां असा सांठा एकत्रित करूं शकत नव्हते. शिवाय सर्व साठ्यांत मोठा चमत्कारिक असा एक दिवा होता. तो दिवा ज्याच्या हातीं येणार होता त्यालाच ती सारी संपत्ती मिळणार होती. आपल्या शास्त्राच्या ज्ञानानं त्या जादूगारानं हें जाणलं. त्याबरोबर तो हेंही समजून चुकला कीं तो खजिना अल्लउद्दीन नांवाचा गरीब कुटुंबांतला एक मुलगाच फक्त उघडूं शकेल.

हें समजल्यावर तो दिवा मिळवणं सुलभ आहे हें जाणून तो सरळ कुठंहि न थांबतां चीन देशांत गेला. आपण त्या दिव्याचे मालक होणार ह्या आशेनं त्यानं अल्लाउद्दिनाला हाताशीं धरलं. परंतु त्याचा हा प्रयत्न फसला. त्याच्या सर्व आशा धुळीला मिळाल्या. त्याचे सर्व प्रयत्न जमीनदोस्त झाले. तेव्हां त्यानं रागावून भुयाराचं दार बंद करून वर माती टाकली. तो मनांत म्हणाला, ' त्याला जिवंत आंत कोंडला म्हणजे त्याला ठार मारण्याचा गुन्हा आपल्या माथीं येणार नाहीं. दुसरी गोष्ट म्हणजे ज्याआर्थी अल्लाउद्दीन वर येणार नाहीं त्याअर्थी तो दिवाही वर येण्याची भीति नाहीं.' असा विचार करून तो आपल्या मार्गाला लागला. तो नगराकडे न वळतां सरळ आपल्या देशाच्या वाटेला लागला. कारण पुन्हां नगरांत गेलों आणि आपणाबरोबर अल्लाउद्दीन नाहीं हें लोकांना समजलं म्हणजे बोभाटा होईल आणि लोक कांहीं आपल्याला जिवंत सोडणार नाहींत. ह्या भीतीनं आडवाटेनं तो आफ्रिकेला निघून गेला. अगदीं दु:खी आणि आशाभंग झालेल्या अशा स्थितींत तो निघून गेला.

अल्लाउद्दिनानं जेव्हां पाहिलं कीं भुयाराचं तोंड बंद झालं तेव्हां त्यानं जादूगाराच्या नांवानं मोठमोठ्यानं हांका मारल्या त्याला नक्की वाटत होतं कीं तो आपला काकाच असला पाहिजे. म्हणून त्यानं पुन्हा पुन्हां त्याला हाका मारल्या आणि आपल्याला हात देऊन वर काढण्याची

विनंती केली. परंतु कितीहि हाका मारल्या तरी त्याला कांहींच उत्तर मिळालं नाहीं. तेव्हां मात्र त्याला त्याच्याबद्दल संशय येऊं लागला. त्याला कळून चुकलं कीं त्यानं आपल्याला दगाफटका केला. त्याची खात्री झाली कीं तो आपला काका नाहीं. किंवा कोणी नातेवाईकहि नाहीं. त्यानं गोड गोड थापा देऊन आपल्याला पुरं बनविलं. अल्लाउद्दिनाला आपल्या खऱ्या परिस्थितीची जाणीव झाली तेव्हां त्याला भयंकर दु:ख झालं. जीविता-बद्दल तो अगदीं निराश बनला. आतां आपली सुटका होणार नाही ह्याची त्याला खात्री पटली. भीतीनं तो मोठमोठ्यानं रडूं लागला.

बराच वेळ शोक केल्यावर तो उठला आणि पायऱ्या उतरून पुन्हां खालीं आला. भुयारांतून बाहेर पडायला एखादा दरवाजा आहे कीं काय हें तो पाहूं लागला. परंतु काळ्याकुट्ट अंध:काराशिवाय त्याला कुठंच कांहीं दिसलं नाहीं. त्याच्या मनांत आलं, बागेंत एकादा दरवाजा असेल. परंतु बागेंत जाण्याचा मार्गहि त्या जादूगारानं आपल्या जादूच्या प्रभावानं बंद करून टाकला होता. कारण अल्लाउद्दीन बागेंत आला असता तर भुयारांतून वर येण्याचा सभव होता. म्हणून त्या जादूगारानं आधींच बागेंत जाण्याचा मार्ग बंद करून टाकला होता.

अल्लाउद्दिनाला जेव्हां कळून चुकलं कीं बागेंत जायचा रस्तासुद्धां बंद झाला आहे तेव्हां मात्र तो अगदींच हताश बनला. घसा कोरडा होईपर्यंत तो रड रड रडला. आतां त्याच्या हृदयांत जराही अशा राहिली नाहीं. त्याचं हृदय दु:खानं अगदीं व्याकुळ बनलं. मन अगदीं निराश बनलं. आणि तो पुन्हा त्या भुयाराच्या तोंडाशीं आला आणि कपाळावर हात ठेवून त्या पायायांवर बसला. तो अगदीं निश्चितपणं समजून चुकला कीं आतां त्या भुयारांत अन्नपाण्याविना तडफडून मरावं लागणार.

परंतु देव तारी त्याला कोण मारी ! सर्वसाक्षी परमात्म्याच्या मनांत असलं म्हणजे कितीहि संकटं आलीं तरी त्यांतून माणसाची सुटका ही होतेच दु:खांतूनच त्याला सुखाचा मार्ग दिसूं लागतो. नेमकी हीच गोष्ट अल्ला-उद्दिनाच्या बाबतींत घडली. त्याला भुयारांत पाठवितांना त्या जादूगारानं त्याच्या बोटांत एक आंगठी घातली होती आणि तो त्याला म्हणाला होता, " ही आंगठी तुला सर्व संकटांपासून, कोणत्याहि धोक्यापासून दूर ठेवील

आणि तुला मदतीचा हात देईल." आणि नेमकी हीच गोष्ट अल्लाउद्दि-नाच्या सुटकेला कारण झाली.

अल्लाउद्दीन तीन दिवस त्या भुयारांत अन्नपाण्याविना सारखा विव्हळत बसला होता. भुकेनं आणि तहानेनं त्याचा जीव अगदीं व्याकुळ झाला होता. अजूनपर्यंत त्यानं ते कष्ट कसेतरी सहन केले. परंतु जेव्हां अगदींच सहन होईना तेव्हां तो आपले दोन्ही हात एकमेकांवर घासून ते वर करीत म्हणाला, "परमेश्वरा, तुझ्याशिवाय ह्या जगांत सर्वश्रेष्ठ, सर्वज्ञानी असा कुणीच नाहीं. तूं माणसांवर संकटं आणतोस आणि तूंच तीं दूर करतोस. तूं दयेचा सागर आहेस. तुझ्या चरणीं मी लीन झालों आहें. तेव्हां मला या यातनांतून मुक्त कर. या संकटांतून मला सोडव!"

अशा तऱ्हेनं परमेश्वराची करुणा भाकीत असतांना आणि अति दुःखानं हात चोळीत असतांना त्याच्या बोटांतली आंगठी अचानक घासली गेली आणि त्याबरोबर मोठा चमत्कार घडला.

एक अक्राळविकाळ राक्षस त्याच्यासमोर उभा राहून म्हणाला, "आपली काय आज्ञा आहे? तुमच्या हातांत असलेल्या आंगठीचा मी दास आहें. पाहिजे तें मागा. ह्या आंगठीवर माझ्या धन्याचं सील आहे आणि ज्याच्या हातांत ही आंगठी आहे त्यांच्या हुकुमांचा मी ताबेदार आहें. तेव्हां आपलं जें काम असेल तें मला सांगा!"

अल्लाउद्दिनानं त्याच्याकडे पाहिलं. तो अक्राळविक्राळ राक्षस त्याच्या समोर होता. त्याच्या त्या भयानक स्वरूपाकडे पाहून अल्लाउद्दिनाची पांचावर धारण बसली. तो थरथरा कापूं लागला. त्याच्या अंगाला दरदरून घाम सुटला. त्याच्या तोंडांतून शब्दहि फुटेना. परंतु जरा वेळानं त्याला परिस्थितीची जाणीव झाली. 'मी ह्या आंगठीचा दास आहें, पाहिजे तें मागा!' हे राक्षसाच्या तोंडचे शब्द त्याला आठवले. त्यानं आपलं सारं धैर्य एकवटलं. आंगठी देतांना त्या जादूगारानं जें त्याला सांगितलं होतं तेंहि त्याला आठवलं. त्याबरोबर त्याला बराच आनंद झाला. आपल्या सुटकेची त्याला आशा वाटूं लागली. तो मोठा धीर करून म्हणाला, "तूं ह्या आंगठीचा दास आहेस तर मग मला परत जमिनीवर नेऊन ठेव!"

हे शब्द त्याच्या तोंडांतून बाहेर पडतात न पडतात तोंच जमीन एकाएकीं दुभंगली आणि अल्लाउद्दिनाला आपण गुहेच्या बाहेर आलेले आहोंत असं दिसलं. परंतु डोळे उघडून त्याला प्रकाशाकडे बघवेना. तीन दिवस सारखा त्या अंधाऱ्या जागेंत असल्यामुळं एकाएकीं दिसलेला सूर्याचा प्रखर प्रकाश त्याच्या डोळ्यांना सहन झाला नाहीं. त्यानं हळूहळू जरा जरा डोळे किलकिले केले आणि मग त्याचे डोळे उजेडाला सरावले. सगळं दिसूं लागतांच त्यानं आजूबाजूला पाहिलं. परंतु त्याला भुयाराचा दरवाजा कुठं दिसेना. त्याला मोठं आश्चर्य वाटलं.

त्या मग्रावी जादूगारानं जादूच्या प्रभावानं जसा तो दरवाजा उघडला होता तसाच तो बंद केला होता. त्यामुळं तो उघडला गेल्याचं अगर बंद केल्याचं कोणतंहि चिन्ह तिथं दिसत नव्हतं. भुयारांत जाण्याचा मार्ग तिथं आहे असं कुणालाही वाटणं शक्य नव्हतं. अल्लाउद्दिनाला वाटलं आपण दुसऱ्याच कोणत्या तरी ठिकाणीं तर आलेले नाहीं ना? त्याला अजून आपण त्याच जागीं आहोंत हें खरं वाटेना. परंतु काटक्या गोळा करून आग पेटविली होती व ज्यावर त्या जादूगारानं धूप वगैरे टाकलेला होता ती जागा त्यानं पाहिली तेव्हां त्याची खात्री पटली. नंतर त्यानं आपल्या सभोंवार पाहिलं. त्याला दूर दूर अंतरावर बागा दिसूं लागल्या. त्या बाजूला जाणारा रस्ताही त्याला ओळखीचा वाटूं लागला. त्याबरोबर त्याला आनंद झाला. त्याच्या हृदयांत हर्षाच्या उकळ्या फुटूं लागल्या.

आपल्याला मृत्यूच्या तावडीतून सोडवून पुन्हां पृथ्वीचं दर्शन घडविल्याबद्दल त्यानं देवाला धन्यवाद देऊन त्याचे पुन्हा पुन्हा आभार मानले. कारण त्या आपत्तींतून सुटण्याची आशा त्यानं सोडून दिली होती. पुन्हा एकदां परमेश्वराचे आभार मानून तो त्या रस्त्यानं शहराकडे जायला निघाला. तीन दिवस अन्नापाण्याविना घालविले असूनहि तो झटपट चालूं लागला. मृत्यूंतून सुटका झाल्यामुळं त्याचा सारा शीण नाहींसा होऊन त्याच्या अंगांत नवीन उत्साह आला होता त्या उत्साहाच्या भरांत तो भराभर चालूं लागला आणि सारे रस्ते पूर्वपरिचयाचे असल्यामुळं तो सरळ आपल्या घरीं आला.

परंतु घरीं आला तेव्हां तो अतिशय दमून गेला होता. भुकेनं त्याचा जीव अगदीं व्याकुळ झाला होता. तशांत गेल्या तीन चार दिवसांत घडलेल्या

विचित्र घडामोडी आणि त्यांतून झालेल्या सुटका ! त्यामुळें त्याच्या मनावर भयंकर ताण पडला होता. हा सारा ताण त्याच्या मेंदूला सहन झाला नाहीं. आईसमोर येतांच ती मूर्च्छित होऊन पडला.

अल्लाउद्दीन घरांतून गेल्या दिवसापासून त्याची आई अगदीं दु:खी कष्टी झाली होती. त्याच्या काळजीनं ती सारखी रडत होती. त्यामुळं अल्लाउद्दीन घरीं आलेला पाहतांच तिचा आनंद अगदीं परमोच्च कोटीला पोंचला. परतु तो मूर्च्छा येऊन पडलेला पहातांच ती एकदम घाबरून गेली पण त्याला साधी मूर्च्छाच आली आहे हें जाणून तिनं गोंधळ माजवला नाहीं. तिनं तत्काळ त्याच्या तोंडावर गार पाणी मारलं व शेजाऱ्याकडून कांहीं औषधी द्रव्यं आणून त्याच्या नाकाशीं धरलीं.

जरा वेळानं तो शुद्धीवर आला आणि उठून बसत म्हणाला, " मा, मला कांहींतरी खायला दे. आज तीन दिवस झाले, मी कांहींसुद्धां खाल्लेलं नाहीं. भुकेनं माझा जीव व्याकुळ झाला आहे. "

ताबडतोब तिनं घरांत जाऊन जें काय होतं तें त्याला आणून दिलं. ती प्रेमानं म्हणाली, " बेटा, आतां खा, पी आणि विश्रांति घे. नंतर मग तुझ्यावर कोणतं संकट आलं होतं तें सांग. आतां या क्षणाला तूं दमलेला आहेस, तेव्हां मी तुला कांहीं एक विचारीत नाहीं. "

आईच्या सांगण्याप्रमाणं अल्लाउद्दिनानं खाऊन पिऊन थोडा वेळ विश्रांती घेतली. नंतर तो आपल्या आईला म्हणाला, " तुझ्याविरुद्ध माझी तक्रार आहे. कारण तूंच मला त्या काका म्हणविणाऱ्या दुष्टाच्या स्वाधीन केलंस. त्यानंच मला ठार मारण्याचा प्रयत्न केला. त्यानं ठरवलेलं माझं मरण मी माझ्या डोळ्यांनीं पाहिलं; आणि अशा माणसाला तूं माझा चुलता समजत होतीस ! मी देवाच्या कृपेनं सुटलों नसतों तर तुझी माझी भेट स्वर्गातच झाली असती. त्याच्या प्रेमाच्या नाटकानं आपण साफ फसलों.

आई, तो इसम माझा काका नसून चेटूक करणारा एक जादूगार आहे. तो मूर जातीचा असून पक्का थापाड्या, दुष्ट, विश्वासघातकी आणि ढोंगी आहे. भुतंसुद्धां त्याच्याइतकीं वाईट नसतील. आई, त्यानं कोणतं वाईट कृत्य केलं तें ऐक. मी अगदीं सत्य तेंच सांगतों आहें. त्यानं जेवढीं म्हणून

वचनं दिलीं तीं सारीं त्यानं मोडलीं. त्यानं माझं भलं करण्याचं अभिवचन दिलं. माझ्यावर ममता केली. तुला हें सारं खरं वाटलं. पण त्यानं जें हें सारं केलं होतं तें आपलं स्वतःचं उद्दिष्ट साध्य करण्याकरितां ! त्याचा मुख्य उद्देश होता मला ठार मारायचा ! पण देवानंच माझी सुटका केली. त्याबद्दल त्याचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. आई, त्या दुष्टानं मला किती गोड गोड वचनं दिलीं म्हणून सांगूं ? त्याच्या त्या वचनांनीं मला अगदीं भुरळ पाडली ! "

असं म्हणून अल्लाउद्दिनानं आपल्यावर कोणते प्रसंग आले, त्या जादूगारानं आपल्याला त्या टेकडीजवळ नेऊन आपल्या जादूच्या प्रभावानं भुयाराचा दरवाजा कसा उघडून दिला इथपर्यंतची हकिगत सांगितली आणि तो म्हणाला, " तो चमत्कार पाहून मी भांबावून गेलों, भीतीनं थरथर कापूं लागलों. त्याच्या जादूचे ते भयंकर प्रकार पाहून मी घाबरून पळून जाण्याचा निश्चय केला. पण माझा हा बेत त्याच्या लक्षांत येतांच त्यानं माझी मानगूट पकडली आणि माझ्या तोंडावर जबरदस्त ठोसा दिला. त्यामुळं मी बेशुद्ध पडलों. परंतु नंतर त्याच्या लक्षांत आलं कीं मला सांभाळून घेतलं पाहिजे. कारण खजिन्याची ती खोली माझ्याशिवाय कुणीहि उघडूं शकत नव्हता. तो जादूगार स्वतः कांही आंत जाऊं शकत नव्हता. कारण तो खजिना माझ्या नांवानं होता. तेव्हां तो लाडीगोडी लावून मला समजावूं लागला. त्यानं आपल्या हातांतली आंगठी काढून माझ्या बोटांत घातली. मग मी खालीं उतरलों. "

नंतर भुयारांत आपण कसे गेलों. तिथं काय पाहिलं आणि तेथला तो दिवा कसा हस्तगत केला इत्यादि हकिगत सांगून त्यानं आपल्या खिशांतून तो दिवा बाहेर काढून आईला दाखविला. त्याबरोबरच खिशांतलीं सारीं रत्नंहि त्यानं तिच्या पुढ्यांत टाकलीं. अजूनपर्यंत तो त्या रत्नांना कांचेचे तुकडेच समजत होता. नंतर त्यानं आपण पुन्हां भुयाराच्या दाराशीं कसे आलों आणि जादूगाराला आपल्याला वर घेण्यासाठीं हात द्यायला कसं सांगितलं, त्यानं अगोदर आपल्यापासून दिवा घेण्याचा कसा घाट घातला आणि नंतर आपल्याला भुयारांत कोंडून तो कसा निघून गेला ही सारी हकिगत सांगितली.

त्यानं सांगितलेली ही हकिगत ऐकून ती अगदीं भारून गेली. त्या मग्रावी जादूगारानं मुद्दाम आपल्या मुलाला मरणाच्या खाईंत लोटलेलं ऐकून ती म्हणाली. " बेटा, तो जादूगार खरोखरच भयंकर दुष्ट, बदकर्मी, ढोंगी आणि जादूच्या सहाय्यानं दुसऱ्याचे खुन करणारा खुनी आहे. देवाची कृपा म्हणून तूं त्या दुष्टाच्या तडाक्यांतून वाचलास. मी तर त्याला तुझा काकाच समजत होतें ! "

तीन दिवस अल ाउद्दीन जराहि झोपला नव्हता, त्यामुळं तो डुलक्या देऊं लागला. तेव्हां आईनं त्याला झोंपायला सांगितलं आणि तो स्वतःही झोपली.

दुसऱ्या दिवशीं चांगली दुपार होईपर्यंत कांहीं तो उठला नाहीं. तो जागा झाला तेव्हां त्याला बरीच भूक लागली होती. त्यानं आईकडे खायला मागितलं. परंतु आई म्हणाली, " काल घरांत जें काय होतं नव्हतं तें तुला खायला दिलं. आतां घरांत कांहीं सुद्धां राहिलेलं नाहीं. पण आतां तूं थोडा वेळ तसाच पडून रहा. घरांत थोडं विणलेलं सूत आहे. तें मी बाजारांत नेऊन विकतें आणि जे काय पैसे मिळतील त्याचं तुला बाजारांतून खायला आणतें. "

" आई " अल्लाउद्दीन म्हणाला, " तें सूत राहूंदे तसंच. तें सूत विकून काय मिळणार आहे ? मी आणलेला तो दिवा दे. मी बाजारांत नेऊन विकतों म्हणजे सुतापेक्षां खात्रीनं अधिक पैसे मिळतील. "

अल्लाउद्दिनाच्या आईनं तत्काळ उठून तो दिवा आणला आणि ती म्हणाली, " हा घे दिवा ! पण त्याच्यावर फारच धूळ सांचलेली आहे. असा बाजारांत नेला तर तो कुणीहि घेणार नाहीं. तेव्हां मी त्याला घासून पूसून साफ करतें. म्हणजे कुणीहि चार पैसे अधिक देईल ! "

असं म्हणून तिनं मूठभर माती घेतली आणि ती दिवा घासूं लागली. परंतु तिनं दिवा घासायला सुरुवात केली न केली तोंच तिच्या समोर एक भयंकर राक्षस उभा राहिला. तो भयंकर घिप्पाड होता. त्याचं शरीर पर्वतप्राय होतं. तो तिला म्हणाला, " काय पाहिजे, बोला ! मी तुमचा दास आहें. जो कोणी हा दिवा जवळ बाळगील त्यांचा मी दास आहें. मी एकटाच

नव्हे तर माझ्यासारखे शेंकडों गुलाम या चमत्कारिक दिव्याचे सेवक आपल्या सेवेला तत्पर आहेत.''

परंतु ती भीतीनं थरथरा कापूं लागली. त्या भयंकर राक्षसाकडे पाहून तिची बोबडीच वळली. तिच्या तोंडांतून एकहि शब्द बाहेर पडेना. असं चमत्कारिक दृश्य तिनं कधीं जन्मांत पाहिलं नव्हतं. त्यामुळं ती पार भांबावून जाऊन बेशुद्ध होऊन पडली.

अल्लाउद्दीन दूर उभा होता. पण त्यानं भुयारांत आंगठी घासल्यामुळं निर्माण झालेला राक्षस पाहिला होता. त्यामुळं ह्या राक्षसाची त्याला भीति वाटली नाहीं. तो राक्षस आईशीं बोलत असलेला पाहून त्यानं झटकन पुढं होऊन तिच्या हातांतला दिवा घेतला आणि तो म्हणाला, "मला भूक लागली आहे, तेव्हां माझी अशी इच्छा आहे कीं आमच्यासाठीं उत्तम भोजन घेऊन ये!"

क्षणार्धांत राक्षस नाहींसा झाला आणि एक मोठा थाळा घेऊन आला. तो थाळा बहुमोल होता. त्यांत आणखी लहान लहान बारा थाळे होते व त्यांत रुचकर आणि स्वादिष्ट असे भोजनाचे निरनिराळे प्रकार होते. एका थाळ्यांत मांस होतं. दुसरींत भाकऱ्या होत्या. भाकऱ्या अगदीं पांढऱ्या सफेत होत्या. तिसरींत बिर्याणी होती. बाकीच्यांतहि निरनिराळे पदार्थ होते. शिवाय चांदीच्या दोन पेल्यांत सरबत होतं. हे सारे जिन्नस त्याच्यापुढं ठेऊन तो राक्षस एकदम गुप्त झाला.

तो गेल्यावर अल्लाद्दिनानं आपल्या आईच्या तोंडावर गुलाबपाणी शिंपडलं आणि तिला शुद्धीवर आणलं. ती पूर्ण शुद्धीवर येतांच तो म्हणाला, "आई, परमेश्वरानं आपल्यासाठीं हें भोजन पाठवून आपली गरीबी कमी केली आहे. तेव्हां चल आपण भोजन उरकून घेऊं या."

परतु जेव्हां त्याच्या आईनं चांदीचा तो चकचकीत थाळा पाहिला. तेव्हा ती अगदीं आश्चर्यचकित होऊन गेली. ती म्हणाली, "बेटा आपलं दु:ख कमी करणारा हा उदार मनुष्य कोण आहे? आपण त्याचं सदैव ऋणी राहिलं पाहिजे. मला वाटतं आपली ही दुर्दशा पाहून सुलतानानंच हा जेवणाचा थाळा पाठविला असला पाहिजे."

आर्मदशीभिम
2138
१९।२।६१.



"आई, ही चर्चा करायची वेळ नाहीं," अल्लाउद्दीन म्हणाला, "मला भयंकर भूक लागली आहे. तेव्हां आपण प्रथम खाऊन घेऊं या."

असं म्हणून तीं दोघं मायलेकरं खालीं बसलीं आणि भोजन करूं लागलीं. अल्लाउद्दिनाच्या आईनं असलं स्वादिष्ट मिष्टान्न कधीं पाहिलंच नव्हतं. मग चव घ्यायचं बाजूलाच राहिलं ? दोघंहि भुकेलेलीं असल्यामुळं त्यांनीं त्यावर सपाटून ताव मारला. खरं म्हणजे तें जेवण फक्त सुलतानाच्याच योग्यतेचं होतं. त्या दोघांनाहि तो थाळा मौल्यवान आहे ह्याची कल्पनाच नव्हती. कारण त्यांच्या सबंध आयुष्यांत त्यांनीं असं कधीं पाहिलं नव्हतं.

त्यांनीं पोटभर खाल्लं आणि राहिलेलं अन्न रात्रीसाठीं आणि थोडं दुसऱ्या दिवसासाठीं काढून ठेऊन त्यांनीं हात धुतले. नंतर तीं दोघं मायलेकरं बैठकीच्या जागेवर येऊन बसलीं. तेव्हां अल्लाउद्दिनाच्या आईनं त्याला विचारलं, "बेटा, त्या दिव्यांतून निर्माण झालेल्या राक्षसानं तुला काय सांगितलं ? देवानं आपणासाठीं जें अन्न पाठविलं तें आपण खाल्लं आहे. तेव्हां आतां तुला भुकेलेला आहें वगैरे सबब सांगतां येणार नाहीं. काय घडलं तें आतां सांग बघूं !"

अल्लाउद्दिनानं काय घडलं तें तिला सविस्तर सांगितलं. तें ऐकून ती अतिशय चकित होऊन म्हणाली, "बेटा, राक्षस माणसासमोर येतात ही खरी गोष्ट आहे. परंतु माझ्या सबंध आयुष्यांत तसं कधींच घडलं नव्हतं. मला वाटतं तुला त्या भुयारांतल्या जागेंतून ज्यानं वाचविलं तो हाच असला पाहिजे."

"नाहीं." अल्लाउद्दीन म्हणाला, "तो हा नाहीं. कारण हा जो पुढं आला तो दिव्याचा सेवक होता."

"मग तो कोण ?" तिनं विचारलं.

"तो त्याच्यापेक्षां जातीनं व शरीरानं वेगळा होता. तो अंगठीचा सेवक होता व हा तूं जो दिवा हातांत धरला होतास, त्याचा सेवक होता." अल्लाउद्दीन म्हणाला.

"पण मी मात्र भीतीनं जवळ जवळ मेलेंच होतें." अल्लाउद्दिनाची आई म्हणाली, "पण बेटा, मी तुला पाजलेल्या दुधाची शपथ घेऊन बजावतें कीं तूं हा दिवा आणि ही आंगखी फेंकून दे. ह्या दोन्ही जिनसा अगदीं भयंकर

आहेत. मी तर पुन्हां आणखी त्यांचं दर्शनही घेऊं इच्छित नाहीं. त्यांचा उपयोग करणं किंवा त्या जवळ ठेवणं सुद्धां योग्य नाहीं !"

"आई, तूं म्हणतेस तें ठीक आहे." अल्लाउद्दीन म्हणाला, "पण पण दिवा आणि आंगठी फेकून दे म्हणालीस तें मात्र शक्य नाहीं. आपण व्याकुळ झालों असतांना त्या सेवकानं आपल्याला अन्न आणून देऊन किती मदत केली हें तूं डोळ्यांनीं पाहिलंच आहेस. दुसरं म्हणजे त्या लुच्चा जादूगारानं मला त्या भुयारांत धाडलं तेव्हां त्या चारी खोल्यांत सोनं चांदी वगैरे बहुमोल वस्तू भरलेल्या असूनहि त्यांपैकीं कांहीं एक आणायला न सांगतां फक्त तो दिवाच आणायला त्यानं सांगितलं. ह्यावरून त्याला दिव्याची खरी योग्यता माहीत होती. त्याला जर त्याचं महत्त्व वाटत नसतं तर अफ्रिकेसारख्या दूरच्या प्रदेशांतून इथं येऊन त्याचा शोध करण्याचं त्याला कारणच नव्हतं. शिवाय दिवा हातीं येत नाहीं असं त्यानं पाहिलं तेव्हां मला त्या भुयारांत कोंडण्याचंही त्याला कांहीं कारण नव्हतं. तेव्हां हा दिवाच खरा महत्त्वाचा आहे. कांहीं झालं तरी आपण तो दूर करतां कामा नये. ह्यापुढं हा दिवाच आपल्या चरितार्थाचं मुख्य साधन आहे. ह्यामुळंच आपण सधन होऊं. पण ह्या दिव्याशीं संबंधित असलेल्या चमत्काराबद्दल कोणाला एक चकार शब्दहि कळतां कामा नये. हें झालं दिव्याबद्दल. आंगठी-बद्दल म्हणशील तर ती मी माझ्या बोटांतून कधींहि काढणार नाहीं. ती नसती तर त्या अंधाऱ्या भुयारांत मी तडफडून मेलों असतों. अशा आंगठीला मी फेंकून देऊं म्हणतेस ! भावी काळांत माझ्यावर आणखी संकटं येणार नाहींत कशावरून ? ही आंगठी मला त्यांतून सोडविणार नाहीं कशावरून ? पण तूं म्हणत असशील तर मी हा दिवा तुझ्यापासून दूर ठेवीन. तो तुझ्या दृष्टीस पडणार नाहीं असं करीन !"

आईनं त्याचं हें बोलणं ऐकलं. तिला तें पटलहि. ती म्हणाली, "बेटा, तुला योग्य वाटेल तें कर. माझ्याबद्दल म्हणशील तर मी एकदां जें भयंकर दृश्य पाहिलं आहे तें कांहीं पुन्हां पहाण्याची माझी इच्छा नाहीं !"

त्यानंतर दोन दिवस निघून गेले. त्या राक्षसानं आणून दिलेलं अन्न त्यांना दोन दिवस पुरलं. तिसऱ्या दिवशीं जेव्हां घरांत कांहींच उरलं नाहीं तेव्हां अल्लाउद्दिनानं त्या लहान थाळ्यांपैकीं एक थाळी घेतली आणि ती

घेऊन तो बाजारांत गेला. खरं म्हणजे त्या सर्व थाळ्या शंभर नंबरी सोन्याच्या होत्या. परंतु अल्लाउद्दिनाला त्याबद्दल कांहींच माहीत नव्हतं. तिथं मोडीच्या वस्तू विकणारा एक यहुदी व्यापारी होता. त्याला ती त्यानं देऊं केली. हा यहुदी सैतानापेक्षांहि सैतान होता. अल्लाउद्दिनाकडे त्यानं ती सोन्याची थाळी पाहिली तेव्हां कुणी पाहूं नये म्हणून अल्लाउद्दिनाला त्यानं बाजूला नेलं. त्याच्याकडून ती थाळी घेऊन त्यानं तिचं बारकाईनं निरीक्षण केलं. थाळी शंभर नंबरी सोन्याची आहे हें त्यानं चटकन् ओळखलं. परंतु अल्लाउद्दिनाला त्याची किंमत माहीत आहे कीं नाहीं हें त्याला माहीत नव्हतं. शिवाय तो व्यवहारांत कच्चा आहे कीं पूर्ण कसलेला आहे हें त्याला माहीत नव्हतं. सौदा कसा करावा ह्याचा त्याला प्रश्न पडला. शेवटीं त्यानं अल्लाउद्दिनाला विचारलं, " ह्या थाळीची किंमत काय आहे ? "

" तुला काय वाटतं ? तिची किंमत काय असेल ? " अल्लाउद्दिनानं त्यालाच प्रश्न केला.

त्याचा हा प्रश्न ऐकून तो यहुदी गोंधळून गेला. अल्लाउद्दिनाचा प्रश्न एकाद्या कसलेल्या माणसासारखा होता. तेव्हां त्याला काय किंमत सांगावी ह्याचा प्रश्न पडला. परंतु अल्लाउद्दिनाच्या चेहऱ्याचं निरीक्षण केल्यावर त्याला वाटलं कीं, तो व्यवहारतज्ञ नसावा. त्याला थाळीची किंमतहि माहीत नसावी. तेव्हां त्यानं भीत भीतच कमींत कमी किंमतींत सौदा करण्याचा विचार केला. आपल्या खिशांतून त्यानं एक सोन्याचं नाणं काढून त्याच्यापुढं धरलं. सोन्याचं नाणं पहातांच अल्लाउद्दिनाला फार आनंद झाला. त्यानं तें झटकन घेतलं आणि जराहि घासाघीस न करतां तो निघून गेला. आतां त्या यहुद्याची खात्री झाली कीं गिऱ्हाइकाला व्यवहार कशाशीं खातात तें माहीत नाहीं. त्याला फार वाईट वाटलं. कारण जी गोष्ट एका तांब्याच्या नाण्यांत झाली असती त्यासाठीं त्यानं एक सोन्याचं नाणं खर्ची घातलं होतं. आपल्या मूर्खपणाबद्दल तो स्वतःलाच दोष देऊन शिव्या मोजूं लागला.

अल्लाउद्दीन तेथून निघाला तो थेट रोटीवाल्याच्या दुकानांत आला. तेथें त्यानं रोटी विकत घेतली. आणि बाकीचे पैसे खिशांत ठेऊन तो घरीं आला. घरीं येतांच बाजारांतून आणलेले जिन्नस त्यानं आईपुढं ठेवले व

उरलेले पैसे तिच्याकडे देत तो म्हणाला, " ह्या उरलेल्या पैशांतून तुला पाहिजे त्या वस्तू खरेदी कर. "

तिनं बाजारांत जाऊन आवश्यक त्या वस्तू विकत आणल्या. अशा तऱ्हेनं त्यांनीं कांहीं दिवस त्या पैशांवर खाऊन पिऊन सुखांत घालवले. जेव्हां जेव्हां पैसे संपत असत तेव्हां अल्लाउद्दीन एक एक थाळी त्या दुष्ट आणि विश्वासघातकी यहुद्याकडे घेऊन जाई आणि तो जे कांहीं थोडेफार पैसे देई ते घेई. त्या यहुद्याच्या मनांत कमी पैसे द्यायचं येई पण त्याला भीतीही वाटे कीं जर कमी पैसे दिले तर पोरगा कदाचित् दुसऱ्या फेरीवाल्याकडे जाईल. अल्लाउद्दिनानं अशा तऱ्हेनं त्या सोन्याच्या साऱ्या थाळ्या विकल्या. आता फक्त चांदीचा तो मोठा थाळा राहिला. तो थाळा बराच मोठा आणि जड असल्यामुळं बाजारांत नेणं शक्य नव्हतं. त्यामुळं अल्लाउद्दिनानं त्या यहुद्यालाच घरीं बोलावलं आणि त्याला तो दाखविला. यहुद्यानं तो मोठा नग आहे हे जाणून त्याबद्दल त्याला दहा दिनार दिले.

अशा तऱ्हेनं अल्लाउद्दिनानं आणि त्याच्या आईनं त्या पैशावर बरेच दिवस गुजराण केली. घरांतला पैसा अडका संपला आणि घरांत कांहीं एक राहिलं नाहीं. तेव्हां अल्लाउद्दिनानं तो चमत्कारिक दिवा बाहेर काढून घांसला.

त्याबरोबर तो राक्षस त्यांच्या पुढ्यांत उभा राहिला आणि म्हणाला, " आपली काय आज्ञा आहे ? "

" मी भुकेलेला आहें तेव्हां पूर्वीप्रमाणं तूं जेवणाचा थाळा घेऊन यावंस अशी माझी इच्छा आहे ! "

बोलून होतं आहे न आहे तोंच त्यानं पूर्वीप्रमाणं अन्नानं भरलेले थाळे असलेला मोठा थाळा आणला. त्यांत पांढऱ्या शुभ्र भाकऱ्या, सरबताच्या बाटल्या आणि लज्जतदार असे भोजनपदार्थ होते. थाळा त्याच्यापुढं ठेऊन राक्षस गुप्त झाला. ह्या खेपेला अल्लाउद्दिनाची आई अल्लाउद्दीन दिवा घासणार म्हणून अगोदरच बाहेर गेली होती. कारण त्या राक्षसाला पहाण्याचं धाडस तिच्या अंगीं नव्हतं. ती पुन्हां घरांत परतली तेव्हां मिष्टान्नानं भरलेला थाळा आला होता आणि त्याचा घमघमाट खोलीभर पसरला होता. तें पाहून तिला फार आनंद झाला. अल्लाउद्दीन आपल्या आईला म्हणाला,

" आई, तूं मला तो दिवा फेंकून द्यायला सांगत होतीस ना ? त्या दिव्याचे हे चमत्कार तरी पहा ! "

" बेटा, खरं सुख परमेश्वराच्याच कृपेमुळं मिळतं. मला वाटत नाहीं हें अन्न देवाच्या घरचं आहे ! " ती म्हणाली.

नंतर अल्लाउद्दीन आईबरोबर जेवायला बसला. अगदीं पोट भरेपर्यंत त्यानं त्या थाळ्यांतले जिन्नस खाल्ले. राहिलेले जिन्नस त्यांनीं दुसऱ्या दिवसासाठीं ठेवले. नंतर अल्लाउद्दिनानं त्यांतली एक थाळी आपल्या झग्याखालीं घातली आणि ती विकण्याच्या उद्देशानं त्या यहुद्याला शोधायला तो निघाला.

परंतु रस्त्यावर एका नामांकित आणि जुन्या अशा जवाहिऱ्याचं दुकान होतं. तो व्यापारी अत्यंत प्रामाणिक होता. परमेश्वराची त्याला भीति वाटत असे. जेव्हां त्या शेखनं अल्लाउद्दिनाला इकडे तिकडे पहात जातांना पाहिलं तेव्हां त्यानं त्याला विचारलं, " बेटा, तुला काय पाहिजे आहे ? त्या पलीकडच्या यहुद्याशीं कसलातरी सौदा करतांना आणि माझ्या दुकानावरून जातांना मी कितीवेळां तरी तुला पाहिलं आहे. तूं त्याला कांहीं बारीक सारीक वस्तू विकतोस ना ? मला वाटतं आतांहि तुला कांहींतरी विकायचं आहे म्हणूनच तूं त्याला शोधीत आहेस. खरं ना ? पण तूं त्या यहुद्याकडे जाऊं नकोस. तो लुच्चा आणि विश्वासघातकी इसम आहे. हे यहुदी कधींच लोकांचं भलं करीत नाहींत. नेहमीं ते त्यांना फसवितात; आणि तूं ज्याच्याशीं व्यवहार करतोस तो तर सर्वांत अग्रगण्य आहे. तुला कांहीं विकायचं असेल तर मला दाखव. देवाशपथ मी तुला योग्य तीच किंमत देईन. "

अल्लाउद्दिनानं आपल्या आंगरख्यांतून ती थाळी बाहेर काढून त्या व्यापाऱ्याकडे दिली. त्यानं ती घेऊन तिचं वजन केलं आणि अल्लाउद्दिनाला विचारलं, " यांपैकीं एकादी तूं त्या यहुद्याला विकलीस काय ? "

" होय " अल्लाउद्दीन म्हणाला, " यांपैकीं थोडया आणि शिवाय दुसरी एक मोठी मी त्याला विकली. "

" या एकाची काय किंमत दिली त्यानं तुला ? " व्यापाऱ्यानं विचारलं.

" एक दिनार. " अल्लाउद्दीन म्हणाला.

" एक दिनार ! " व्यापारी आश्चर्यानं म्हणाला. " परमेश्वरा, सच्चा लोकांना फसविणाऱ्या या लोकांपासून आमचं रक्षणं कर ! " नंतर तो अल्लाउद्दिनाला म्हणाला, " बेटा, खरोखरच तुला त्या भोंदू यहुद्यानं फसविलं आहे. ही थाळी शुद्ध सोन्याची असून तिची किंमत सत्तर दिनार होईल तुला ती विकायची असेल तर मला दे आणि हे पैसे घे ! "

अल्लाउद्दिनानं ती थाळी त्यालाच विकली आणि त्याच्याकडून सत्तर दिनार मोजून घेतले. नंतर अल्लाउद्दीन त्या व्यापाऱ्याचे आभार मानून तो आपल्या घरीं आला.

त्यानंतर जेव्हां जेव्हां पैसे संपत तेव्हां तो दुसरी थाळी नेऊन त्या व्यापाऱ्याला विकी आणि अशा तऱ्हेनं तो व त्याची आई दोघं चांगल्या स्थितींत राहूं लागलीं. परंतु आपली मध्यमवर्गांतल्या लोकांची रहाणी त्यांनीं सोडली नाहीं कीं चैनीसाठीं वारेमाप पैसा उधळला नाहीं.

अल्लाउद्दिनाचा अल्लडपणा आतां गेला होता. त्याला आतां उनाड भटक्या पोरांची संगत नकोशी झाली होती. त्याच्या अंगांत आतां पोक्तपणा आला होता. तो चांगल्या चांगल्या लोकांकडे जाऊं लागला. दररोज बाजारांत जाऊन थोरामोठ्यांकडे बसून खरेदी विक्रीची तों माहिती मिळवूं लागला. पैसा कसा गुंतवावा याबद्दल त्यांचा सल्ला घेऊं लागला. सराफकट्टा, मोती-बाजार या ठिकाणीं जाऊन हिरे, माणकं, मोत्यें वगैरे मौल्यवान खडे कसे विकले जातात ह्याचा त्यानं अभ्यास केला. आतां त्याला कळून चुकलं कीं भुयारांतल्या त्या खजिन्याच्या बागेंत जीं फळं त्यानं तोडलीं होतीं ते काचेचे मणी अगर स्फटिकाच्या वस्तू नसून शुद्ध, अतिमौल्यवान आणि दुर्मिळ अशीं रत्नं आहेत. आतां तो समजून चुकला कीं आपल्याजवळ जेवढी संपत्ती आहे तेवढी राजाधिराजाजवळ सुद्धां सांपडणार नाहीं. त्यानं मोतीबाजारांत मोठ्यांत मोठीं अशीं मौल्यवान रत्नं पाहिलीं. परंतु त्या व्यापाऱ्याकडे असलेलीं मोठ्यांत मोठीं रत्नं त्याच्याकडे असलेल्या लहानांत लहान रत्नांशीं देखील तुलना करूं शकत नव्हती त्यानं दररोज बाजारांत जाऊन व्यापाऱ्यांशीं मैत्री जोडली. त्यांची सदिच्छा व प्रेम संपादन केलं. त्यांच्याकडून खरेदी विक्रीची आणि मौल्यवान रत्नं व टाकावू रत्नं कशीं ओळखावीं ह्याबद्दलची संपूर्ण माहिती मिळवली. अशा तऱ्हेनं सारी माहिती मिळवून

झाल्यावर एके दिवशीं प्रात:काळीं उठून चांगले कपडे घालून तो मोती-बाजाराकडे जायला निघाला.

तो रस्त्यानं जात असतांनाच सुलतानाच्या नोकरांनीं ठोकलेली ललकारी त्याच्या कानांवर आली, " ऐका हो ऐका. ह्या नगरांतील समस्त जनहो ऐका. आमच्या धन्याची, जो पृथ्वी आणि समुद्र यांचा अधिपती आहे, त्याची कन्या बाद्र अल् बुदूर हिचा विचार हमामखान्याकडे जाण्याचा आहे. तेव्हां लोकांनीं, व्यापाऱ्यांनीं, आपआपलीं घरं आणि दुकानं बंद करून घराच्या आंतल्या भागांत बसावं. अस जो करणार नाहीं त्याला तावडतोब देहांताची शिक्षा देण्यांत येईल होऽऽऽ ! "

अल्लाउद्दिनानं जेव्हां ही सनसनाटी ऐकली तेव्हां त्यानं सुलतानाच्या मुलीला पहाण्याचा निश्चय केला. ती फार सुंदर आहे अशी तिची सर्वत्र ख्याती पसरली होती. सर्व तिच्या सौंदर्याची वाखाणणी करीत होते. तें ऐकल्यापासून अल्लाउद्दिनाच्या मनांतून तिला एकवार पहायचं होतं. परंतु त्याला कधींच तशी संधी मिळाली नव्हती. आज अचानक ती संधी प्राप्त झाली. पण मोठा प्रश्न होता तो, ती दृष्टीस पडणार कशी ? तो युक्ति शोधूं लागला. विचार करतां त्याला एकच मार्ग दिसला आणि तो म्हणजे हमामखान्याच्या दरवाजाजवळ मागं लपून रहायचं. म्हणजे ती आंत येतांच तिचं दर्शन घडेल.

ह्या युक्तीप्रमाणंच त्यानं वागण्याचा निश्चय केला आणि तो कुठं वेळ फुकट न दवडितां सरळ हमामखान्याकडे गेला. ती यायच्या पूर्वी आंत जाऊन तो दरवाजामागें लपून राहिला. तो तिथं लपून राहिला आहे हें कुणालाहि दिसत नव्हतं. परंतु त्याला मात्र सारं दिसत होतं.

राजवाड्यांतून निघाल्यावर सुलतानाच्या मुलीनं शहरभर चक्कर मारली. ती बाजारपेठेंत गेली आणि इकडलीं तिकडलीं दृश्यें पहात ती हमामखान्याकडे आली. आंत शिरतांच तिनं आपल्या तोंडावरचा बुरखा दूर केला——

——आणि अल्लाउद्दिनाला तिचं दर्शन घडलं. तिचं तें असामान्य सौंदर्य पाहून त्याचे डोळे दिपून गेले. तो स्वतःशींच म्हणाला,, " ज्यानं हें असामान्य सौंदर्य निर्माण केलं त्या परमेश्वराची धन्य होय ! " तिचं सौंदर्य

पाहून त्याची शक्तीच नष्ट झाली. त्याचे विचार स्वैर भटकूं लागले. त्याची दृष्टी बदलली.

आणि जेव्हां तो घरीं आला तेव्हां तो आनंदानं अगदीं बेहोष झालेला होता. त्याच्या आईनं त्याला काय झालं म्हणून विचारलं परंतु उत्तर द्यायला त्याच्या तोंडांतून शब्दहि बाहेर येईना. तिनं त्याच्यापुढं सकाळची न्याहारी ठेवली तरीसुद्धां तो भानावर आला नाहीं. तेव्हां तिनं विचारलं, " अरे, तुला आज झालंय तरी काय ? तुला बरं वाटत नाहीं का ? कीं तुझ्यावर कोणतं संकट आलं आहे ? नेहमींप्रमाणं तूं बोलत कां नाहींस ? गप्प बसून कां राहिला आहेस ? "

अजूनपर्यंत अल्लाउद्दिनाला सर्व स्त्रिया आपल्या आईसारख्याच वाटत होत्या. त्यानं बाद्र अल् बुदूरबद्दल खूप ऐकलं होतं. पण सौंदर्य आणि सौष्ठव म्हणजे काय ह्याची त्याला कल्पनाच नव्हती, परंतु तिच्या दर्शनानं त्याला सौंदर्याची कल्पना आली. त्याचं मन सारखं तिच्याबद्दल विचार करूं लागलं. त्यामुळं तो आपल्या आईकडे वळून म्हणाला, " आई मला कांहीं होत नाहीं. मला नुसता शांत पडून राहूं दे ! "

परंतु आईनं त्याला न्याहारी करण्याचा सारखा आग्रह केला. तेव्हां तो नुसता पुढं झाला. परंतु एकाहि पदार्थाला त्यानं हात लावला नाहीं. त्यांच्याकडे नुसता पहात राहिला आणि नंतर उठून आपल्या बिछान्यावर पाय लांब करून पडून राहिला. रात्र गेली आणि सकाळ उजाडली तरी सुद्धां तो तसाच पडून होता.

पुन्हां दुसऱ्या दिवशींसुद्धां हीच स्थिति ! तेव्हां मात्र त्याच्या आईला भीति वाटली. अल्लाउद्दिनाची तशी स्थिति व्हायला खरं कारण काय झालं तें तिला माहीत नव्हतं. तिला वाटूं लागलं, त्याला कोणता तरी आजार झाला आहे. तेव्हां तिनं त्याला प्रेमानं आपल्याजवळ घेतलं आणि ती त्याला म्हणाली, " बेटा, तुला काय होतंय तें मला सांग. कुठं दुखत असलं तर तें म्हणजे मी हकीमाला घेऊन येतें. आजच या शहरांत अरबी देशांतील एक प्रसिद्ध हकीम आला आहे. आपल्या सुलतानानं त्याला मुद्दाम बोलावून घेतलं आहे. तो फारच हुषार आहे असं सर्वत्र बोललं जातं. तूं जर आजारी असलास तर मी त्याला बोलावून आणतें. "

आईनं हकिमाला बोलविण्याचं ठरविलेलं पाहून तो म्हणाला, " आई, मी शरिरानं मुळींच आजारी नाहीं. कालपर्यंत माझी समजूत होती कीं, सर्व स्त्रिया तुझ्याच सारख्या आहेत. पण काल मी सुलतानाची मुलगी बाद्र अल् बुदर हिला हमामखान्याकडे जातांना पाहिलं !" असं म्हणून त्यानं घडलेली सारी हकीगत तिला सांगितली आणि तो म्हणाला, " आई, काय सांगू तुला ? तिचं तें अप्रतिम लावण्य पाहून मी अगदीं थक्क होऊन गेलों. माझं हृदय आनंदानं नाचूं लागलं. मी सुलतानाकडे जाऊन तिला मागणी घालणार आहें."

जेव्हां आईनं अल्लाउद्दिनाचं बोलणं ऐकलं तेव्हां तिला वाटूं लागलं कीं, खात्रीनं त्याला वेडच लागलं असलं पाहिजे. ती म्हणाली, " परमेश्वर तुझं रक्षण करो ! मला वाटतं तूं वेडा झाला आहेस."

" आई, मी वेडा नाहीं कीं खुळाहि नाहीं." अल्लाउद्दीन म्हणाला, " तुझ्या ह्या असल्या बोलण्यानं मी माझे विचार बदलीन असं जर तुला वाटत असेल तर मात्र ती तुझी चूक आहे. मी माझ्या निश्चयापासून तिळमात्रहि मागं सरणार नाहीं. जोंपर्यंत बाद्र अल् बुदूर हिच्याशीं माझं लग्न होणार नाहीं तोंपर्यंत मला दुसरं कांहीं एक सुचणार नाहीं. कशांतही मन रमणार नाहीं. तेव्हां मी खुद्द तिच्या बापाला म्हणजे सुलतानालाच जाऊन विचारणार आहें."

" बेटा, असल्या गोष्टी तूं बोलूं नकोस. त्याची आई घाबरून म्हणाली. " अरे भिंतीलासुद्धां कान असतात. तुझं हें बोलणं कुणीं ऐकलं तर तो तुला वेडयांत काढल्याशिवाय रहाणार नाहीं. तुझ्या डोक्यांतलं खूळ तूं काढून टाक. अरे ती गोष्ट काय सामान्य आहे ? समज, तुझा विचार सूज्ञपणाचा आहे. पण तूं सुलतानाची मर्जी कशी संपादन करणार ? "

" आई, ह्या कामांत तुझ्याशिवाय मला दुसरं कोण मदत करणार ? " अल्लाउद्दीन म्हणाला, " तुझ्याशिवाय माझ्यावर कोण प्रेम करणारं आहे ? तुझ्याशिवाय दुसर विश्वासू माणूस सांपडणं शक्य नाहीं. तेव्हां माझी इच्छा आहे कीं तूं स्वतःच माझा हा अर्ज सुलतानाच्या चरणीं सादर करावास..."

" परमेश्वर असल्या कृत्यापासून मला दूर ठेवो !" ती एकदम घाबरून म्हणाली, " तुझ्यासारखी माझी बुद्धी कांहीं चळलेली नाहीं. बेटा, असले

विचार तूं आपल्या मनांतून साफ काढून टाक. तूं कुणाचा मुलगा आहेस हें लक्षांत घे. तूं एका गरीब आणि हीन अशा शिंप्याचा पोरका पोर आहेस. तुझी आईसुद्धां एका अत्यंत गरीब कुळांतली आहे. असं असूनसुद्धां तूं सुलतानाच्या मुलीशीं लग्न करण्याची अपेक्षा कशी धरतोस ! सुलतान तिचं लग्न आपल्या तोडीच्या सुलतानाशींच करून देणार ! आपल्यापेक्षां हलक्या कुळांतल्या माणसाला तो आपली मुलगी खात्रीनं नाकारील ! "

आईचं बोलणं पुरं होईपर्यंत अल्लाउद्दीन शांतपणं बसून राहिला आणि नंतर म्हणाला, " तूं जें आतां म्हणालीस तें सारं मला माहीत आहे. मल हेंहि ठाऊक आहे कीं, मी एका गरीब आईबापांचा मुलगा आहे. तरीसुद्धां तुझं बोलणं ऐकून माझ्या निर्धारांत जराहि फरक होणार नाहीं. आई, मी तुझाच मुलगा असेन व तुझें माझ्यावर प्रेम असेल तर तूं माझं हें काम केलंच पाहिजेस. नाहींतर तूं मला ठार तरी मारून टाक. माझं तिच्याशीं लग्न झालं नाहीं तर खात्रीनं मला मृत्यु येणार. आतां सांग मी तुझा खरा-खुरा मुलगा आहें ना ? "

मुलाचं तें बोलणं ऐकून तिला फार दुःख झालं. तिच्या डोळ्यांतून अश्रू गळूं लागले. ती खूप रड रड रडली आणि शेवटीं म्हणाली, " तूं खरा खुरा माझा मुलगा आहेस. तुझ्याशिवाय मला दुसरं कोण आहे ? माझी अंतिम इच्छा हीच आहे कीं, तुझं लग्न करून देऊन तुला आनंदित करावं. पण तूंच जरा विचार कर, आपल्या तोलाच्या एखाद्या मुलीला मागणी घातली तरी तिचे नातलग तावडतोब विचारतील तुमच्याकडे जमीन किती आहे ? तुमची फळांची बाग आहे काय ? तुमच्याकडे कांहीं माल आहे का ? तिला पोसण्या-इतकी तुमची ताकद आहे का ? मग मी त्यांना काय उत्तर देणार ? आणि मी जर आपल्यासारख्या गरीबांना उत्तर देऊं शकलें नाहीं तर मग मी सुल-तानाच्या मुलीला कशी मागणी घालूं ? आज आपल्या या सुलतानाच्य तोडीचा दुसरा सुलतान या चीन देशांत आहे काय ? तेव्हां तूंच विचार कर कीं त्याच्या मुलीला एका शिंप्याच्या मुलानं मागणी कशी घालावी तें ! असं करणं म्हणजे आपल्यावर संकट ओढवून घेण्यासारखं आहे. कदाचित् असं विचारणं म्हणजे सुलतानाकडून मरणाचं आमंत्रणच घेण्यासारखं आहे. आपल्या दोघांचाहि निकाल एकदमच लागायचा ! माझ्या हातून असं संकटाला

आव्हान देण्याचं कृत्य कधींच होणार नाहीं. मी सुलतानाला त्याच्या मुलीबद्दल कसं विचारूं तें तूंच सांग. शिवाय मला त्याच्या राजवाड्यांत प्रवेश कसा मिळायचा ? आणि समजा, प्रवेश मिळाला तर आपल्या आर्थिक स्थितीबद्दल मी काय सांगूं ! खात्रीनं तो मला वेडी समजेल. आणि समज, मी सुलतानापुढं गेलें तर त्याला नजराणा काय नेणार ? आपला सुलतान सौजन्यशील आहे ही गोष्ट खरी आहे. जो मनुष्य न्यायासाठीं येतो त्याला तो न्याय देतो. अगर तो जें कांहीं मागेल तें देतो. तो उदार आहे आणि तो दातृत्वाची खैरात करतो हें अगदीं सत्य असलं तरी तो तें प्रत्येकाच्या योग्यतेनुसार करतो. ज्यांनीं लढाईमध्यें मर्दुमकी गाजविली असेल अगर ज्यांनीं नागरिकांची फार सेवा केली असेल अशांनाच त्या गोष्टी प्राप्त होतात. पण तूं अशी कोणती मर्दुमकी त्याच्यापुढं गाजविली आहेस कीं तूं त्याच्या औदार्याची अपेक्षा करावीस ? शिवाय आपण भलतंच मागणं मागणार आहोंत. तेव्हां आपण जें मागूं तें सुलतान देणें शक्य नाहीं. कारण जे सुलतानाला भेटायला जातात ते सुलतानाला योग्य तो नजराणा घेऊन जातात. तूं कोणत्या तोंडानं सुलतानापुढं उभा रहाणार आणि त्याच्या मुलीला लग्नाची मागणी घालणार ? त्याच्या योग्यतेला शोभेल असं त्याला देण्यासाठीं तुझ्याकडे कांहीं आहे काय ?"

आईचं हें सारं बोलणं ऐकल्यावर तो कांहींसा हर्षानं म्हणाला, "हं, आतां तूं मुद्याला धरून बोललीस; आणि मला योग्य त्या गोष्टीची आठवण करून दिलीस. आई, मी जी गोष्ट विसरलों होतों तिची तूं बरी आठवण करून दिलीस. तूं म्हणालीस सुलतानाच्या मुलीला मागणी घालायला माझ्याकडे कांहीं नाहीं. परंतु त्याला देण्यासाठीं माझ्याकडे जी वस्तू आहे तिची बरोबरी पृथ्वीवरील कोणताही बादशहा अगर सम्राट करूं शकणार नाहीं. मी जें अजूनपर्यंत कांचेचे मणी आणि स्फटिकाचे तुकडे समजत होतों तीं अत्यंत मौल्यवान रत्नं आहेत. त्यांतील लहानांची बरोबरी करणारीं रत्नं जगसम्राटांच्या खजिन्यांत सांपडणार नाहींत. जवाहिऱ्याबरोबर राहून मला त्यांची किंमत कळली आहे. तीं अत्यंत मौल्यवान् अशीं रत्नं आहेत. तेव्हां तूं आतां शांत रहा. आपल्या घरांत चिनीमातीचा जो घडा आहे तो आण इथं ! मी तीं सारीं रत्नं त्या घड्यांत अगदीं व्यवस्थितपणं ठेऊन देतों. मग

तूं तो घेऊन सुलतानाकडे जा आणि माझा अर्ज त्याला सादर कर. ह्या रत्नांमुळं तुझं काम सुकर होईल. या उप्परहि जर तूं नाराज होशील आणि माझ्या लग्नाचा प्रयत्न करणार नसशील तर मात्र मी खात्रीनं मेल्याशिवाय रहाणार नाहीं. आई, तूं असं समजूं नकोस कीं माझी ही देणगी कमी किमतीची आहे. मोतीबाजारांत मिळविलेल्या ज्ञानावरून मी सांगतों कीं आपल्या ह्या रत्नांच्या कितीतरी पटीनं हलक्या असलेल्या रत्नांची किमत खूप असते. मग माझ्याकडे असलेलीं हीं रत्नं तर अनमोल आहेत. त्याची किमत करणं बड्या जवाहिऱ्यालांही शक्य नाहीं. तेव्हां आतां मी सांगितल्याप्रमाणं तो मातीचा घडा आण बघूं. मी तीं रत्नं त्यांत व्यवस्थित रीतीनं मांडून ठेवतों."

मुलाच्या सांगण्याप्रमाणं तिनं तो चिनीमातीचा घडा आणून त्याच्या पुढ्यांत ठेवला आणि तीं रत्नं खरोखरीच किमती आहेत कीं काय तें पाहूं लागली.

अल्लाउद्दिनानं कोपऱ्यांत ठेऊन दिलेलीं तीं रत्नं काढून त्या घड्यांत व्यवस्थित रीतीनं रचून ठेविलीं. आणि जेव्हां तो घडा रत्नांनीं काठोकाठ भरला तेव्हां त्याच्या आईचे डोळे त्यावर ठरेनात. त्या रत्नांचा प्रकाशाप्रमाणं पडणारा उजेड पाहून तिचे डोळे दिपून गेले. तें दृश्य पाहून तिचीं मती कुंठित झाली. आतां तिला कळून चुकलं कीं, त्यांची किमत लहान सहान नाहीं तर अगदीं भरमसाठ आहे. तिची आतां खात्री पटली कीं आपला मुलगा म्हणाला होता कीं असलीं रत्नं मोठ्यांतल्या मोठ्या बादशहाकडे सुद्धां सांपडणार नाहींत म्हणून तें अगदीं सत्य आहे.

नंतर अल्लाउद्दीन आपल्या आईकडे वळून म्हणाला, "आई, आतां तुझी खात्री झालीच असेल कीं सुलतानाकडे जाणारा हा नजराणा किती महत्त्वाचा आहे तो! मला आशा आहे कीं हा नजराणा पहातांच सुलतान तुला मोठ्या आदरानं वागविल्याशिवाय रहाणार नाहीं. आतां तूं सरळ ऊठ आणि सुलतानाकडे जा."

"बेटा, हा नजराणा बहुमोल आहे हें अगदीं खरं आहे." त्याची आई म्हणाली. "तरी पण सुलतानापुढं जाऊन त्याच्या मुलीसाठीं मागणी घालण्याचं धारिष्ट कोण करणार? मला वाटतं माझ्यानं तें धारिष्ट होणार

नाहीं. मला काय पाहिजे म्हणून त्यानं विचारलं तर मी त्याला त्याची मुलगी पाहिजे असं सांगूं शकणार नाहीं. माझ्या तोंडांतून शब्दच बाहेर यायचा नाहीं; आणि समजा मी त्याला सांगितलं कीं त्याची मुलगी बाद्र अल्-बुदूर माझ्या मुलासाठीं पाहिजे तर तो मला वेडी समजून माझी हेटाळणी करील. मग मी एकटीच मरणाच्या खाईंत न पडतां माझ्या बरोबर तूंही त्यांत पडशील. तरी पण तुझ्या इच्छेप्रमाणं मला धीर करून राजवाड्यांत गेलंच पाहिजे. पण समज, सुलतानाला मी तुझी इच्छा सांगितली आणि त्यानं मला विचारलं कीं तुझ्याकडे मालमत्ता किती आहे, तुझ्याकडे पैसा किती आहे, तर मग मी त्याला काय सांगूं ?"

"आई, त्याबद्दल तूं मुळींच काळजी करूं नकोस." अल्लाउद्दीन म्हणाला, "ह्या रत्नांचं वैभव पाहून सुलतान तसा प्रश्न करणंच शक्य नाहीं. तुझ्या डोक्यांतल्या साऱ्या शंकाकुशंका तूं काढून टाक आणि सरळ राजवाड्यांत जा. तुला माहीत आहे कीं आपल्याकडे जादूचा दिवा आहे. त्याचा प्रताप तूं पाहिलेला आहेसच. आपल्याला जें हवं तें तत्काळ मिळूं शकतं. त्या जोरावर मी सुलतानानं कांहींहि मागितलं तरी तें एका क्षणांत त्याच्यापुढं हजर करीन !"

अल्लाउद्दिनाच्या आश्वासनानं तिचं बरंच समाधान झालं. नंतर बरीच रात्र होईपर्यंत त्यांनीं त्या गोष्टीवर चर्चा केली. मग तीं दोघं झोपी गेलीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळींच उठून अल्लाउद्दिनाच्या आईनं आंघोळ उरकून घेतली. नास्ता वगैरे झाल्यावर मग तिनं रत्नांनीं भरलेला तो चिनी-मातीचा घडा एका रुमालांत बांधून घेतला; आणि देवाचं नांव घेऊन ती राजवाड्याकडे जायला निघाली. परंतु ती जाण्यापूर्वी अल्लाउद्दीन तिला म्हणाला, "आई, त्या दिव्याचा प्रताप तुला माहीत आहेच. पण तूं त्याच्या गुणाबद्दल कुणाकडेही बोलूं नकोस. कारण तो दिवाच आपलं सर्वस्व आहे. कुणाला त्याबद्दल समजलं तर तो आपल्यापासून कुणीतरी पळवून नेईल. मग आपल्याला त्याच्या योगामुळं जी धनदौलत मिळत आहे ती नाहींशी होईल ? "

"बेटा, त्याबद्दल तूं मुळींच काळजी करूं नकोस." त्याची आई

म्हणाली, " प्राण गेला तरी ती गोष्ट माझ्या तोंडांतून कधीं बाहेर फुटणार नाहीं ! "

आणि मग ती राजवाड्याकडे जायला निघाली आणि राजदरबारांत गर्दी व्हायच्या अगोदर जाऊन पोंचली.

ती दरबारांत पोंचली तेव्हां विशेष कोणी आलेले नव्हते. सर्व अमीर, उमराव, सरदार, मंत्री आणि मुख्य वझीर आल्यावर मग सुलतानाची स्वारी दरबारांत येऊन राजसिंहासनावर विराजमान झाली. सुलतान येतांच सर्व दरबारवासी लोक त्याच्या सन्मानार्थ उठून उभे राहिले आणि बसण्यासाठीं त्याच्या अनुज्ञेची वाट पाहूं लागले. जेव्हां त्यांना बसण्याची आज्ञा मिळाली तेव्हां ते सारे आपआपल्या जागेवर बसले. नंतर कोर्टकचेरीचं काम सुरू झालं. सुलतान लोकांचीं गाऱ्हाणीं ऐकून घेऊन त्यांना न्याय देऊं लागला. कोर्टकचेरीचं काम संपतांच दरबार बरखास्त झाला. सुलतान उठून आपल्या महालांत निघून गेला. वझीर आणि इतर मंत्री आपआपल्या घरीं निघून गेले.

जेव्हां अल्लाउद्दिनाच्या आईनं सुलतान आपल्या जनानखान्यांत गेलेला पाहिला तेव्हां ती आपल्या घरीं परतली.

आपली आई रत्नांनं भरलेला तो घडा घेऊन परत आलेली पाहून अल्लाउद्दिनाच्या मनांत आलं कीं, खात्रीनं तिच्यावर कसलातरी दुर्धर प्रसंग ओढवला असला पाहिजे. परंतु त्यानं आपण होऊन तिला कांहीं विचारलं नाहीं. तिनं घडा पेटींत नीट ठेऊन दिला आणि आराम करीत बसली. जरा दम खाल्ल्यावर मग तिनं दरबारांत घडलेली सर्व हकिकत कथन केली आणि शेवटीं ती म्हणाली, " बेटा, आतां माझ्या अंगांत बरंच धैर्य आलं आहे. दरबारांत उभं रहाण्याची हिंमत माझ्यांत आली आहे खरं म्हणजे आज सुलतानाशीं बोलायला मी घाबरलें. माझ्यासारखे आणखी कितीतरी लोक होते कीं त्यांनाही सुलतानाची मुलाखत पाहिजे होती. पण तूं आतां निराश होऊं नकोस. मी पुन्हां उद्यां दरबारांत जाईन आणि सुलतानाशीं बोलेन. "

जेव्हां अल्लाउद्दिनानं आपल्या आईचे हे शब्द ऐकले तेव्हां त्याला फार आनंद झाला. तो लग्नाला अगदीं अधीर झाला होता. तरी त्यानं

आपलं मन शांत ठेवलं. त्या रात्रीं दोघं मायलेकरं शांत चित्तानं झोपी गेलीं.

दुसऱ्या दिवशीं अल्लाउद्दिनाची आई उठली आणि तो घडा घेऊन दरबारांत गेली. परंतु दरबार बंद होता. तिनं चौकशी केली तेव्हां तिला कळलं कीं सुलतान फक्त आठ दिवसांतून एकदांच दरबार भरवतो. नंतर ती घरीं आली. त्यानंतर ज्या दिवशीं दरबार भरे त्या दिवशीं ती दरबारांत जाई आणि सुलतानासमोर उभी राही. परंतु सुलतानाशीं बोलायची कांहीं तिची पाळी आली नाहीं. अशा तऱ्हेनं एक महिना निघून गेला.

ती प्रत्येक दरबाराला येते हें सुलतानानं पाहिलं होतं. परतु एकही वेळ तिनं त्याच्याशीं बोलण्याचं धारिष्ट दाखविलं नाहीं. एक दिवस दरबार संपल्यावर सुलतान वझीरासमवेत आपल्या महालांत जातांना म्हणाला, "गेल्या सहा सात दरबारांच्या वेळीं मी एका म्हाताऱ्या बाईला पहातों. तिच्या हातांत बांधलेलं कांहींतरी असतं. तुला त्याबद्दल कांहीं माहीत आहे काय? दरखेपेला दरबारांत येण्यांत तिचा उद्देश काय आहे?"

"खाविंद," वझीर नम्रपणानं म्हणाला, "मला वाटतं ती बाई वेडी असली पाहिजे. कदाचित् ती आपल्या नवऱ्याबद्दल तक्रार करण्यास येत असेल अगर तिला दुसऱ्या कुणाबद्दल तरी तक्रार करायची असेल."

परंतु वझीराचं हें उत्तर सुलतानाला आवडलं नाहीं. त्यानं वझीराला फर्माविलं, "पुढल्या खेपेला ती दरबारांत आली तर तिला माझ्यापुढं हजर कर!"

"जशी आपली आज्ञा!" वझीर म्हणाला.

एके दिवशीं नेहमींप्रमाणं दरबार भरला असतांना सुलतानानं जल्लाउद्दिनाच्या आईला उभी असलेली पाहिली. तेव्हां तो वझीराकडे वळून म्हणाला, "जिच्याबद्दल मी मागच्या खेपेला बोललों होतों ती बाई पहा उभी आहे. तिला ताबडतोब माझ्यासमोर घेऊन ये! तिची काय फिर्याद आहे ती मी ऐकून घेईन."

हें ऐकतांच वझीरानं तत्काळ तिला सुलतानापुढं उभं केलं. सुलतानासमोर येतांच तिनं रीतीप्रमाणं मुजरा करून त्याच्या वैभवाचे गुण गाऊन त्याचं शुभ चिंतून ती उभी राहिली.

सुलतान तिला म्हणाला, " बाई, दर दरबारचे वेळीं मी तुला उभी असलेली पाहतों. पण तूं चकार शब्द बोलली नाहींस. तेव्हां तुझं काय काम आहे तें मला सांग म्हणजे मी तें पूर्ण करीन. "

ती पुन्हां मुजरा करून म्हणाली, " सरकार, आधीं मला अभय द्या म्हणजे मग मी माझा अर्ज आपल्यापुढं ठेवीन ! "

सुलतानाला तिची काय फिर्याद आहे ती ऐकून घेण्याची उत्सुकता लागून राहिली होती. शिवाय तो अत्यंत कोमलहृदयी होता. त्यामुळं लगेच त्यानं तिला अभय दिलं आणि आपल्या सभोंवतालच्या परिवाराला रजा दिली. फक्त तो आणि वझीरच काय ते तिथं राहिले. नंतर सुलतान म्हणाला, " तुला मी अभय दिलं आहे. तेव्हां जराहि न घाबरतां तुझी फिर्याद काय आहे ती सांग. "

सुलतानानं अभय दिलेलें पाहून अल्लाउद्दिनाच्या आईला बराच धीर आला. ती म्हणाली, " खाविंद, सारं सांगण्याच्या अगोदर मी आपली क्षमा मागतें. मला अल्लाउद्दीन नांवाचा एक मुलगा आहे. एकदां आपली मुलगी बाद्र अल् बुदूर हमामखान्याकडे जात असतांना त्याच्या मनांत तिला पहाण्याची अनिवार इच्छा झाली. म्हणून जिथून तिला नीटपणं पहातां येईल अशा ठिकाणीं तो लपून बसला. ती जागा हमामखान्याच्या दरवाज्याच्या मागील बाजूस होती. ती जेव्हां आंत आली तेव्हां त्यानं तिला पाहून घेतलं आणि त्या दिवसापासून त्याला तिच्याशिवाय कांहींएक सुचत नाहीं. त्याला जगण्यांत कांहींच गोडी वाटेनाशी झाली आहे. म्हणून तिला मागणी घालण्यासाठीं त्यानं मला आपल्या चरणांकडे पाठवलं आहे. त्याच्या डोक्यांतली कल्पना घालवल्याचा मी बराच प्रयत्न केला, पण मला त्यांत यश आलं नाहीं. तो मला म्हणाला, ' आई, माझं जर तिच्याशीं लग्न झालं नाहीं तर मी जगणं शक्य नाही ! ' म्हणून मी या सर्व गोष्टी आपल्या कानावर घालण्यासाठीं म्हणून इथं आलें आहें. खाविंद, मला माझ्या धारिष्टयाबद्दल क्षमा करतील अशी आशा आहे. "

सुलतानानं तिचं हें बोलणं ऐकलं तेव्हां त्याला तिची दया आली. त्यानं न रागावतां हंसत विचारलं. ' " तूं नजराणा काय आणला आहेस ? त्या रुमालाखालीं काय आहे ? "

सुलतानाच्या या बोलण्याचं तिला आश्चर्य वाटलं. तिची कल्पना होती कीं, आपल्या बोलण्यानं सुलतान भयंकर भडकल्याशिवाय रहाणार नाहीं. परंतु तो रागावला नाहीं असं पहाताच तिनं रुमाल काढला आणि रत्नं असलेलं तें पात्र त्याच्यापुढं ठेवलं. त्याबरोबर तो दिवाणखाना रत्नांच्या प्रकाशानं खुलून गेला. खुद्द सुलतान त्या अनमोल रत्नांच्या तेजानं आश्चर्यांत बुडून गेला. त्याच्या तेजानं आणि आकारानं त्याची मति गुंग झाली. आपण स्वप्नांत तर नाहीं ना असं त्याला वाटूं लागलं. तो म्हणाला, " अजूनपर्यंत ह्या रत्नांसारखी रत्नं मी पाहिलीं नव्हतीं. ह्यांपैकीं एकसुद्धां माझ्या खजीन्यांत सांपडणार नाहीं ! " असं म्हणून त्यानं आपल्या वझीराकडे वळून विचारलं, " वझीरा, तुझं काय मत आहे ? तुझ्या आयुष्यांत अशीं मौल्यवान आणि सुंदर रत्नं तूं पाहिलीं आहेस काय ? "

" नाहीं ! " वझीर त्या रत्नांच्या तेजानं थक्क होऊन म्हणाला; " खाविंद, या रत्नांच्या तोडीचं एकही रत्न आपल्या खजीन्यांत नाहीं. "

" मला वाटतं ज्यानं मला नजराणा म्हणून ही रत्नं पाठविलीं आहेत तोच माझ्या मुलीचा नवरा होण्याला योग्य आहे. कारण त्याच्या तोडीचा दुसरा कोणीही लायक तरुण माझ्या मुलीला नवरा म्हणून मिळणं शक्य नाहीं ! " सुलतान म्हणाला.

जेव्हां वझीरानं त्याचे हे शब्द ऐकले तेव्हां त्याची जीभ टाळ्याला अडकली. त्याचा चेहरा दुःखानं केविलवाणा दिसूं लागला. कारण सुलतानानं त्याच्या मुलाला आपली मुलगी देण्याचं अगोदरच कबूल केलं होतं. त्यामुळं सुलतानाचा हा नवीन निर्धार पाहून त्याची बोबडीच वळली. परंतु थोड्याच वेळांत त्यानं स्वतःला सावरून घेतलं आणि अल्लाउद्दिनाच्या आईला ऐकूं यणार नाहीं अशा तऱ्हेनं तो सुलतानाला म्हणाला, " खाविंद, आपण आपली मुलगी माझ्या मुलाला देण्याचं कबूल केलं आहे. आपण माझ्या मुलाला तीन महिन्यांचा अवधि द्यावा. म्हणजे त्या काळांत माझा मुलगा यापेक्षांहि मौल्यवान नजराणा आपल्या चरणांपुढं आणून ठेवील ! "

सुलतानाला त्याचं तें बोलणं ऐकून हसूंच आलं. त्याची अगदीं खात्री होती कीं ती गोष्ट शक्य नाहीं. कारण अशीं रत्नं आणणं जेथें त्याच्या सारख्याला अगर मोठ्यांत मोठ्या सरदारालाहि शक्य नव्हतं तेथें वझिराचा

काय पाड ! परंतु त्याचं हृदय कोमल आणि कृपाळू असल्यामुळं त्यानं वझीराला तीन महिन्यांचा अवधि दिला. नंतर तो म्हातारीकडे वळून म्हणाला, "जा, तुझ्या मुलाला जाऊन सांग कीं, मी माझी मुलगी त्याला देईन म्हणून शब्द दिला आहे. आतां लग्नाच्या तयारीसाठीं तीन महिन्यांचा अवधि लागेल. तोंपर्यंत तुझ्या मुलाला दम धरण्यास सांग !"

सुलतानाचं हें आश्वासन ऐकल्यावर अल्लाउद्दिनाच्या आईनं त्याचे आभार मानले आणि ती आनंदाची बातमी मुलाच्या कानावर घालण्यासाठीं ती तत्पतेनं घरीं आली.

आईला घाईघाईनं घरीं आलेली अल्लाउद्दिनानं पाहिलं. शिवाय तिच्या चेहऱ्यावर हर्षहि दिसत होता. त्यानं कांहींसं उत्सुकतेनं विचारलं, "आई, तूं मला मोठ्या आनंदाची चांगली बातमी आणलेली दिसते. त्या रत्नांनीं तुझं काम झालं कीं नाहीं ? तसंच तुझी विनंती ऐकून सुलतानानं तुला नीट वागविलं कीं नाहीं ?"

तिनं त्याला सर्व हकीगत सांगितली. त्या रत्नांच्या असाधारण आकारानं व त्यांच्या अमोल पाणीदारपणानं तो व वझीरहि कसा खूष झाला. तें सांगून. सुलतानानं आपली मुलगी देण्याचा शब्द दिल्याचंहि सांगितलं. नंतर ती म्हणाली, "पण मला वाटतं वझीर आणि सुलतान ह्यांच्यांत कांहीं करार झालेला होता व सुलतानानं आपली मुलगी वझीराच्या मुलाला देऊं केलेली होती. ते दोघे एकत्र बोलले आणि मग सुलतानानं तीन महिन्यांचा अवधि दिला. म्हणूनच मला जरा भीति वाटते आहे कीं तो वझीर काहींना कांहीं कारवाई करून तुला बाजूला ढकलील आणि सुलतानाचं मन आपल्या बाजूला वळवून घोटाळा करील !"

अल्लाउद्दिनानं जेव्हां आईच्या तोंडून सारी हकीगत ऐकली व सुलतानानं आपली मुलगी देण्याचं कबूल केल्याचं ऐकलं तेव्हां त्याचा आनंद हृदयांत मावेना. तीन महिन्यांनीं सुलतानाची सुंदर कन्या बाद्र अल् बुदूर आपली पत्नी होणार ह्या बातमीनं त्याचं हृदय आनंदानं नाचूं लागलं. तो हर्षानं म्हणाला, "आई, सुलतानानं लग्नाबद्दल आपला शब्द दिला आहे. माझं हृदय आनंदानं उचंबळून आलं आहे." असं म्हणून तो पुढं म्हणाला, "तूं गेल्यामुळंच हें काम झालं. आई, अजूनपर्यंत मी मृत्यूच्या छायेंतच

होतों. पण त्या स्थितींतून तूं मला बाहेर काढलेस. या क्षणाला माझ्यासारखा कोणी भाग्यवान नाहीं अगर सुखी नाहीं !"

अशा तऱ्हेनं तीन महिन्यांतले दोन महिने अल्लाउद्दिनानं शांतपणें घालविले.

एके दिवशीं सायंकाळच्या वेळेस त्याची आई तेल आणायला बाजारांत गेली होती. परंतु तिथं जाऊन पहाते तों जवळ जवळ सर्व बाजारपेठ बंद झाली होती आणि सर्व शहरभर रोषणाई केली होती. लोकांनीं आपलीं घरं फुलांच्या माळांनीं सजवलेलीं होतीं. खिडक्याखिडक्यांतून मेणबत्त्या पेटवून ठेवल्या होत्या. लष्करी सैनिक, शरीररक्षक, खाजगी सैनिक रस्त्यावरून मिरवत जात होते. सर्वत्र अगदीं झगमगाट केला होता. तें मोहक आणि वैभवयुक्त दृश्य पाहून अल्लाउद्दिनाच्या आईला मोठा अचंबा वाटला. मोठ्या आश्चर्यानं ती तेल्याच्या दुकानीं गेली. अजून त्याचं दुकान उघड होतं. तिनं त्याच्याकडून पाहिजे असलेल्या वस्तू घेतल्या व ती त्याला म्हणाली, "चाचा, आज सर्व ठिकाणीं रोषणाई कां केली आहे ? सबंध शहर सजवलं आहे. सैनिक, रक्षक वगैरे जय्यत तयार आहेत. आज आहे तरी काय शहरांत ?"

तेल्यानं तिच्याकडे कांहींसं आश्चर्यानं पहात म्हटलं, "तूं या शहरांतली नसून कुणी परकी दिसतेस !"

"नाहीं, मी ह्या शहरांतलीच !" ती म्हणाली.

"तूं ह्या शहरांतली म्हणवतेस आणि वझीराचा मुलगा आणि सुलतानाची मुलगी बाद्र अल् बुदूर यांचं आज लग्न होणार आहे ह्याची तुला कल्पना नाहीं ? तो आतां हमामखान्यांत गेला आहे. हें सैन्य व रक्षक उभे आहेत ते त्याच्या येण्याची वाट पहात आहेत. तो येतांच त्याला ते मिरवत गाजवत राजवाड्यांत नेणार."

अल्लाउद्दिनाच्या आईनं त्याचे हे शब्द ऐकले तेव्हां तिला भयंकर धक्का बसला. तिचं चित्त ठिकाणीं राहिलं नाहीं. या दुःखी कहाणीची वार्ता अल्लाउद्दिनाला कशी सांगावी या विवंचनेंत ती पडली. कारण अल्लाउद्दिन पळापळानं त्या तीन महिन्यांच्या मुदतीची वाट पहात होता.

बाजारांतून ती सरळ घरीं परत आली आणि त्याला म्हणाली,

"बेटा, आतां तुला मी एक बातमी सांगणार आहें. पण ती तुला दुःखांत टाकणारी आहे म्हणून सांगायला माझं मन धजत नाहीं."

"सांग तर खरी, कोणती बातमी आहे ती ?" अल्लाउद्दिन उत्सुकतेनं म्हणाला.

तुला दिलेला शब्द सुलतानानं मोडला आहे. आज रात्रीं वझीराचा मुलगा आणि बाद्र अल् बुदूर यांची शादी आहे. मला वाटलंच होतं कीं, वझीर सुलतानाचं मन वळवील. कारण तो माझ्यासमोर कसा काय बोलला हें मी तुला सांगितलंच आहे."

"पण तुला ही बातमी कशी कळली ?"

त्याबरोबर तिनं आपण बाजारांत जातांना सारं शहर कसं शृंगारलं होतं, सैनिक, रक्षक, वझीराच्या मुलाला राजवाड्यांत घेऊन जाण्यासाठीं कसे सज्ज होते वगैरे सर्व हकिकत कथन केली.

तें ऐकतांच अल्लाउद्दिनाला भयंकर दुःख झालं. परंतु लगेच त्याचा चेहरा रागानं लालबुंद झाला. सुलतानानं आपल्याशीं विश्वासघात केला या जाणिवेनं त्याचं माथं भडकलं. परंतु लगेच त्याला त्या दिव्याची आठवण झाली. त्याबरोबर त्याचं चित्त ठिकाणावर आलं. तो शांतपणानं म्हणाला, "आई, तुझी शपथ घेऊन मी सांगतों कीं त्या वझीराच्या मुलाला मी सहज उडवून देईन. पण आतां आपण या गोष्टी इथंच सोडूं या. जेवल्यानंतर मी माझ्या खोलींत जाईन व मग सारं कांहीं ठाकठीक होईल !"

जेवणखाण झाल्यावर अल्लाउद्दीन आपल्या खोलींत गेला. त्यानं दरवाजा आंतून बंद करून घेतला व दिवा बाहेर घेऊन तो घासला—

—आणि त्याबरोबर एका क्षणार्धांत दिव्याचा सेवक त्याच्यापुढं हजर होऊन म्हणाला, "जें कांहीं पाहिजे तें माग. ज्याच्या हातांत हा दिवा आहे त्याचा मी चाकर आहें. काय आज्ञा आहे आपली ?"

"मी काय सांगतों तें ऐक !" अल्लाउद्दीन त्या राक्षसाकडे पहात म्हणाला, "मी सुलतानाच्या मुलीला मागणी घातली होती. सुलतानानं मला शब्द देऊन तीन महिन्यांनंतर तिचं माझ्याशीं लग्न करायचं वचन दिलं होतं. परंतु त्यानं आपला शब्द पाळला नाहीं. इतकंच नव्हे तर त्यानं तिला वझीराच्या मुलाला दिली आणि आज त्यांचं लग्न होणार आहे

तेव्हां मी तुला आज्ञा करतों कीं, त्या दोघांना उचल व येथें आण. हें मला तुझ्याकडूनच करून घेतलं पाहिजे !"

"आपली आज्ञा मला मान्य आहे !" राक्षस लीनपणानं म्हणाला, "याशिवाय आणखी कांहीं आज्ञा असल्यास तत्काळ हुकूम करावा !"

"नाहीं, आतां या क्षणाला मला दुसरं कांहीं नको आहे." अल्लाउद्दीन म्हणाला, "मी सांगितलं आहे तेवढंच कर !"

त्याचं हें बोलणं ऐकून तो राक्षस गुप्त झाला व अल्लाउद्दीन आईबरोबर गप्पा मारण्याकरतां बाहेर आला. थोडावेळ गप्पा मारल्यावर तो पुन्हां आपल्या खोलींत गेला आणि त्यानं दरवाजा बंद करून घेतला.

थोड्या वेळांत त्या राक्षसानं त्या दोघांना आणलं आणि त्या खोलींत ठेवलं. अल्लउद्दिनाला हें पाहून फारच आनंद झाला. तो त्या राक्षलाला म्हणाला, "या वझीराच्या मुलाला त्या पलिकडच्या मोरींत नेऊन तिथं डांबून ठेव !"

लगेच त्या राक्षसानं याला नेऊन मोरींत डांबून टाकलं आणि नंतर त्यानं वाऱ्याची इतकी थंड फुंकर मारली कीं वझीराच्या मुलाची अवस्था मोठी शोचनीय झाली. नंतर पुन्हां तो अल्लउद्दिनाकडे वळून म्हणाला, "आणखी कांहीं आज्ञा आहे काय ?"

"होय !" अल्लाउद्दीन "म्हणाला, उद्यां सकाळ होतांच पुन्हां यांना जिथल्या तिथं ठेवण्यासाठीं ये !"

त्याबरोबर तो राक्षस एकाएकीं नाहींसा झाला. नंतर अल्लाउद्दीन उठला इतक्या लवकर आणि सहजासहजीं आपण विजयी होऊं असं त्याला वाटलं. नव्हतं. तो बाद्र अल् वुदूरला म्हणाला, "राजकन्ये, तूं असं समजूं नकोस कीं, मी तुला तुझा अपमान करण्यासाठीं इथं आणलं आहे. तुझ्या बापानं तुझं लग्न माझ्याशीं करण्याचं वचन दिलं होतं. तेव्हां तूं आतां शांत चित्तानं झोप. माझ्याकडून तुझा जराही अनादर होणार नाहीं. मी बाहेर झोपतों."

परंतु ती घाणेरडी काळोखी खोली पाहून राजकन्या घाबरून गेली होती. तिच्या हृदयाचा थरकांप उडाला होता. त्यामुळं ती कांहीं उत्तर देऊं शकली नाहीं. ती पलंगावर पडली. परंतु तिनें ती रात्र मोठ्या कष्टांत घालविली. आपल्या सबंध आयुष्यांत तिच्यावर असला प्रसंग आला नव्हता. तीच

गोष्ट वझीराच्या मुलाच्या बाबतींत होती. तो दुसऱ्या खोलींत मोरींत पडून होता आणि राक्षसाच्या भीतीनं कांहीं एक हालचाल करूं शकत नव्हता. अल्लाउद्दीन मात्र बाहेर शांतपणें झोपला होता.

सकाळ होतांक्षणींच राक्षस अल्लाउद्दिनापुढं हजर झाला आणि म्हणाला, " धनी, तुम्हांला जी आज्ञा करायची ती करा ! "

" जा, या दोघांना त्याच्या महालांत घेऊन जा ! " अल्लाउद्दिनानं आज्ञा केली.

लगेच त्या राक्षसानं डोळ्याची पापणी लवते न लवते तोंच त्या दोघांना उचलून कोणाला दिसणार नाहीं अशा तऱ्हेनं राजवाड्यांत नेऊन ठेवलं. परंतु असं करतांना तीं दोघं भीतीनं अर्धमेलीं झालीं होतीं, त्यांना ठेऊन तो राक्षस निघून गेला.

थोड्या वेळानें सुलतान आंत आला आणि सरळ आपल्या मुलीकडे गेला आणि तिच्या कपाळाचं चुंबन घेऊन त्यानं विचारलं, " बेटी, ठीक आहे ना ! "

परंतु तिनं उत्तरच दिलं नाहीं. ती त्याच्याकडे मोठ्या रागीट मुद्रेनं पाहूं लागली. सुलतानानं पुन्हां पुन्हां तिला विचारलं परंतु तिनं एका शब्दानंही त्याला उत्तर दिलं नाहीं.

तेव्हां सुलतानानं तिला तेथेंच सोडलं व त्यानं आपल्या राणीच्या महालांत जाऊन तिला काय घडलं तें सांगितलं. सुलतानाला राग आलेला पाहून राणी म्हणाली, " तुम्ही थांबा थोडा वेळ. आणखी थोड्या वेळानं ती नीट बोलूं लागेल. आतां मीच जाऊन तिच्याशीं थोडी बातचीत करून येतें."

असं म्हणून राणीनं आपले कपडे चढवले आणि ती आपल्या मुलीच्या महालांत गेली. मुलीजवळ जाऊन तिनं प्रेमानं तिच्या कपाळाचं चुंबन घेतलं. परंतु राजकन्येनं जरासुद्धां तिच्याकडे पाहिलं नाहीं कीं कसलीहि हालचाल केली नाहीं. तेव्हां मात्र राणी स्वतःशींच म्हणाली, ' खात्रीनं कांहींतरी चमत्कारिक घडलं असलं पाहिजे. त्याशिवाय ती अशी वागणार नाहीं.' तिनं आपल्या मुलीला विचारलं, " बेटी, तुला काय झालं आहे ? तूं बोलत कां नाहींस ? मी मुद्दाम तुझ्या समाचाराला आलें असतांना तूं एक शब्दहि बोलत नाहींस म्हणजे काय ?"

भारतवाङ्मय
2638
१८।५।६१


तेव्हां राजकन्या बाद्र अल् बुदूर तोंड वर करून म्हणाली, " आई, मला क्षमा कर. तूं अगदीं सकाळींच आल्यामुळं मी बोललें नाहीं. कालची रात्रच वैऱ्याची रात्र होती." असं म्हणून तिनं आपल्या महालांतून नाहींसं होण्यापासून तों सकाळीं पुन्हां महालांत आणून ठेवण्यापर्यंतची सारी हकिगत तिला सांगितली. ती म्हणाली, " राक्षसानं आम्हांला खोलींत आणून ठेवलं न ठेवलं तोंच सुलतान आंत आले. त्या वेळीं बोलण्याची मला शक्ति नव्हती. माझ्या सर्वांगाला कापरं भरलं होतं. कदाचित् माझ्या त्या वागण्यानं त्याना रागसुद्धां आला असेल. आई, तेव्हां माझ्या खऱ्या स्थितीबद्दल त्यांना सांगून त्यांना रागें न भरण्याची विनंती कर."

राणीनं बाद्र अल् बुदूरचं तें बोलणं ऐकलं तेव्हां ती म्हणाली, " बेटी, तुझं डोकं ताळ्यावर आहे ना ? दुसऱ्या कुणाला तूं हें सांगितलंस तर सर्व म्हणतील कीं सुलतानाच्या मुलीला वेड लागलं आहे. तूं त्यांना कांहीं सांगितलं नाहींस हें वरं केलंस. मी तुला पुन्हां बजावतें कीं, तूं ह्यांतलं कुणाला कांहींसुद्धां सांगूं नकोस !"

" आई !" बाद्र अल् बुदूर म्हणाली, " मला वेड लागलेलं नाहीं. माझं डोकं पूर्ण शुद्धीवर आहे. माझी बुद्धी भ्रमिष्ट झालेली नाहीं. मी सांगतें हें तुला खोटं वाटत असेल तर तूं वझीराच्या मुलाला विचार म्हणजे तो तुला सारं सांगेल."

" ऊठ आणि तुझे हे भ्रमिष्ट विचार डोक्यांतून काढून टाक !" राणी म्हणाली, " तुझे कपडे चढव आणि तुझ्या लग्नाप्रीत्यर्थ शहरांत कशी रोषणाई केली आहे, वाद्यें कशीं वाजत आहेत, गायन कसं चाललं आहे आणि जांवयाच्या मेजवानीची कशी तयारी चालली आहे ती बघ. हें सारं तुझ्या लग्नप्रीत्यर्थ आहे हें विसरूं नकोस."

असं म्हणून तिनं तत्काळ बाद्र अल् बुदुरचा पोशाख चढवणाऱ्या दासीला हांक मारली व तिला पोषाख चढवून ती खुद्द सुलतानाकडे गेली. तिनं त्याची समजूत घातली. मुलगी अख्खी रात्र स्वप्नांत होती असं सांगून तिच्यावर न रागावण्याची विनंती केली. सुलतान महालांतून गेल्यावर तिनं गुप्तपणं वझीराच्या मुलाला बोलावून घेतलं आणि त्याला बाद्र अल् बुदूरनं सांगितलेली सारी हकिगत सांगून विचारलं, " बोल, हें सारं खरं आहे का ?"

त्याला वाटलं आपण खरं सांगितलं तर राजकन्या आपल्या हातची जाईल. म्हणून तो आश्चर्य वाटल्यासारखं करून म्हणाला, "आपण काय म्हणत आहांत तें मला समजलं नाहीं!"

आतां मात्र तिची खात्री झाली कीं मुलीनं स्वप्नच पाहिलं आहे आणि ती स्वप्नात बडबडत आहे. त्यामुळं तिनं मुलीच्या वागण्याकडं दुर्लक्ष केलं।

परंतु बाद्र अल् बुदूर कांहीं तो प्रसंग विसरूं शकली नाहीं. सारा दिवसभर लग्नाची मेजवानी चालली होती. मंजुळ वाद्यांचा घोष चालला होता. सुमधुर गाणं बजावणं चाललं होतं. सर्वत्र आनंदी आनंद लुटला जात होता. खुद्द सुलतान, वझीर आणि वझीराचा मुलगा बाद्र अल् बुदूर खूष रहावी म्हणून धडपड करीत होते. तिच्या मनांतले विचार जावे म्हणून तिचं मन दुसरीकडे आकृष्ट करण्याची खटपट करीत होते. परंतु या कशाचाहि परिणाम तिच्या मनावर झाला नाहीं. ती दुःखी मनानं गोंधळलेल्या मनःस्थितींत गेल्या रात्रीच्या प्रसंगावर विचार करीत गुपचूप बसून राहिली होती.

वझीराच्या मुलानं तिच्यापेक्षांहि जास्त दुःख सहन केलं होतं. त्याला सारी रात्र मोरींत काढावी लागली होती. तरीसुद्धां तो कांहीं झालंच नाहीं अशा तऱ्हेनं वागत होता. कारण खरी गोष्ट उघडकीस आली तर राजकन्या आणि तिच्याबरोबर आलेलें वैभव व मान जाईल अशी भीति त्याला वाटत होती. दुसरं म्हणजे बाद्रच्या अनुपमेय सौंदर्यानं व शरीरसौष्टवानं त्याला मोहिनी घातली होती.

अल्लाउद्दीनसुद्धां सर्व देशभर फिरला. त्यानं सारी मौजमजा पाहिली. राजवाड्यांत जाऊन तेथली रोषणाई पाहिली. परंतु या सर्व रोषणाईकडे पाहून तो स्वतःशींच हंसत होता. रस्त्यावरून जातांना त्याच्या कानावर लोकांचं बोलणं येत होतं कुणी म्हणत होते, 'वझीराचा मुलगा भाग्यवान खरा,' कुणी म्हणत होतं, 'त्याला मोठा मान मिळाला आहे.' कुणी म्हणत होतं, 'त्याला मोठं वैभव प्राप्त झालं आहे' कुणी म्हणत होतं, 'सुलतानाचा जांवाई होऊन त्यानं मोठा अधिकार मिळवला आहे.' ही सारी बडबड ऐकून अल्लाउद्दिनाला मोठी मजा वाटली. तो स्वतःशींच म्हणाला,

'तुम्हांला गेल्या रात्रीं त्याच्यावर काय प्रसंग आला हे समजलं पाहिजे होतं. तें तुम्हांला माहीत नाहीं म्हणूनच तुम्ही असं बोलत आहांत!'

नंतर बराच वेळ शहरांत फिरल्यावर काळोख पडायच्या सुमारास तो आपल्या घरीं परतला. जेवणखाण आटोपल्यावर तो आपल्या खोलींत गेला आणि त्यानं दिवा घासला. लगेच तो राक्षस तिथं प्रगट झाला. त्याबरोबर अल्लाउद्दिनानं त्याला आदल्या दिवसाप्रमाणं सुलतानाच्या मुलीला आणि वझीराच्या मुलाला आणायला फर्माविलं. त्याप्रमाणं तो राक्षस क्षणाचाही विलंब न करतां नाहींसा झाला व ठरलेल्या वेळीं राजकन्या बाद्र अल् बुदूर आणि वझीराचा मुलगा यांना घेऊन आला. आदल्या दिवसासारखीच आजही वझीरपुत्राची आणि राजकन्येची व्यवस्था लावली. सकाळ होतांच त्या राक्षसानं पुन्हां त्यांना राजमहालांत नेऊन ठेवलं. अल्लाउद्दिनाला वझीरपुत्राची दुर्दशा पाहून मोठी मौज वाटली.

सुलतान जेव्हां सकाळीं जागा झाला तेव्हां त्यानं आपली मुलगी कालच्या प्रमाणंच वागते कीं काय हें पहाण्याचा निश्चय केला आणि उठल्यावरोबर कपडे करून तो मुलीच्या महालांत गेला.

सुलतानानं पडदा बाजूला सारला व झोपलेल्या मुलीच्या कपाळाचं चुंबन घेऊन तिला तिची हकिकत विचारली. परंतु त्याच्या लक्षांत आलं कीं मुलगी आंबट चेहऱ्यानं व दु:खी मनानं झोपली आहे. तिनं एका शब्दानंही त्याला उत्तर दिलं नाहीं. उलट रागानं, दु:खानं आणि केविलवाण्या चेहेऱ्यानं ती त्याच्याकडे पहात राहिली.

हें पाहून सुलतानाला भयंकर राग आला. कांहींतरी घडलं असून मुलगी आपल्यापासून तें लपवून ठेवीत आहे असा त्याला संशय आला. त्यानं रागानं आपली तलवार म्यानाबाहेर काढली आणि तो म्हणाला, "तुझ्यावर कोणतं संकट आलं आहे बोल. नाहीं तर मरायला तयार हो. तुझ्या ह्या असल्या वागण्यानं माझा मान काय राहिला? मी तुला पुन्हां पुन्हां प्रश्न विचारतों आणि तूं चकार शब्दहि तोंडांतून काढीत नाहींस."

आपला बाप हातांत नग्न तलवार घेऊन उभा असलेला तिनं पाहिला तेव्हां तिचं भय नाहींसं झालं. ती आपलं डोकं वर करून म्हणाली, "पिताजी, माझ्यावर रागावूं नका. माझ्यावर आलेला प्रसंग पाहून तुम्ही

खात्रीनं मला क्षमा कराल. माझ्याकडे लक्ष द्या आणि गेल्या दोन रात्रीं माझ्यावर आलेल्या प्रसंगाचा वृत्तांत ऐका. तें ऐकल्यावर तुम्ही खात्रीनं मला क्षमा कराल आणि पूर्वीप्रमाणं माझ्यावर प्रेम कराल." नंतर राजकन्येनं आपल्यावर आलेले प्रसंग सांगितले आणि ती म्हणाली, "पिताजी, तुमचा माझ्या बोलण्यावर विश्वास नसेल तर तुम्ही वझीराच्या मुलाला त्याबद्दल विचारा. तो तुम्हांला सर्व हकिगत सांगेल. त्याच्यावर काय संकटं आलीं हें मला माहीत नाहीं."

सुलतानानं जेव्हां ही हकिगत ऐकली तेव्हां त्याला फार दुःख झालं. त्याचे डोळे आसवांनीं भरून आले. त्यानं आपली तलवार म्यान केली. मुलीला मोठ्या प्रेमानं पोटाशीं धरून मायेनं तिचं चुंबन घेऊन तो म्हणाला, "बेटी, तूं झालेली हकिगत मला कालच सांगितली असतीस तर कालच्या रात्रीं तुझ्यावर जो प्रसंग आला तो मी येऊं दिला नसता. मी तुझं रक्षण केलं असतं. पण आतां कांहीं हरकत नाहीं. आतां सारी काळजी आणि दुःख तूं विसरून जा. आज तुझ्यावर संकट येऊं नये म्हणून मी पहारा ठेवीन!"

नंतर सुलतान सरळ आपल्या राजमहालांत गेला. आणि त्यानं वझीराला बोलावणं पाठविलं. वझीर आल्यानंतर सुलतानानं त्याला विचारलं, "तुझ्या मुलानं काय झालं हें तुला सांगितलं आहे काय?"

"नाहीं!" वझीर म्हणाला, "कालपासून त्याची आणि माझी भेट झालीच नाहीं."

हें ऐकल्यावर सुलतानानं त्याला सर्व हकिकत सांगितली व तो म्हणाला, "तुझ्या मुलाला भेटून काय घडलं तें त्याच्याकडून काढून घे. कदाचित् अतिभयानं माझी मुलगी काय घडलं तें बरोबर सांगूं शकत नसेल. तरीसुद्धां ती म्हणाते तें खरं आहे असं मला वटतं."

त्याबरोबर वझीर सरळ आपल्या मुलाकडे गेला आणि त्याला सारं सांगून तो म्हणाला, "बोल, हें सारं सत्य आहे काय?"

"होय!" वझीरपुत्र म्हणाला, "बाद्र अल् बुदूर जें सांगते तें खरं आहे. गेल्या दोन रात्री वैऱ्याच्या रात्री झाल्या. मी एका घाणेरड्या, काळोख्या मोरींत थंडीनं कुडकुडत दोन्ही रात्री घालविल्या." त्यानं सारं

कांहीं आपल्या बापाला सांगितलं आणि तो म्हणाला, " बाबा, सुलतानाला सांगून मला ह्या लग्नाच्या बेडींतून मुक्त करा. सुलतानाचा जावई होणं ही मोठी मानाची गोष्ट आहे हें खरं ! परंतु मागच्या दोन रात्री ज्या अवस्थेंत घालवल्या तसली एकही रात्र घालविण्याची आतां माझ्या अंगांत ताकद नाहीं! "

वझीरानं आपल्या मुलाचं हें बोलणं ऐकलं तेव्हां त्याला फार दुःख झालं. कारण हें लग्न त्यानं आपल्या मुलाला उच्चपदावर नेमण्यासाठीं घडवून आणलं होतं. म्हणून तो मोठ्या विचारांत पडला. त्याची स्थिती अगदीं गोंधळल्यासारखी झाली. कशा तऱ्हेनं हें सारं प्रकरण मिटवावं ह्याचीं त्याला चिंता लागून राहिली. हें लग्न मोडणं म्हणजे त्याच्या साऱ्या मनोरथांचा चुराडा करण्यासारखं होतं. पुन्हां संबंध आयुष्यांत तशी संधी येणं शक्य नव्हतं. त्यामुळं तो आपल्या मुलाला म्हणाला, " बेटा, थोडा धीर धर ! आज काय होतं तें पाहूं या. तुम्हांला सांभाळण्यासाठीं आज मोठे पहारे आम्ही बसवणार आहोंत. तुला जो मोठा बहुमान मिळालेला आहे तो तूं गमावूं नकोस. "

नंतर वझीर मुलाला सोडून सुलतानाकडे परतला व म्हणाला, " राजकन्या बाद्र अल् बुदूरनं जें काय सांगितलं आहे तें खरं आहे. "

" ज्याअर्थीं एवढ्या थराला गोष्टी गेल्या आहेत त्याअर्थीं आतां आपण जास्त वेळ वाट पहाण्यांत कांहीं अर्थ नाहीं ! "

असं म्हणून सुलतानानं ताबडतोब समारंभ बंद करण्याची आज्ञा सोलली व लग्न मोडल्याचं जाहीर केलं.

तें ऐकून सर्व नागरिकांना मोठा विस्मय वाटला आणि जेव्हां वझीर व त्याचा मुलगा दोघे दुःखी अंतःकरणानं बाहेर पडतांना त्यांनीं पाहिलं तेव्हां तर त्या विस्मयांत भरच पडली. प्रत्येकजण एकमेकांस विचारूं लागला, " काय झालं ? तडकाफडकीं लग्न कां मोडलं गेलं ?"

परंतु अल्लाउद्दिनाखेरीज त्यांतलं सत्य कुणालाच माहीत नव्हतं. राजकन्या मिळविण्याची त्याची खरी महत्त्वाकांक्षा होती. तो ह्या साऱ्या प्रकाराबद्दल गालांतल्या गालांत हंसत होता.

परंतु हें लग्न मोडल्यानंतरसुद्धां सुलतानाला अल्लाउद्दिनाला दिलेल्या

वचनाची आठवण झाली नाहीं. वझीरालासुद्धां ही अशी गोष्ट घडण्याचं कारण काय ह्याची कल्पना आली नाहीं.

तीन महिने पुरे होईपर्यंत अल्लाउद्दीन स्वस्थपणें वाट पहात राहिला. कारण सुलतानानं तीन महिन्यांची मुदत दिली होती. तीन महिन्यांची मुदत संपली तेव्हां सुलतान आपला करार पाळतो कीं नाहीं हें पहाण्यासाठीं अल्लाउद्दिनानं आपल्या आईला सुलतानाकडे पाठविलं.

अल्लाउद्दिनाची आई सुलतानाला भेटण्यासाठीं राजदरबारांत गेली. सुलतान दरबारांत आला तेव्हां त्याची नजर तिच्यावर गेली. त्याबरोबर आपण तिला दिलेल्या तीन महिन्यांच्या मुदतीच्या वचनाची त्याला आठवण झाली. तो वझीराकडे वळून म्हणाला, " जिनं आपणांला रत्नांचा नजराणा दिला होता ती हीच म्हातारी ! आपण तिला वचन दिलं होतं कीं, तीन महिने उलटल्यावर आपण अगोदर तिला बोलाऊन घेऊं म्हणून ! "

वझीरानं तत्काळ तिला सुलतानापुढं हजर केलं. सुलतानापुढं येतांच तिनं लवून मुजरा केला. सुलतानानं विचारलं, " तुझी काय मागणी आहे ? "

" सरकार ! " म्हातारी म्हणाली, "आपण तीन महिन्यांची दिलेली मुदत संपली आहे, आतां आपण आपली मुलगी बाद्र अल् बुदूर माझ्या मुलाला देण्याची वेळ येऊन ठेपली आहे. "

तिच्या मागणीनं सुलतानाला मोठा खेद झाला. कारण तिची अवस्था अगदीं कंगाल दिसत होती. तरी पण तिनं आणलेला नजराणा इतका मौल्यवान होता कीं त्याची किंमत देणं त्याच्या आटोक्याबाहेरचं होतं. तेव्हां सुलतान वझीराकडे वळून म्हणाला, " वझीर, मी माझा शब्द आधींच दिलेला आहे. तुझं काय मत आहे ? ही मंडळी तर मला कंगाल दिसते. मोठ्या योग्यतेचीं माणसं दिसत नाहींत ! "

परंतु वझीर आपल्या मुलावर आलेल्या संकटामुळं दुःखी झाला होता. व द्वेषानं मनांतल्या मनांत तडफडत होता. ह्यामुळं सुलतानाचा तो प्रश्न ऐकतांच तो स्वतःशींच म्हणाला, ' माझ्यासारख्याच्या मुलाला मिळालेला मान नाहींसा झाला आहे. आतां ही कशी लग्न जुळवते तें मी बघतों ! ' आणि तो सुलतानाकडे वळून जरा खाजगी स्वरांत म्हणाला, " ह्या दरिद्री

बाईला दूर ठेवणं कठीणं काम नाहीं. ज्याच्याबद्दल कांहींच माहिती नाहीं त्याला मुलगी देणं योग्य नाहीं. ? ''

'' पण कोणत्या उपायांनीं तिला दूर ठेवणार ? '' सुलतान काळजीच्या स्वरानं म्हणाला, '' मी तर माझा शब्द देऊन बसलों आहें. आणि राजाचा शब्द म्हणजे दरारा ! तो पाळलाच पाहिजे. ''

त्यावर वझीर जरा विचार करून म्हणाला, '' मला एक कल्पना सुचली आहे, मी सांगतों त्याप्रमाणं तुम्ही मागणी करा. शुद्ध सोन्याच्या चाळीस थाळींतून बाईनं पूर्वीं आणलीं होतीं तशीं रत्नं नजराणा म्हणून पुन्हां आणावीं. त्या चाळीस थाळचा चाळीस गोऱ्या युवतींनीं व चाळीस काळ्या गुलामांनीं आणाव्या ! ''

वझीराची ही प्रचंड मागणी पाहून सुलतान एकदम आनंदानं म्हणाला. ' खरोखर तूं अशी नामी युक्ति सांगितली आहेस. ही गोष्ट त्याच्याकडून होणं शक्यच नाहीं. आपणहि आपल्या शब्दांतून सहजच मुक्त होऊं. '' नंतर सुलतान अल्लाउद्दिनाच्या आईकडे वळून म्हणाला, '' बाई, तूं जा आणि आपल्या मुलाला सांग कीं माझा शब्द मी पाळणार आहें. पण तुझ्या मुलाला हुंडा देण्याची ऐपत असली पाहिजे. तुझ्या मुलानं चाळीस शुद्ध सोन्याच्या थाळ्यांतून तूं पूर्वीं आणलींस तशीं रत्नं काठोकाठ भरून ते थाळे पाहिजेत. चाळीस गोऱ्या तरुणींबरोबर पाठविले पाहिजेत. आणि त्यांच्याबरोबर चाळीस काळे गुलाम आले पाहिजेत. ही गोष्ट जर तुझ्या मुलाच्या हातून झाली तरच तुझ्या मुलाला मी माझी मुलगी देईन ! ''

घरीं येतांना अल्लाउद्दिनाची आई स्वतःशींच विचार करूं लागली, ' माझ्या गरीब मुलाला हें कसं शक्य आहे ? त्याला तसलीं रत्नं पुन्हां कुठं मिळणार ? समजा, त्यानं तीं जादूच्या बागेंतून आणलीं तरी चाळीस गोऱ्या दासी व चाळीस काळे गुलाम कोठून आणणार ? '

घरीं येतांच तिनं सर्व गोष्ट अल्लाउद्दिनाच्या कानावर घातली व ती म्हणाली, '' बेटा, मी तुला सांगितलंच होतं कीं, राजकन्या बाद्र अल् बुदूर मिळवणं तुझ्या आटोक्याबाहेरची गोष्ट आहे. आपल्यासारख्या सामान्य माणसांना तें कसं शक्य आहे ? ''

"आई, तुला काय वाटतं ? ही गोष्ट मला शक्य नाहीं? अल्ला-उद्दीनं हसून म्हणाला. "पण आतां आधीं जेवण तयार कर पाहूं. जेवल्यावर मग आपण बघूं काय करायचं तें ! तुझ्याप्रमाणं सुलतानाला वाटतं कीं, कांहीं तरी भरमसाठ हुंडा मागून माझी मागणी फेटाळून लावूं. पण खरं सांगायचं म्हणजे त्यानं जें मागितलं आहे तें अगदींच कमी आहे. आतां तूं झटकन् जेवण कर बघूं. म्हणजे सुलतानाला उत्तर देण्याच्या मार्गाला मी लागेन."

त्याप्रमाणें तो खाण्याचे जिन्नस आणण्यासाठीं म्हणून बाजारांत गेली. ती गेलेली पहातांच अल्लाउद्दीन आपल्या खोलींत गेला आणि त्यानं तो दिवा काढून घासला. तत्काळ तो राक्षस त्याच्यापुढं हजर झाला. अल्लाउद्दीन त्याला म्हणाला, "मी सांगतों तें नीटपणं ऐकून घे. मी सुलतानाकडे त्याच्या मुलीला लग्नाची मागणी घातली आहे. आणि त्यासाठीं प्रत्येकीं दहा शेर वजनाच्या चाळीस सोन्याच्या थाळ्यांतून आपल्या खजिन्यांत जीं रत्नं आहेत तशीं भरून ठेव. त्या थाळ्या चाळीस गोऱ्या दासींच्या डोकीवर देऊन व त्यांना चाळीस काळे गुलाम साथीला देऊन, तो नजराणा त्याला पाठवा-यचा आहे. तरी त्याची सिद्धता करून माझ्यासमोर आण !"

"जशी सरकारची आज्ञा !" तो राक्षस म्हणाला आणि एका क्षणार्धांत तो नाहींसा झाला. एका तासानं तो ते थाळे, तीं रत्नं, त्या दासी आणि ते गुलाम घेऊन आला व म्हणाला, "सरकार, आणखी कांहीं हुकूम आहे काय ?"

"आतां कांहीं नाहीं" अल्लाउद्दीन म्हणाला, "परंतु नंतर मी तुला बोलावून सांगेन."

त्याबरोबर राक्षस गुप्त झाला. थोड्याच वेळांत अल्लाउद्दिनाची आई बाजारांतून परतली. परंतु दासी, काळे गुलाम आणि रत्नांनीं भरलेले सोन्याचे थाळे पहातांच तिची मति गुंग झाली. तो आपल्या तोंडावरचा बुरखा काढते न काढते तोंच अल्लाउद्दीन म्हणाला, "आई, सुलतान आपल्या महालांत जायच्या आंत तुला दरबारांत गेलं पाहिजे. जातांना त्यानं जें मागितलं होतं तें हें घेऊन जा. त्यानं मागितलं त्यापेक्षां अधिक मी आणलं

आहे. सुलतान त्या वझीराच्या नादीं लागला आहे. त्या दोघांना वाटतं कीं, ते मला नामोहरम करतील. आतां समजेल त्यांना माझी योग्यता ! ''

असं म्हणून उठून त्यानं दरवाजा उघडला. त्याबरोबर त्या गोऱ्या दासी आणि ते काळे गुलाम जोडीजोडीनं पुढं आले. अल्लाउद्दिनाची आई पुढं झाली आणि तिच्या मागोमाग नजराणा घेऊन त्या दासी आणि ते गुलाम जोडीनं उभे राहिले. तें अपूर्व दृश्य पाहून त्या मोहल्यांतील लोक एकमेकांकडे टकामका पाहूं लागले. त्या दासींचं असामान्य सौंदर्य पाहून त्यांना फार आश्चर्य वाटलं. त्यांच्या अंगावरील वस्त्रं सोनेरी कापडाचीं असून मौल्यवान रत्नांनीं तीं मढविलेलीं होतीं. प्रत्येक वस्त्राची किंमत हजार दिनारांपेक्षां कमी झाली नसती. जरी त्यांच्या हातांतील पात्रं जरीच्या वस्त्रानीं झाकलेलीं होतीं तरी सर्वांचं लक्ष त्याकडेच होतं. तीं वस्त्रंसुद्धां बहुमोल रत्नांनीं गुंफलेलीं होतीं. त्यांतून निघणारा प्रकाश सूर्याच्या प्रकाशालाहि मागं टाकीत होता. अल्लाउद्दिनाची आई चालूं लागली व तिच्या मागोमाग त्या दासी मोठ्या मोहक चालीनं, सुहास्य मुद्रेनं चालूं लागल्या. सर्व शहरवासी त्या स्त्रियांचं तें लावण्य पाहून मोहून गेले व अशा कलाकृती निर्माण केल्याबद्दल परमेश्वराला धन्यवाद देऊं लागले. करतां करतां तो लवाजमा राजवाड्यापाशीं येऊन पोंचला.

हा लवाजमा जेव्हां खोजा, कंचुकी आणि सैन्याधिकाऱ्यांनीं पाहिला तेव्हां त्यांनीं तोंडांत बोटंच घातलीं. विशेषेंकरून त्या दासींचं सौंदर्य मनाला वेड लावणारं होतं. राजाचे अधिकारी हे मोठ्या उमरावाचे आणि अमीरांचे मुलगे होते, तरीसुद्धां त्या स्त्रिया, त्यांच्या डोक्यावरच्या त्या थाळ्या, आणि त्यांचा पेहराव पाहून ते मोहून गेले. त्या लखलखाटामुळं त्यांचे डोळे दिपून गेले. त्यांना त्यांच्याकडे एकसारखं पहावेना.

हा लवाजमा जवळ येतांच त्यांनीं तावडतोब सुलतानाला त्याची वर्दी दिली. सुलतानानं त्यांना आंत घेऊन येण्यास सांगितलं. अल्लाउद्दिनाची आई सारा लवाजमा घेऊन राजदरबारांत गेली. तिनं आणि तिच्या बरोबरच्या त्या दासींनीं आणि काळ्या गुलामांनीं सुलतानाला लवून मुजरा केला. नंतर त्या दासींनीं आपल्या डोकीवरच्या सोन्याच्या थाळ्या सुलतानाच्या पायांपाशीं

ठेवल्या आणि त्यांच्यावरील जरतारी झाकणें दूर केलीं; आणि हात मार्ग नेऊन त्या उभ्या राहिल्या.

तें सारं दृश्य पाहून सुलतानाला फार आश्चर्य वाटलं. त्या दासींच्या अप्रतिम लावण्यामुळं तर त्यानं तोंडांत बोटच घातलं ! काठोकाठ रत्नानं भरलेल्या त्या थाळ्या पाहून त्याला भोवळच आल्यासारखी झाली. याचं तें सौंदर्य आणि तो अमोल ठेवा पाहून त्याची जीभ टाळ्याला अडकली, आणि हें सारं एका तासाभरांत झालेलं पाहून त्याला वेडच लगायची पाळी आली.

जरा वेळानं त्याचं चित्त थाऱ्यावर आल्यावर त्यानं तो सर्व नजराणा आंत महालांत नेण्यास दासींना सांगितलं. सुलतानाच्या हुकुमाप्रमाणं त्यांनीं तसं केलं. नंतर अल्लाउद्दिनाची आई पुढं होऊन म्हणाली, " सरकार हा जो, नजराणा आहे तो बाद्रच्या पुढं कांहींच नाहीं. खरं म्हणजे ह्याच्यापेक्षांहि कितीतरी पटीनं अधिक हुंडा द्यायला पाहिजे होता. परंतु आपल्या इच्छे-प्रमाणं आपण मागितला तेवढाच नजराणा मीं आणला."

हें ऐकल्यावर सुलतान वझीराला म्हणाला, " वझीरा, ज्यानं इतक्या थोड्या वेळांत इतकी बहुमोल संपत्ति आणली तो सुलतानाचा जांवई होण्यास लायक नाहीं काय ?"

ती संपत्ती पाहून वझीर थक्क होऊन गेला होता तरी क्षणाक्षणाला त्याची द्वेषबुद्धि मात्र वाढत होती. सुलतान ती संपत्ती पाहून खूष झालेला आहे असं पाहून तो म्हणाला, " खाविंद, हा नजराणा तिच्यापुढं कांहींच नाहीं !" असं म्हणून सुलतान अल्लाउद्दिनाला आपली मुलगी देणार नाहीं अशी कारवाई करण्याच्या उद्देशानं तो पुढं म्हणाला, " पृथ्वीवरील सारीं बहुमोल रत्नं गोळा केलीं तरी ती बाद्रच्या नखाचीहि बरोबरी करूं शकणार नाहींत. खाविंदांनीं तिच्यापेक्षां त्यांना उगाच अधिक किंमत दिली आहे !"

वझीराचं हें बोलणं ऐकून सुलतानाला कळून चुकलं कीं हें बोलणं फक्त द्वेषामुळंच होत आहे. तेव्हां त्याच्याकडे दुर्लक्ष करून तो अल्ला-उद्दिनाच्या आईकडे वळून म्हणाला, " बाई, आपल्या मुलाकडे जा आणि त्याला सांगा कीं त्यानं पाठविलेला हुंडा मला पोंचला. माझ्या शब्दाप्रमाणं मी करण्यास तयार आहें. माझी मुलगी त्याची बायको होईल. तो माझा जांवई होईल. त्यानं ताबडतोब येऊन मला भेटावं म्हणजे त्याचा आणि

माझा परिचय होईल. त्याला मानमरातब मिळेल व आजपासूनच लग्न-समारंभाला सुरवात होईल. फक्त त्याची माझी भेट होऊं दे. त्यासाठीं विलंब लावूं नका."

हें ऐकतांच अल्लाउद्दिनाची आई धाईनं घरीं आली. आपला मुलगा सुलतानाचा जांवई होणार ह्या कल्पनेनं तिला धन्यता वाटली.

अल्लाउद्दिनाची आई दरबारांतून गेल्यावर सुलतानानं आपला दरबार बरखास्त केला आणि तो मुलीच्या महालांत नेला. त्यानं बाद्रच्या दासीला तो नजराणा व त्या दासींना घेऊन येण्यास सांगितल.

बाद्रनं जेव्हां तो नजराणा पाहिला तेव्हां तिच्या मनांत संदेह निर्माण झाला. ती म्हणाली, "या रत्नांची बरोबरी करतील अशीं रत्नं पृथ्वीच्या पाठीवर असतील कीं नाहीं ह्याची शंकाच येते!"

नंतर तिनं त्या दासींकडे पाहिलं. त्यांचं लावण्य पाहून तिला आश्चर्य वाटलं. जेव्हां तिला कळलं कीं तिच्या भावी पतीनं तिच्या सेवेसाठीं त्या पाठविल्या आहेत तेव्हां तिला आनंद झाला. वास्तविक वझीराच्या मुला-बरोबरचं लग्न मोडल्यामुळं तिचं मन दुःखी झालं होतं. परंतु हा नजराणा पहातांच तिचं मन उल्हसित झालं. तिच्या चेहऱ्यावर टवटवी दिसूं लागली.

सुलतान सुद्धां कांहीं कमी आनंदी झाला नव्हता. मुलीचं दुःख नाहींसं झालेलं पाहून तर तो जास्तच खुषींत आला आणि त्यानं तिला विचारलं, "बेटी, या सर्व गोष्टींमुळं तुझं मन बदललं आहे ना? मला वाटतं हा नवा मुलगा वझीराच्या मुलापेक्षां अधिक लायक आहे. माझी खात्री आहे कीं त्याच्यापासून तुला खरं सुख मिळेल!"

अशी ही स्थिती सुलतानाची झाली.

इकडे आईला हंसत हंसत घरांत आलेली पाहिली तेव्हां अल्लाउद्दिनाला आनंद झाला. तो म्हणाला, "परमेश्वरानं माझी इच्छा पूर्ण केली!"

"बेटा," त्याची आई म्हणाली, "आनंद मान, तुझी इच्छा सफल झाली. तूं हुंड्याच्या रूपानं पाठविलेला खजिना सुलतानानें स्वीकारला आहे. बाद्र अल् बुदूर आतां तुझी वाग्दत्त वधू झाली आहे. आजच रात्रीं लग्नसमारंभ होऊन तुझी आणि तिची प्रथम भेट होईल. सुलतानानं सर्वां-समक्ष जाहीर केलं आहे कीं तू त्याचा जांवई झालास म्हणून! आज रात्रीं

प्रथमच तूं त्याच्या मुलीला भेटणार आहेस. परंतु त्याआधीं त्याला तुला भेटायचं आहे. तुझा तो सन्मान करणार आहे ! बेटा, आतां माझं काम संपलं. ह्यापुढचं सारं काम तुझ्या शिरावर आहे ! ''

हें ऐकतांच अल्लाउद्दीन उठून आपल्या खोलींत गेला. त्यानं जादूचा दिवा काढून घासला. त्याबरोबर राक्षसानं प्रगट होऊन विचारलं, '' तुझी काय आज्ञा आहे ती सांग, तुझ्या सेवेला मी तयार आहें ! ''

त्याबरोबर अल्लाउद्दीन म्हणाला, '' जगांत कुठंही सांपडणार नाहीं अशा चांगल्या हमामखान्यांत मला घेऊन चल. नंतर माझ्यासाठीं असा पोषाख आण कीं पृथ्वीवरील कुणाहि बादशहानं तसला पोषाख घातला नसेल ! ''

'' आज्ञा मान्य आहे ! '' राक्षस म्हणाला आणि दुसऱ्याच क्षणाला तो त्याला घेऊन एका अतिसुंदर अशा हमाममध्यें आला. हमामखान्याच्या भिंती संगमरवरी दगडाच्या होत्या. त्यावर सुंदर वेलबुट्टी काढलेली होती. शिवाय मुख्य दालनांत भिंतींत रत्नं कोंदवलीं होतीं. हमामखान्यांत चिटपाखरूंही नव्हतं. अल्लाउद्दीन आंत गेला. एका मानवाकृती राक्षसानं त्याला त्याचं समाधान होईपर्यंत आंघोळ घातली. आंघोळ झाल्यावर अल्लाउद्दीन स्नानगृहांतून मुख्य दालनांत आला. परंतु तिथं येऊन पहातो तों त्याचे जुने कपडे नाहींसे झाले होते आणि त्या जागीं अति मौल्यवान व शाही पोषाख दिसत होता. तिथं आल्यावर त्याला शरबत आणि सुवासिक कॉफि देण्यांत आली. ती घेतल्यावर अल्लाउद्दीन उठला. त्याबरोबर पुष्कळ काळे नीग्रो पुढं झाले आणि त्यांनीं तो मौल्यवान पोशाख त्याच्या अंगावर चढविला. त्याला अत्तरें व सुवासिक तेलें लाविलीं. सारा सरंजाम झाल्यावर अल्लाउद्दीन एखाद्या राजपुत्राप्रमाणं दिसूं लागला. तो एका गरीब शिंप्याचा मुलगा आहे हें कुणी ओळखलंच नसतं. आणि कुणी त्यांना तसं सांगितलं असतं तर ते चकित होऊन म्हणाले असते, '' हा कोणी खानदानी राजपुत्र दिसतो. जो स्वतः बदलत नाहीं व सर्व गोष्टींत बदल करतो त्या परमेश्वराला धन्यवाद ! ''

इतक्यांत राक्षस आला आणि त्यानं त्याला उचलून त्याच्या घरीं नेलं आणि नम्रपणानं विचारलं, '' सरकार आणखी कांहीं हुकूम आहे काय ?'

" होय ! " अल्लाउद्दीन म्हणाला, " माझ्यासाठीं अठ्ठेचाळीस गोरे गुलाम घेऊन ये. राजवाड्यांत जातेवेळीं त्यांपैकीं चोवीस माझ्यापुढं चालतील आणि चोवीस माझ्यामागून चालतील. त्यांच्या अंगावर सुंदर वस्त्रं असावींत. ते उत्तम लष्करी घोड्यांवर बसलेले असावेत. त्यांच्या सारखे गुलाम कुठच्याच बादशहाकडेहि नसावेत. नंतर माझ्यासाठीं असा एक उमदा घोडा आण कीं पृथ्वीतलावर त्याच्यासारखा दुसरा कुठंच सांपड-णार नाहीं. त्याचं जीन जरतारी हिरेजडित असलं पाहिजे. शिवाय अठ्ठेचाळीस हजार सोन्याच्या मोहरा लागतील. प्रत्येक गुलामाकडे त्यांतील एक एक हजार मोहरा दे. मी आतां सुलतानाकडे जाणार आहें. पण त्यापूर्वी हा सारा सरंजाम झाला पाहिजे. तेव्हां तूं झटकन तयारीला लाग. जरा थांब. आणखीही कांहीं सांगायचं आहे. माझ्यासमोर बारा दासी आण. त्या अति सुंदर युवती असाव्यात. त्यांच्या अंगावरचा पोषाखही मौल्यवान असावा. माझ्या आईबरोबर त्या राजवाड्यांत जातील आणि शेवटचं म्हणजे माझ्या आईसाठीं मौल्यवान पोशाख आण ! "

" आपली आज्ञा मान्य आहे ! " असं म्हणून राक्षस गुप्त झाला आणि क्षणार्धांत ज्या ज्या गोष्टी सांगितल्या त्या त्या घेऊन तो पुन्हां हजर झाला. स्वत. त्यानं लगाम धरून एक घोडा आणला होता. त्याची बरोबरी उत्तमांत उत्तम अरबी घोड्यानंही केली नसती. हें सर्व पाहून अल्लाउद्दिनानं आपल्या आईला बोलावून तिला तिचीं वस्त्रें व अलंकार दिले. तिला बाराजणींचा ताफा दिला. सर्व तयारी झाल्यावर हा लवाजमा राजवाड्या-कडे निघण्यास सज्ज झाला.

नंतर अल्लाउद्दिनानं एका गुलामाला दरबारांत पाठवून सुलतान जनानखान्यांतून दरबारांत आला कीं नाहीं तें पहायला सांगितलं. तो गोरा गुलाम विजेच्या चापल्यानं जाऊन परत आला आणि म्हणाला, " सुलतान आपलीच वाट पहात आहे ! "

अल्लाउद्दीन उठला आणि आपल्या घोड्यावर बसला. त्याच्या मागून आणि पुढून गुलाम ऐटींत चालूं लागले. ती मिरवणूक पहाण्यासाठीं रस्त्यावर लोकांचे थवेच्या थवे जमूं लागले. गुलामांनीं रस्त्यावर जमलेल्या जमावाकडे सोन्याच्या मोहरा उधळल्या. सारा जमाव थक्क होऊन अल्लाउद्दिनाकडे

पाहूं लागला. अल्लाउद्दीन तर आतां सर्वांत सुंदर व राजाधिराजांचा पुत्र दिसत होता.

हें सारं अर्थात् त्या चमत्कारिक दिव्याच्या प्रभावानं झालं होतं.

सर्वांनीं त्याच्या औदार्याची प्रशंसा केली. त्याची वागणूक, गांभीर्य, चेहऱ्यावरील बुद्धीची चमक वगैरे पाहून त्यांनीं त्याला शुभ आशीर्वाद दिले. कुणीहि त्याचा द्वेष केला नाहीं. उलट सर्व म्हणाले, "त्याला जें मिळालें आहे त्याला तो सर्वथैव लायक आहे."

इकडे सुलतनानं आपल्या राज्यांतील सर्व उमरावांना व सरदारांना बोलाविलं आणि आपण अल्लाउद्दिनाला कसं वचन दिलं आहे हें त्यांना सांगितलं. तो आतां आपला जांवई होणार हें सांगून त्या सर्वांना त्याच्या स्वागतार्थ सामोरे जाण्याची आज्ञा केली. अमीर, वझीर, नबाब, सैन्याधिकारी वगैरे सर्वांनीं पुढं होऊन आपआपल्या मानाच्या जागा पटकावल्या. फक्त सुलतानच काय तो मागं राहिला.

अल्लाउद्दीन राजवाड्याच्या दरवाजापाशीं घोड्यावरून खालीं उतरण्याच्या बेतांत होता तोंच ज्याच्याकडे सामोरे जाण्याचं काम दिलं होतं तो नबाब पुढं होऊन म्हणाला, "आपण आपल्या घोड्यावरून न उतरतां दिवाणखान्याच्या दारापर्यंत चलावं !"

त्या सर्व अमीर, उमरावांनीं त्याला योग्य त्या ठिकाणीं आणलं. नंतर कांहींजण त्याच्या बाजूला उभे राहिले. कांहीं जणांनीं त्याच्या घोड्याचीं लगाम धरली. कांहींनीं त्याचा हात धरून त्याला उतरण्यास मदत केली. नंतर सर्व अमीर, उमरावांनीं त्याला मुख्य दिवाणखान्यांत सुलतानासमोर नलं.

सुलतान आपल्या आसनावरून झटकन् उतरला आणि त्यानं अल्लाउद्दिनाला आलिंगन देऊन त्याला सिंहासनावर आपल्या उजव्या बाजूस बसविलं. अल्लाउद्दिनानं जें जें योग्य होतं तें तें सारं केलं व तो म्हणाला, "सुलतानसाहेब, आपल्या औदर्यामुळं आपण आपली मुलगी बाद्र अल् बुदूर हिचा हात माझ्या हातांत दिलात. खरं म्हटलं तर मी त्यासाठीं तितकासा योग्य नाहीं. मी आपला एक बंदा गुलाम आहें. परमेश्वर आपल्याला आयुरारोग्य आणि विपुलता देवो. माझ्यावर देणग्यांचा जो वर्षाव झाला

आहे त्यामुळं माझी जीभ योग्य त्या शब्दांत आभार मानायला असमर्थ झाली आहे. माझी एवढीच प्रार्थना आहे कीं बाद्र अल् बुदूरसाठीं प्रासाद बांधायला मला एकादी जागा द्यावी !"

अल्लाउद्दिनाचं तें राजवैभव पाहून सुलतान अगदीं आश्चर्यचकित झाला व त्याच्या सौंदर्याकडे पहातच राहिला. शिवाय मदनाचे पुतळेच असे ते गोरे गुलाम त्याच्या सेवेस तत्पर असलेले पाहून त्याला मोठा अचंबा वाटला. परंतु सर्वांत आश्चर्यचकित करणारी गोष्ट म्हणजे अल्लाउद्दिनाची आई अत्यंत मौल्यवान अशा पोशाखांत एखाद्या राणीप्रमाणं तिच्या बारा दासींमध्यें शोभून दिसत होती. हें पाहून त्याला जास्तच आश्चर्य वाटलें. अल्लाउद्दिनाची बोलण्याची तऱ्हा, भाषेंतील मार्दव वगैरे पाहून तर तोंडांत बोटच घालण्याची त्याच्यावर पाळी आली. तशीच स्थिति बाकीच्या अमीर, उमरावांची झाली. हें सारं पाहून वझीराच्या पोटांत मात्र द्वेषाचा गोळा उठला. तें सारं पहाण्यापेक्षां मरण आलं तर बरं असं त्याला वाटूं लागलं. परंतु त्याला जास्त कशाचं वाईट वाटलं असेल तर अल्लाउद्दिनाचं सर्व भाषण ऐकून सुलतानानं त्याला प्रेमानं हृदयाशीं धरल्याबद्दल !

सुलतान मोठ्या प्रेमानं अल्लाउद्दिनाला म्हणाला, "अरेरे, बेटा या. अगोदरच तुझ्या संभाषणाचा योग आला नाहीं हीं मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे !"

असं म्हणून त्यानं हर्षभरानं वाद्यं वगैरे वाजविण्याची आज्ञा सोडली आणि स्वतः उठून जिथं मेजवानीचा थाट केला होता तिथं अल्लाउद्दिनाला नेलं. तत्काळ गुलामांनीं जेवणाचीं ताटं आणून ठेवलीं. सुलतान जेवावयास बसला. त्याच्या उजव्या बाजूला अल्लाउद्दीन बसला आणि मग वझीर आणि बाकीचे अमीर, उमराव आपआपल्या मानाप्रमाणं बसले. वाजंत्री वाजूं लागलीं. जेवणाची पंगत मोठी खुलून दिसत होती. खुद्द सुलतान अल्लाउद्दिनाला खूष ठेवण्याचा प्रयत्न करीत होता. अल्लाउद्दीनही मोठ्या विनयशीलपणं व तत्परतेनं उत्तरं देत होता. त्याच्या समर्पक भाषणावरून वाटत होतं कीं त्यानं आपलं सारं आयुष्य राजवाड्यांत सुलतानाच्या संगतींतच घालविलं आहे. जसं जसं त्यांचं संभाषण वाढत होतं तसं तसं सुलतान जास्त

खुपींत येत होता. आपल्या जावयाच्या सुमधुर भाषणानं त्याला मोहिनी घातली होती.

भोजनाचा कार्यक्रम संपल्यावर गुलामांनीं थाळे उचलून नेले. नंतर सुलतानानं काजींना व साक्षीदारांना पुढं यावयास सांगितलं. काजी व साक्षीदार तत्काळ पुढं झाले व त्यांनीं लग्नगांठ मारली; आणि अल्लाउद्दीन व बाद्र अल् बुदूर यांच्या लग्नाचा करारनामा लिहिला. साक्षीदारांनीं त्यावर सह्या केल्या. हें सारं झाल्यावर अल्लाउद्दीन उठून आपल्या घरीं जायच्या तयारीला लागणार तोंच त्याच्या सासऱ्यानं त्याला थांबवून म्हटलं, " बेटा, आतांच कुठं लग्न समारंभाला सुरवात झाली आहे. लग्नगांठहि आंताच मारली आहे. तेव्हां तूं आतां कोठें निघाला आहेस ? "

" राजकन्या बाद्र हिच्या इतमामाला साजेल असा प्रासाद मला बांधायचा आहे आणि तो बांधून झाल्याखेरीज मी तिला भेटणार नाहीं. " अल्लाउद्दीन म्हणाला. " प्रासाद अगदीं थोड्याच दिवसांत पुरा होईल अशी मला आशा आहे. जरी मी बाद्रच्या दर्शनासाठीं आतुर झालों आहें तरी तिची योग्य ती बडदास्त ठेवणं हें माझं पाहिलं कर्तव्य आहे. म्हणून मला तत्काळ कामाला लागायचं आहे ! "

अल्लाउद्दिनाच्या ह्या बोलण्यानं खूप होऊन सुलतान म्हणाला, " बेटा, सभोंवार पहा आणि तुला जी जागा योग्य वाटेल ती तूं घे. पण मला वाटतं माझ्या प्रासादासमोर जें उघडं मैदान आहे तेंच उत्तम आहे ! "

" माझीही हीच इच्छा आहे. म्हणजे नेहमीं आपल्या सान्निध्यांतच राहातां येईल. " अल्लाउद्दीन म्हणाला.

नंतर तो आपल्या घोड्यावर स्वार झाला. त्याचे सेवक त्याच्या पुढं आणि मागं चालूं लागले. त्याला पाहून सर्वांनीं आशीर्वाद दिले.

आपल्या घराजवळ येतांच तो खालीं उतरला आणि आपल्या खोलींत जाऊन त्यानं दिवा घासला.

तत्काळ राक्षसानं त्याच्यापुढं हजर होऊन विचारलं, " काय आज्ञा आहे ? "

" मला तुझ्याकडून महत्त्वाची कामगिरी करून घ्यायची आहे. " अल्लाउद्दीन म्हणाला, " आणि ती तूं केली पाहिजेस. सुलतानाच्या

राजवाड्यासमोर शक्य तितक्या लवकर सुंदर प्रासाद बांधून दिला पाहिजे. तो सर्व प्रकारच्या सुखसोयींनीं युक्त असला पाहिजे."

"आज्ञा शिरसावंद्य !" असं म्हणून राक्षस तत्काळ नाहींसा झाला. दुसऱ्या दिवशीं प्रात:काळीं तो राक्षस अल्लाउद्दिनापुढं येऊन म्हणाला, "महाराज प्रासाद कल्पनेप्रमाणं तयार आहे. आपल्याला तो पाहून घ्यायचा असेल तर माझ्याबरोबर चला !"

अल्लाउद्दीन झटकन उठला व क्षणार्धांत त्या राक्षसानं त्याला प्रासादांत आणून सोडलं. अल्लाउद्दिनानं जेव्हां तो पाहिला तेव्हां त्या बांधकामाबद्दल त्याला आश्चर्य वाटलं. त्याचे दगड संगमरवरी व सूर्यकांतमणी सुमकीं जातीचे होते. नंतर राक्षसानं त्याला खजीन्यांत नेलं. तिथं सोनं, चांदी, रत्नं ह्यांचा इतका खच पडला होता कीं, त्याची किमत करणं तर बाजूलाच राहिलं परंतु त्याची मोजदादहि करतां येणं शक्य नव्हतं. तिथून ते दुसऱ्या दालनांत आले. तिथें खाण्याचं सर्व साहित्य होतं. टेबलं, कपबशा, चमचे वगैरे सर्व हरतऱ्हेच्या जिनसा होत्या. त्याच्या बाजूच्याच खोलींत स्वयंपाकघर होतं. तिथं बबर्जींना लागणार सर्व सामान होतं. शिवाय सोन्या चांदीनं मढवलेल्या चुली होत्या. तिथून ते सामानाच्या खोलींत आले. ती खोली सामानानं भरगच्च भरलेली होती. सर्व कपाटं कपड्यालत्त्यांनीं भरलेलीं होतीं. तिथून मग ते निरनिराळ्या दालनांत फिरले. सगळीकडे भरगच्च माल भरलेला होता. तेथून ते तबेल्यांत गेले. तिथं जे घोडे होते तसले घोडे बादशहांच्या बादशहाकडेही दिसले नसते. हें सर्व पाहून अल्लाउद्दिनाला अतिशय आश्चर्य वाटलं. संपत्तीची नुसती खैरात केली होती. पृथ्वीवरील कुणाहि राजाला तें करतां आलं नसतं आणि हें सारं एका रात्रींत झालं होतं. शिवाय प्रासादांत गुलाम आणि दासीहि पुष्कळ होत्या. त्यांचं सौंदर्य पाहून साधूहि पाघळले असते. पण ह्या सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे, सर्वांत वरची खोली ! तिला एकंदर चोवीस खिडक्या होत्या. प्रत्येकीला पाचू, लाल व इतर रत्नं लावलीं होतीं. त्यांपैकीं एकच खिडकी अर्धी ठेविली होती आणि अल्लाउद्दिनाच्याच आज्ञेनं ती तशी ठेवली होती. कारण त्याला सुलतानाची कसोटी पहायची होती. कुणालाहि ती पुरी करतां येणंच शक्य नाहीं हें त्याला दाखवून द्यायचं होतं.

जेव्हां आल्लाउद्दिनानं सबंध इमारत तपासून पाहिली तेव्हां त्याला फार आनंद झाला. तो राक्षसाकडे वळून म्हणाला, " मला आणखी एक गोष्ट तुझ्याकडून करून घ्यायची आहे. तुला अगोदर सांगायला मी तें विसरूनच गेलों होतों ! "

" काय पाहिजे ? " राक्षस म्हणाला.

" सोन्यानं मढविलेला जरीबुट्टीचा असा रूजामा पाहिजे कीं तो आपल्या प्रासादापासून सुलतानाच्या प्रासादापर्यंत पुरला पाहिजे. म्हणजे राजकन्या बाद्र येथें येतांना त्यावरून चालत येईल. तिचे पाय जमिनीला लागणार नाहींत ! "

त्याचं बोलणं संपतांच राक्षस नाहींसा झाला व थोड्याच वेळांत परत येऊन म्हणाला, " आपल्या म्हणण्याप्रमाणं मीं रुजामा आणला आहे." आणि त्यानं तो त्याला दाखविला. तो पाहून अल्लाउद्दिनाची मती गुंगच झाली. त्यानंतर राक्षसानं त्याला त्याच्या घरीं नेऊन ठेवलं.

दिवस उजाडल्यावर सुलतान उठला आणि त्यानं खिडकी उघडली. तों त्याच्यासमोर भव्य इमारत उभी असलेली त्याला दिसली. त्यानं डोळे चोळले आणि पुन्हां समोर पाहिलं. समोरचा देखावा पुन्हां पहातांच त्याची खात्री पटली कीं समोरची इमारत भव्य असून ती मति गुंग करून टाकणारी आहे. दुसरी आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या इमारतीपासून राजवाड्यापर्यंत लांबच्या लांब गालिचा पसरलेला होता.

सुलतानाप्रमाणं त्याचे सेवक, पाणके, वगैरे झाडून सारे नोकर चाकर आश्चर्यसागरांत पोहत राहिले. इतक्यांत वझीर आला. त्यानं आंत येतां-क्षणींच नवीन बांधलेली इमारत पाहिली. तो भव्य गालिचा पाहिला आणि तोहि अगदीं आश्चर्यानं थक्क होऊन गेला.

जेव्हां तो सुलतानाकडे गेला तेव्हां ते दोघे त्या चमत्कारिक आणि आल्हादकारक कृतीबद्दल बोलत बसले. शेवटीं ते दोघेही म्हणाले, " असली इमारत कुठचाही बादशहा बांधू शकणार नाहीं ! "

लगेच सुलतान वझीराकडे वळून म्हणाला, " अल्लाउद्दीन माझ्या मुलीला योग्य असाच पति नाहीं काय ? तूं जर थोडा विचार केलास,

ह्या समोरच्या इमारतीकडेच पाहिलंस, तर कबूल करशील कीं ही कृती मानवाच्या शक्ती पलीकडली आहे ! ''

'' खाविंद, असली ही वैभवशाली इमारत जादूच्या साहाय्याखेरीज होणं शक्यच नाहीं. '' वझीर अल्लाउद्दिनाच्या द्वेषामुळं म्हणाला, '' कोणीही माणूस तो कितीहि चांगला असो, शक्तिमान असो अगर श्रीमान असो; एका दिवसांत अशी इमारत बांधणं शक्यच नाहीं ! ''

वझीराचं बोलणं ऐकून सुलतान म्हणाला, '' अल्लाउद्दिनाविरुद्ध सतत वाईट बोलण्याचा तूं विडाच उचललेला दिसतोस. मला माहीत आहे कीं याचं कारण द्वेष आहे. पण जो नवरीचा हुंडा म्हणून बादशहांच्या बादशहाकडे एकही रत्नं सांपडणार नाहीं असल्या बहुमोल रत्नांची भेट देतो त्याला असला प्रासाद बांधणं कठीण आहे काय ? ''

जेव्हां वझीरानं सुलतानाचे हे शब्द ऐकले तेव्हां त्याची खात्री झाली कीं सुलतान अल्लाउद्दिनावर फारच प्रेम करीत आहे. तेव्हां त्याचा द्वेष द्विगुणित झाला. परंतु तो त्या तरुणाविरुद्ध कांहींच करूं शकत नव्हता. त्यामुळं तो मनांतल्या मनांत तडफडत गप्प बसून राहिला.

अल्लाउद्दिनानं पाहिलं कीं सूर्य बराच वर आला आहे व राजवाड्यांत जायची वेळ झाली आहे. तेव्हां तो उठला आणि त्यानं दिवा घासला. त्याक्षणींच राक्षस त्याच्यापुढं हजर होऊन म्हणाला, '' तुझी काय आज्ञा आहे ती सांग. मी तुझ्या सेवेला हजर आहें ! ''

'' मला तत्काळ राजवाड्यांत जायचं आहे. तेव्हां माझ्यासाठीं ताबडतोब दहा हजार सोन्याच्या मोहरा घेऊन ये ! '' अल्लाउद्दीन म्हणाला.

राक्षस नाहींसा झाला आणि क्षणार्धांत मोहरा घेऊन आला. नंतर अल्लाउद्दीन आपल्या घोड्यावर स्वार झाला. त्याच्या मागं व पुढं गोरे गुलाम चालूं लागले. जातांना त्यानं सोन्याच्या नाण्यांची खैरात केली. त्यामुळं तो सर्वांचा प्रिय होऊन त्याची प्रतिष्ठा वाढली. तो राजवाड्याजवळ आला तेव्हां आगा, अमीर, उमराव, लष्करी अधिकारी वगैरे जमले होते. त्यांनीं अल्लाउद्दिनाला येतांना पाहिलं आणि तो येत असल्याची वर्दी सुलतानाला दिली.

तो दरबारांत येतांच सुलतान उठून पुढं झाला आणि त्यानं त्याचं स्वागत करून त्याला महालांत नेऊन आपल्या उजव्या बाजूला बसविलं.

लग्नानिमित्त सबंध शहर मोठ्या कौशल्यानं शृंगारलं होतं. राजवाड्यांत संगीताच्या मैफली झडत होत्या. गवई रस्त्यानं गात फिरत होते. निरनिराळ्या वाद्यांचे सुरेल स्वर सर्व ठिकाणांहून निघत होते. लोक आनंदानं बेहोष होऊन गेले होते.

आणि राजवाड्यांत दुपारच्या मेजवानीचा थाट ऐन रंगांत आला होता. सुलतान, अल्लाउद्दीन, वझीर, अमीर, उमराव वगैरे भोजनावर मनसोक्त ताव मारीत होते.

जशी राजवाड्यांत तशीच बाहेरहि मजा चालली होती. सर्व शहरवासी लोक मोठ्या आनंदांत खातपीत होते. दूरदूरचे नबाब व अधिकारी मुद्दाम अल्लाउद्दिनाचं लग्न पहाण्यासाठीं म्हणून आले होते. त्यांनीं तर अल्लाउद्दिनाचा तो प्रासाद पाहून तोंडांत बोटंच घातलीं. एका रात्रींत त्यानं एवढा मोठा प्रासाद कसा बांधला ह्याचं त्यांना आश्चर्य वाटलं. त्यांनीं अल्लाउद्दिनाला, " परमेश्वर आपलं भलं करो ! " असा आशीर्वाद दिला.

जेवण झाल्यावर अल्लाउद्दिनानं घरीं जाण्यासाठीं सुलतानाची आज्ञा मागितली. कारण त्याला आपली बायको बाद्र अल् बुदूर हिच्या स्वागताची तयारी करायची होती. सुलतानाची आज्ञा घेऊन तो आपल्या दासींसह घरीं जायला निघाला. तो रस्त्यानं जात असतांना लोक मोठ्यान ओरडले, " परमेश्वर तुम्हांला सुखी करो, तुमचं वैभव वाढवो आणि तुम्हांला दीर्घ आयुष्य आणि आरोग्य देवो ! "

लोकांनीं त्याला मिरवत मिरवत त्याच्या प्रासादांत नेलं. त्यानंहि पैशांची खूप खैरात केली. प्रासादाजवळ येतांच तो आपल्या घोड्यावरून उतरला आणि आंत जाऊन कोचावर बसला. नंतर त्यानं आपल्या सर्व नोकर चाकरांना राजकन्या बाद्रच्या जंगी स्वागताची तयारी करण्यास सांगितलं.

ऊन कमी झाल्यावर सुलतानानं आपल्या लष्करी अधिकाऱ्यांना आणि अमीर, उमरावांना समोरच्या मैदानांत जावयास सांगितलं आणि स्वत: तोहि तिथं गेला. थोड्या वेळानं अल्लाउद्दीनहि आपल्या घोड्यावर स्वार

होऊन आपल्या सेवकांसह त्या जागीं आला. कोणताहि उत्कृष्ट अरबी घोडा त्याच्या घोड्याची बरोबरी करूं शकत नव्हता.

लोकांच्या प्रचंड मेळाव्यासमोर लष्करानं कवाइतीचीं कामं करून दाखविलीं. नंतर स्वत: अल्लाउद्दिनानं अश्वारोहणाचीं कांहीं उत्कृष्ट कामं करून दाखविलीं. तीं कामं पाहून सारा जनसमूह अगदीं मुग्ध होऊन गेला. राजकन्या बाद्रसुद्धां आपल्या महालांतून त्याचं कौशल्य पहात होती. तें पाहून ती अगदीं खूष होऊन गेली आणि त्याच्यावर प्रेम करूं लागली. त्याला भेटण्याची अनिवार इच्छा तिच्या हृदयांत निर्माण झाली.

अल्लाउद्दिनानंतर इतरांनीं आपले घोडे रिंगणांत आणून आपलं कौशल्य दाखविलं. पण त्या सर्वांत अल्लाउद्दीनच श्रेष्ठ ठरला. कार्यक्रम संपल्यावर सुलतान आपल्या अमीर, उमरावांसह राजवाड्यांत परतला आणि अल्लाउद्दीन आपल्या प्रासादांत परत गेला.

सायंकाळ झाल्यावर वझीर, अमीर, उमराव यांनीं अल्लाउद्दिनाला मिरवणुकीनं सुलतानाच्या हमामखान्यांत नेलं. तिथं त्याला स्नान घातलं. त्याच्या अंगाला सुवासिक अत्तरं लावण्यांत आलीं. नंतर त्यानं पहिल्यापेक्षांहि सुंदर असा पोषाख चढवला आणि घोड्यावर स्वार होऊन अमीर, उमराव यांच्या समवेत तो चालूं लागला. कांहीं अधिकारी पुढं व कांहीं मागं व चार वझीर नग्न तलवारी घेऊन त्याच्या बाजूला चालत होते. सर्व नगरवासी आणि सैनिक शिस्तीनं त्याच्या पुढं जात होते. त्यांच्याकडे मेणबत्त्या, ताशे, तुताऱ्या आाण इतर मौजेचीं वाद्यं होतीं आणि ते मोठ्या उत्साहानं आणि आनंदानं तीं वाजवीत होते. अशा तऱ्हेनं ती मिरवणूक प्रासादाजवळ आली. अल्लाउद्दीन घोड्यावरून उतरून आंत गेला आणि आपल्या आसनावर बसला. तो बसल्यावर बाकीचे अमीर, उमराव आपआपल्या आसनावर बसले. नंतर त्यांनीं गोड गोड पेयें घेतलीं आणि आलेल्या लोकांनाहि दिलीं. तिथें किती निरनिराळ्या प्रकारचे लोक होते हें सांगणं शक्यच नव्हतं. तरी पण अल्लाउद्दिनानं आपल्या सेवकांना दरवाजाबाहेर उभे राहून सोन्याच्या नाण्यांची खैरात करावयास सांगितलं.

नंतर सुलतान राजवाड्यांत आला. त्यानं राजवाड्यांतील अमीर, उमराव, नोकरचाकर व दासदासी यांना वरातीची तयारी करण्यास सांगितलं.

सर्व अमीर, उमराव, लष्करी अधिकारी व इतर प्रमुख मंडळी तत्काळ स्वार होऊन मिरवणुकीच्या पुढं निघाली. त्यांच्या मागोमाग नोकर व दासी हातांत मेणबत्त्या घेऊन निघाल्या. नंतर राजकन्या बाद्र अल् बुदूर राजमहालांतून बाहेर येऊन चालूं लागली. तिच्या बाजूनं अल्लाउद्दिनाची आई मोठ्या दिमाखानं चालत होती. त्यांच्यापुढं वझीर, अमीर, उमराव व लष्करी अधिकारी यांच्या बायका चालत होत्या. अगोदरच तिच्या सेवेला दिलेल्या अठ्ठेचाळीस दासी तिच्या मागोमाग चालत होत्या. प्रत्येकीच्या हातांत कापुर आणि कस्तुरी यांनीं भरलेला घडा होता. तो घडा सोन्यानं मढविलेला व रत्नांनीं भूषविलेला होता. अशा तऱ्हेनं ही वैभवशाली मिरवणूक अल्लाउद्दिनाच्या प्रासादाजवळ आल्यावर त्यांनीं तिला वरच्या मजल्यावर नेऊन तिचे कपडे बदलले व तिला एका आसनावर बसविलं. मिरवणूक वगैरेचा कार्यक्रम संपल्यावर त्यांनीं तिला महालांत नेलं

आणि अल्लाउद्दिनानं तिला पाहिली भेट दिली. अल्लाउद्दिनाची आई या वेळपर्यंत तिच्यावरोबर होती. जेव्हां अल्लाउद्दीन आला आणि त्यानं बाद्रचा बुरखा बाजूला सारला तेव्हां म्हातारी बाद्रच्या अप्रतिम लावण्यानं अगदीं भारून गेली. नंतर तिनं कांहींशा उत्सुकतेनं महाल निरखून पाहिला. तो प्रासाद सोन्यानं व बहुमोल इंद्रमणी, पाचू व लाल वगैरे रत्नांनीं भूषविला असल्यामुळं त्यांची प्रभा सर्वत्र फांकली होती. तें पाहून ती अगदीं चकित होऊन स्वतःशींच म्हणाली, ‘मला वाटत होतं कीं सुलतानाच्या महालापेक्षां अधिक वैभवशाली महाल कुठंच सांपडणार नाहीं ! परंतु हा महाल कांहीं वेगळाच आहे. जगांतील कोणताहि सुलतान अगर बादशहा याच्यासारखा महाल आयुष्यांतहि बांधूं शकणार नाहीं. सर्व जग जरी एकवटलं तरी एका रात्रींत असा प्रासाद उभारणं शक्य नाहीं !’

राजकन्या बाद्रसुद्धां मोठ्या आश्चर्यानं तो महाल पहात बसली. तिची मति अगदीं गुंग होऊन गेली होती. स्वर्गांतल्या महालांत असल्याचा तिला भास होत होता.

नंतर जेवणाचीं ताटं आलीं. सर्व लोक जेवले, खाल्ले, प्याले आणि त्यांनीं मजा केली. त्यानंतर ऐंशीं दासी पुढं आल्या. प्रत्येकीच्या हातांत एक एक वाद्य होतं. जेव्हां त्यांनीं कौशल्यानं आपलीं बोटं त्यावरून फिरविण्यास

नाग्रवाड.म५
2638
१८/१२/६१

सुरवात केली तेव्हां त्यांतून अत्यंत मधुर असं संगीत बाहेर पडूं लागलं. तें इतकं गोड होतं कीं, ऐकणाऱ्यांचीं हृदयें कंप पावत होतीं. सारे अगदीं मंत्र-मुग्ध झाल्याप्रमाणं डोलत होते. राजकन्या बाद्रची स्थितीसुद्धां तशीच झाली होती. तें नितांत सुंदर संगीत ऐकून ती स्वतःशींच म्हणाली, 'माझ्या सबंध आयुष्यांत मी असलं संगीत ऐकलं नव्हतं !' तिला त्या गाण्यापुढं जेवणाचाहि विसर पडला व देहभान विसरून ती तें गीत ऐकूं लागली.

जेवणठाण संपलं आणि सारी निरवानिरव झाली तेव्हां अल्लाउद्दीन आपल्या महालांत गेला. सकाळीं सेवकांनीं आणलेले मोठे मौल्यमान कपडे चढवून वर बहुमोल झगा त्यानं चढविला. नंतर स्वादिष्ट वस्तू टाकलेली कॉफी घेऊन त्यानं घोड्यावर जीन टाकण्यास सांगितलं. घोडा तयार असल्याची वर्दी आल्यावर तो घोड्यावर स्वार होऊन आपल्या सेवकांसह सुलतानाच्या महालांत गेला. त्याच्या सेवकांनीं ती वर्दी ताबडतोब सुलतानाला दिली. त्याबरोबर स्वतः सुलतान त्याला सामोरा गेला. त्याला घेऊन त्यानं आपल्या उजव्या बाजूला बसवलं आणि त्याला आशीर्वाद दिला. सुलतानानं नाश्ता आणण्यास सांगितलं. नाश्ता संपविल्यावर अल्लाउद्दीन सुलतानाला म्हणाला, "सुलतानांनीं आज आपल्या सर्व अमीर, उमराव, सरदार आणि दरबारी मंडळीसह आपली कन्या बाद्र अल् बुदूर हिच्या घरीं जेवावयास यावं !"

"बेटा," सुलतान म्हणाला, "तूं तर तुझ्या औदार्यानं मला आश्चर्य-चकित करून टाकीत आहेस !"

असं म्हणून सुलतानानं सर्व निमंत्रितांना जेवणाचं आमंत्रण देऊन तो स्वतः स्वार होऊन अल्लाउद्दिनाच्या प्रासादाकडे जाण्यास निघाला. तो जेव्हां आंत आला आणि त्यानं संगमरवरी दगड, सूर्यमणी, पाचू, हिरे वगैरे बहुमोल रत्नांनीं सुशोभित केलेला तो महाल पाहिला तेव्हां त्याचं वैपुल्य पाहून तो अगदीं थक्क झाला. तो आपल्या वझीराकडे वळून म्हणाला, "वझीर, सोनं, हिरे, माणकं वगैरे नाना तऱ्हेच्या रत्नांनीं सुशोभित केलेला हा महाल तूं पहात आहेस ना ! असा महाल महा बलाढ्य अशा पातशहाकडे तरी असेल काय ?"

"नाहीं !" मुख्य वझीर म्हणाला, "पृथ्वीवर राज्य करणाऱ्या मानवी राजाकडून असलं काम होणं शक्यच नाहीं. इतकंच नव्हे तर जगांतील

सर्व लोक एकत्र केले तरीसुद्धां हें काम होणार नाहीं. अशा तऱ्हेचे महाल बनविणारे गवंडीसुद्धां पृथ्वीतलावर सापडणार नाहींत. हें सर्व जादूखेरीज शक्यच नाहीं!"

वझीराचं हें बोलणं ऐकून सुलतानाची खात्री झाली कीं तो जें बोलत आहे तें अल्लाउद्दिनाच्या द्वेषामुळंच! सुलतान कांहींसा चिडून म्हणाला, "वझीरा, पुरे झालं तुझं बोलणं. तुझ्याकडे ह्याशिवाय दुसरं बोलण्यासारखं कांहींच नाहीं. तुझ्या मनांत काय आहे आणि तूं कशामुळं बोलत आहेस हें मला पुरेपूर माहीत आहे!"

नंतर अल्लाउद्दिनानं सुलतानाला वरच्या सज्जांत नेलं. तिथून निरभ्र आकाश दिसत होतं. सुलतानानं तो महाल निरखून पाहिला. खिडक्या आणि त्यांचीं तावदानं या सर्वांना पाचू, लाल व इतर रत्नं लावलेलीं होतीं. तें सर्व पाहून त्याला अत्यंत आश्चर्य वाटलं त्यानं अशा संभ्रमी अवस्थेंत त्या महालांत एक चक्कर मारली. फिरतां फिरतां त्याचं लक्ष मुद्दाम अपुऱ्या ठेवलेल्या खिडकीकडे गेलं. ती अपुरी खिडकी पाहून सहाजिकपणेंच तो म्हणाला, "हे खिडकी! तुझा धिक्कार असो! तूं अपुरी आहेस हें किती वाईट!" नंतर तो आपल्या वझीराकडे वळून म्हणाला, "वझीरा, ही खिडकी व तावदानं अपुरीं ठेवण्याचं कारण काय असावं बर?"

"मला वाटतं," वझीर म्हणाला. "आपण अल्लाउद्दिनाचं लग्न पुढं ढकललं हें तरी कारण असावं अगर त्याला ती पुरी करायला वेळ तरी मिळाला नसावा!"

त्यांचं हें संभाषण चालू असतांना अल्लाउद्दीन आपल्या पत्नीला तिचे वडील आले आहेत ही बातमी सांगण्यासाठीं म्हणून आंत गेला होता तो परत आला. सुलतानानं त्याला विचारलं, "या महालाची ही एकच खिडकी अपुरी ठेवण्याचं कारण काय?"

"खाविंद" अल्लाउद्दीन म्हणाला, "एकाएकीं लग्न ठरल्यामुळं मला वेळ मिळाला नाहीं. शिवाय ती पुरी करण्यासाठीं लागणारे कारागीरही मिळाले नाहींत!"

"असं आहे तर," सुलतान म्हणाला, "मी ती पुरी करून घेतों!"

"जशी आपली मर्जी!" अल्लाउद्दीन म्हणाला. "आपली सदैव

भरभराट होवो आणि आपली ही स्मृति आपल्या कन्येच्या महालांत सदैव राहो !"

लगेच सुलतानानं सर्व जवाहिऱ्यांना व सोनारांना ताबडतोब येण्याचा हुकूम केला आणि त्यांना सर्व प्रकारचीं रत्नं भांडारांतून द्यावयास सांगितलं. ते येतांच त्यांना अपुरी खिडकी पुरी करण्याचा आदेश दिला.

दरम्यान राजकन्या आपल्या बापाला भेटण्यासाठीं आली. तिच्या सुंदर चेहऱ्यावर मोहक हास्य विलसत होतं. ती अगदीं खुषींत होती. तिला पाहून सुलतानालाही फार आनंद झाला आणि त्यानं तिलों ममतेनं पोटाशीं धरलं.

इतकं होईतों दुपारच्या जेवणाची वेळ झाली. टेबलावर ताटं मांडलीं. एक टेबल सुलतान, त्याची मुलगी व जांवई यांसाठीं होतं. दुसरीं वझीर, सरदार, अमीर, उमराव आणि इतर मुख्य अधिकारी यांच्यासाठीं होतीं. सुलतान आपली कन्या आणि जांवई यांच्यामध्यें बसला आणि त्यानं अन्नाचा एक घांस आपल्या तोंडांत घातला. अन्न शिजवण्याच्या कौशल्याचं आणि स्वादिष्टपणाचं त्याला आश्चर्य वाटलं. शिवाय त्याच्यापुढं, चंद्राच्या सौंदर्याशीं स्पर्धा करतील अशा ऐंशीं सुंदर युवती हातांत वाद्यं घेऊन तयार होत्या त्यांनीं आपलीं बोटं त्यांवरून फिरविण्यास सुरवात करतांच त्यांतून स्वर्गीय संगीत बाहेर पडूं लागलं. तें संगीत इतकं मधूर, मोहक आणि मंत्रमुग्ध करणारं होतं कीं दुःखी मनुष्यसुद्धां तें ऐकतांच आनंदित झाला असता. सुलतान अगदीं खूष झाला. वेळ मजेंत जाऊं लागला. तो म्हणाला, "खरं सांगायचं म्हणजे एकाद्या पातशहाच्या अगर कैसरच्याही आवाक्याबाहेरचं हें सारं आहे !"

जेवण झाल्यावर मग मिठाई, निरनिराळ्या तऱ्हेचीं फळं आणि इतर खाद्य पदार्थ आले. त्या सर्वांचा खरपूस समाजार घेऊन झाल्यावर मग पंगत उठली, आणि दुसऱ्या महालांत गेली. तिथं थोडा वेळ आराम केल्यावर सुलतान उठला व आपल्या जवाहिऱ्यांनीं व सोनारांनीं आणलेलीं रत्नं त्या महालास शोभून दिसतात कीं नाहीं तें पहाण्यासाठीं निघाला. वर येऊन त्यानं काम पाहिलं, परंतु त्याला त्यांत फारच फरक दिसून आला. अल्लाउद्दिनाच्या महालांतील इतर खिडक्यांसारखी कांहीं ती खिडकी त्यांना बनवितां आली नाहीं. सुलतानानं त्यांना त्याबद्दल विचारतांच त्यांनीं सांगितलं

कीं, लहान खजिन्यांतील सर्व रत्नं आणलीं व वापरलीं. परंतु सर्व खजिना अपुराच पडला. तेव्हां सुलतानानं मोठा खजिना उघडून त्यांना जें जें पाहिजे होतं तें दिलं. शिवाय अल्लाउद्दिनानं जीं रत्नं देणगी म्हणून दिलीं होतीं तींहि रत्नं दिलीं. इतकं करूनही रत्नं अपुरींच पडलीं आणि अर्ध्या खिडकीचं कामसुद्धां पूर्ण झालं नाहीं. हें ऐकून सुलतानानं वझीर आणि अमीर, उमराव यांच्याकडील सर्व रत्नं घ्यायला सांगितलं, तरीसुद्धां तीं अपुरींच पडलीं.

दुसरे दिवशीं सकाळीं अल्लाउद्दीन कारागिरांचं काम पहाण्यासाठीं म्हणून गेला आणि पहातो तों खिडकीचं थोडंसुद्धां काम झालं नव्हतं. तेव्हां झालं होतं तें काम त्यानं काढायला लावलं व सर्व रत्नं ज्यांचीं त्यांना परत देण्यास सांगितलं. त्याच्या आज्ञेप्रमाणं सुलतानाचीं रत्नं सुलतानाला दिलीं व वझीराचीं वझीराला दिलीं. नंतर कारागिरांनीं सुलतानापुढं जाऊन घडलेली हकिगत त्याच्या कानावर घातली. सुलतानानं विचारलं, " तुम्हांला तो काय म्हणाला ? त्यानं खिडकी पुरी करण्याचं काम रहित कां केलं व केलेलं काम मोडण्यास कां सांगितलं ?

" खाविंद, " ते म्हणाले, " आम्हांला त्यांतील कांहीं माहिती नाहीं. पण केलेलं काम त्यानं मोडण्यास सांगितलं. "

तेव्हां सुलतान झटकन घोड्यावर स्वार होऊन अल्लाउद्दिनाकडे निघाला.

कारागिरांना महालांतून घालविल्यावर अल्लाउद्दीन आपल्या महालांत गेला आणि त्यानं दिवा घासला. तत्काळ दिव्याचा राक्षस त्याच्यापुढं उभा राहून म्हणाला, " काय आज्ञा आहे ? "

" माझी इच्छा आहे, " अल्लाउद्दीन म्हणाला, " ज्या खिडकीचं काम अपुरं सोडलेलं आहे तें तूं पुरं करावंस ! "

त्या क्षणींच तो राक्षस नाहींसा झाला आणि क्षणार्धांत पुन्हां परत येऊन म्हणाला, " आज्ञेप्रमाणं काम पुरं करून आलों आहें ! "

त्याचं बोलणं ऐकतांच अल्लाउद्दीन वर जाऊन खिडकीचं काम पुरं झालं कीं नाहीं तें पाहूं लागला. तो तें पहातो न पहातो तोंच सुलतान

भेटायला आल्याचा निरोप घेऊन हुजऱ्या आला. तसाच अल्लाउद्दीन आपल्या सासऱ्याला भेटायला खालीं गेला.

अल्लाउद्दिनाला पहातांच सुलतानानं प्रश्न केला. " बेटा, तूं महालाची खिडकी अपुरी कां ठेवली होतीस ?"

" त्याला कारण होतं, " अल्लाउद्दीन म्हणाला. " ती पुरी करण्यास मी असमर्थ होतों असं नाहीं. जिथं आपण येणार तो भाग मी अपुरा कसा ठेवीन ? आणि आपण निश्चित समजा कीं ती पुरी करायला मी समर्थ आहें. खाविंदांनीं स्वत: माझ्याबरोबर वर यावं आणि कांहीं करावयाचं बाकी असल्यास पहावं ! "

सुलतान अल्लाउद्दिनाबरोबर वर गेला आणि महालांत प्रवेश करून त्यानं इकडे तिकडे निरखून पाहिलं. परंतु कोणत्याहि खिडकींत दोष नव्हता. सर्व खिडक्या एकसारख्या दिसत होत्या. अल्लाउद्दिनाला पोटाशीं धरून सुलतानानं विचारलं, " बेटा, हा चमत्कार कसा काय घडला ? जवाहिऱ्यांना महिने पुरले नाहींत तिथं तूं एका रात्रींत हें काम कसं पुरं केलंस ? खरोखर तुझ्यासारखा जगांत कोणी नाहीं ! "

" परमेश्वर आपणाला दीर्घायुषी करो ! " अल्लाउद्दीन म्हणाला, " मी आपला गुलाम आहें, या प्रशंसेला मी पात्र नाहीं ! "

" मी केलेली प्रशंसा योग्यच आहे. " सुलतान म्हणाला, " कारण तूं जी करामत केलीस ती करायला जगांतले सारे करागीर अपुरे पडतील ! "

नंतर सुलतान खालीं आला व आपल्या मुलीच्या महालांत गेला. व तिथं त्यानं थोडी विश्रांती घेतली. तेवढ्यांतच त्याला कळून चुकलं कीं, ती वैभवांत आणि अत्यंत सुखांत व आनंदांत आहे. थोडा वेळ विश्रांती घेऊन तो आपल्या राजवाड्यांत परत आला.

अल्लाउद्दिनाचा आतां उद्योगच झाला होता कीं, दररोज आपल्या सेवकांसह शहरांत जाऊन चकरा मारायच्या व लोकांवर पैशांची खैरात करायची ! त्याच्या ह्या उदारतेमुळं श्रीमंत, गरीब, लांबचे, जवळचे, ओळखीचे, अनोळखीचे सर्व त्याच्यावर प्रेम करूं लागले व त्याच्या औदार्याची प्रशंसा करूं लागले. शिवाय त्यानं गरीब, फकीर वगैरेंना अधिक देणग्या

दिल्या. स्वहस्तानं त्यांना दानधर्म केला. त्यामुळं त्याची कीर्ति सर्वत्र झाली. सर्व अमीर, उमराव त्याच्याकडे येऊं लागले. इतकंच नव्हे तर त्याच्या नांवाचा उच्चार शपथेंत होऊं लागला. तो शिकारींत, अश्वारोहणांत भाग घेऊं लागला. राजकन्या बाद्र त्याची ही करामत पाही व वझीराच्या मुलापासून सुटका झाली म्हणून ती परमेश्वराचे आभार मानी.

इकडे अल्लाउद्दिनाच्या किर्तीत दररोज भर पडत चालली. सर्व अमीर, उमरावांना त्याच्याबद्दल स्नेहभाव वाटूं लागला आणि लोकांच्या दृष्टीनं तो आतां एक मोठा माणूस झाला.

एक दिवस कांहीं दुष्ट लोकांनीं सुलतानाच्या राज्यावर हल्ला चढविला. सुलतानानं सैन्याला पाचारण करून अल्लाउद्दिनाला अधिपती नेमलं

तावडतोब अल्लाउद्दिनानं सैन्यासह कूच केलं आणि मजल दरमजल करीत तो शत्रूच्या सैन्यासमोर येऊन ठेपला. शत्रू फार प्रबळ होता. अल्लाउद्दिनानं म्यानांतून आपली तलवार बाहेर काढली आणि आपल्या सैन्यासह तो शत्रूवर तुटून पडला. लढाईला तोंड लागलं. दोन्ही बाजूचे बरेच लोक ठार झाले. रक्ताचे पाट वाहूं लागले. मोठी घनचक्कर लढाई झाली. अल्लाउद्दिनानं शत्रुसैन्याची फळी फोडून शत्रूला पिटाळून लावलं. शत्रूचे बहुतेक सारे लोक मारले गेले व उरलेले जीव घेऊन पळून गेले. त्यामुळं शत्रूचा खजिना, गुरंढोरं, मालमत्ता व इतर सामासुमान त्याला मिळालं. ही सारी संपती घेऊन विजयी होऊन तो पुन्हां शहरांत आला. तेव्हां त्याच्या सत्कारार्थ सारं शहर सुभोभित केलं. सुलतान त्याला समोरा गेला व मोठ्या प्रेमानं त्यानं त्याला हृदयाशीं धरलं. जिकडे तिकडे आनंदी-आनंद पसरला. नंतर सासरा आणि जांवई आपल्या घरीं जायला निघाले.

बाद्रनं अल्लाउद्दिनाला पाहिलं तेव्हां तिला फार आनंद झाला व पुढं होऊन स्नेहभरानं त्याच्याकडे पहात ती त्याला आपल्या महालांत घेऊन गेली

थोड्याच वेळांत सुलतानहि तिथं आला व त्यांच्याजवळ बसला. दासींनीं सरबताचे पेले आणि मेवामिठाई त्यांच्यापुढं आणून ठेवली. नंतर सुल्तानानं आपल्या जांवयाच्या स्मरणार्थ सर्व राज्यभर रोषणाई करण्याचा

आदेश दिला. सर्व राज्य दिव्याच्या प्रकाशांत झगझगूं लागलं. सर्वत्र उत्साही वातावरण पसरलं. सारी प्रजा आनंदसागरांत पोहूं लागली. प्रजा आणि सैन्य यांना स्वर्गांत परमेश्वर आणि पृथ्वीवर अल्लाउद्दीन या दोन गोष्टी सोडून बाकी सर्वांचा विसर पडला. आधींच अल्लाउद्दिनाच्या औदार्यामुळं आणि आश्वारोहणपटुत्वामुळं सारी प्रजा त्याच्यावर प्रेम करीत होती. त्यांत त्यानं शत्रूचा पराभव करून देशाला विजय मिळवून दिल्यामुळं भर पडली. त्याला सारेजण देवाप्रमाणं मानूं लागले.

अशा तऱ्हेनं अल्लाउद्दीन दररोज आपल्या कीर्तींत व संपदेंत भर टाकीत सुखासमाधानानं कालक्रमणा करीत आयुष्य घालवूं लागला.

इकडे त्या मग्राबी जादूगाराचं काय झालं ? स्वदेशांत परत आल्यावर बरेच दिवस त्यानं अगदीं विषण्ण मनःस्थितींत घालविले. दिवा मिळविण्या-साठीं काय काय कष्ट केले, किती प्रवास केला आणि शेवटीं हातातोंडाशीं आलेला घास कसा निसटला याबद्दल पुन्हा पुन्हां विचार करून त्यानं बराच शोक केला. त्यानं अल्लाउद्दिनाला चांगल्याच शिव्या झाडल्या तरी पण त्यांतल्या त्यांत अल्लाउद्दिनाला जमिनीखालीं पुरल्यामुळं त्याच्या मनाला समाधान वाटत होतं. कारण तो दिवा तिथंच असल्यामुळं कधींना कधीं आपण तो हस्तगत करूंच करूं अशी त्याला आशा होती आणि त्या आशे-वरच तो एक एक दिवस घालवीत होता.

एकदां त्याच्या मनांत त्या दिव्याबद्दल विचार आला. त्याबरोबर त्यानं धुळपाटीवर कुंडली मांडली व आंकडे मांडून तो नीट पाहूं लागला. त्यांत त्याच्या मनाचं समाधान न होऊन त्यानं पुन्हां कागदावर ती कुंडली मांडली. त्याला आपली आई, मुलगी ह्याबद्दल सर्व कांहीं कळलं. परंतु त्या दिव्याबद्दल त्याला कांहींच समजलं नाहीं. समाधान न झाल्यामुळं त्यानं रागानं पुन्हां कुंडली मांडून अल्लाउद्दिनाचा नाश व दिव्याची सुरक्षितता तो पाहूं लागला. ह्या खेपेस त्याच्या प्रयत्नाला यश आलं. त्याला कळून चुकलं कीं, तो दिवा त्या जादूनं भारलेल्या खजिन्याच्या ठिकाणीं नाहीं आणि अल्लाउद्दीनही त्या ठिकाणाहून जिवंतपणं निसटला असून तो पृथ्वीवर जिवंतपणं संचार करीत आहे. त्यामुळं त्याचा राग त्याच्या मनांत मावेना. त्याच्या अंगाचा भडका उडाला. पुन्हां तो कुंडली निरखून पाहूं लागला तेव्हां त्याला समजलं कीं,

ज्याच्यासाठीं त्यानं एवढा लांबचा प्रवास केला होता, इतके कष्ट सहन केले होते, त्या दिव्याचा मालक अल्लाउद्दीनच बनला आहे. हें समजतांच तो एकदम रागानं स्वतःशींच म्हणाला, 'त्या दिव्यासाठीं मी इतके कष्ट आणि त्रास घेतले ! इतक्या कष्टांनंतर तो मलाच मिळाला पाहिजे. परंतु कांहीं एक गोष्ट न करतां तो दिवा अल्लाउद्दिनाला मिळाला आहे. शिवाय दिव्यांत असलेल्या शक्तीबद्दलहि त्याला सर्व कांहीं माहीत झालेलं आहे. त्या दिव्याच्या मालकापेक्षां ह्या जगांत कुणीहि अधिक श्रीमंत असूं शकत नाहीं. झाल्या गोष्टीला इलाज नाहीं. पण आतां मला अल्लाउद्दिनाचा नाशच करून टाकला पाहिजे !'

नंतर त्यानं दुसरी कुंडली मांडून नीट पाहिलं तेव्हां त्याला कळून चुकलं कीं, त्या पोरानं भयंकर संपत्ती गोळा केली आहे व सुलतानाच्या मुलीशीं लग्न केलं आहे. ह्या बातमीनं तो जादूगार मत्सर आणि द्वेष यामुळं आंतल्या आंत पेटून निघाला. लगेच उठून त्यानं चीन देशास निघण्याच्या प्रवासाची तयारी केली व एक क्षणहि वांया न दवडतां तो चीनच्या प्रवासास निघाला.

थोड्याच दिवसांत तो चीन देशांत आला. जेथें अल्लाउद्दीन रहात होता त्या शहरांत येऊन तो एका खानाकडे उतरला. तिथं थोडी विश्रांती घेतल्यावर त्यानं पुन्हां कपडे चढवले आणि तो शहरांत चक्कर मारण्यास निघाला. जिकडे तिकडे त्याच्या कानावर अल्लाउद्दिनाच्या महालाबद्दल, त्याच्या सौंदर्याबद्दल, त्याच्या दातृत्व व औदर्याबद्दल, त्याच्या वर्तणुकीबद्दल व चारित्र्याबद्दल लोक बोलतांना त्यानं ऐकलं. असं करतां करतां एका ठिकाणीं कांहीं लोक गरम गरम पेय घेत होते तिथं तो आला. खूप जोरानं बडबड करणाऱ्या एका तरुणाजवळ जाऊन म्हणाला, "तरुणा, ज्याच्याबद्दल तूं बोलतो आहेस तो मनुष्य कोण ?"

"तूं इथं अगदीं नवीन दिसतोस !" तो तरुण म्हणाला. "आणि जरी तूं दूरच्या देशांतून आलेला असलास तरी तूं अमीर अल्लाउद्दिनाबद्दल ऐकलं नाहींस हें कसं ? त्याची ख्याती जगभर झाली आहे व त्याचा महाल म्हणजे जगांतील एक आश्चर्यकारक चमत्कृती आहे. तुझ्या कानांवर ह्या गोष्टी कशा आल्या नाहींत ?"

त्यावर तो जादूगार म्हणाला, " माझी इच्छा आहे कीं तो महाल पहावा. परंतु मी तर इथं परका माणूस पडलों ! तेव्हां तूं माझ्यावर कृपा करून मला तो दाखवशील काय ? "

" आपली आज्ञा मला मान्य आहे ! " असं म्हणून तो जादूगाराला घेऊन अल्लाउद्दिनाच्या महालाजवळ गेला आणि त्याला तो महाल दाखविला.

तो पाहिल्यानंतर जादूगाराला कळून चुकलं कीं हें काम खास दिव्याचं आहे. तो स्वत:शींच म्हणाला, ' त्याची कबर केव्हां खणीन असं मला झालं आहे. त्याला तर संध्याकाळच्या जेवणाची पंचाईत होती. दैवानं मला मदत केली तर त्याचा जीव तर मी घेईनच. पण त्याच्या आईलाहि पुन्हा चरखा फिरवायला लावीन. ' असं म्हणत तो मोठ्या विषण्ण मन:स्थितींत आपल्या सराईमध्यें आला. अल्लाउद्दिनाच्या द्वेषामुळं त्याला फार दु:ख झालं होतं. त्यानं पुन्हां कुंडली मांडली व तो दिवा कुठं आहे तें पाहूं लागला. तेव्हां त्याला कळून आलं कीं दिवा महालांतच आहे, अल्लाउद्दिनाजवळ नाहीं. हें वर्तमान कळतांच त्याला फार आनंद झाला. तो मनांत म्हणाला, ' आतां त्या नीचाचे प्राण घेण्यास वेळ लागायचा नाहीं आणि दिवा मिळवण्यालाहि कष्ट पडायचे नाहींत ! "

नंतर तो एका तांबटाकडे गेला आणि त्याला म्हणाला, " मला कांहीं तांब्याचे दिवे बनवून पाहिजे आहेत. त्याबद्दल तुला भरपूर मोबदला मिळेल. परंतु दिवे मात्र लवकर तयार झाले पाहिजेत ! "

" आपण म्हणतां त्याप्रमाणं होईल ! " तांबट म्हणाला. लगेच त्यानं दिवे बनविण्यास सुरवात केली. ते पुरे झाले तेव्हां जादूगारानं त्याला त्यानं जी किंमत मागितली ती दिली व ते दिवे त्यानं सराईंत नेऊन एक टोपलींत ठेवले.

थोड्याच वेळांत तो नगराच्या हमरस्त्यानं आणि बाजारांतून मोठ्यानं ओरडूं लागला, " जुने दिवे देऊन नवीन घ्या ! "

जेव्हां लोकांनीं तें ऐकलं तेव्हां ते म्हणाले, " खात्रीनं ह्याला भुतानं पछाडलेलं आहे ! " सर्व लोक त्याच्या मागें लागले व मोहल्यांतील मुलं त्याच्या मागोमाग या ठिकाणाहून त्या ठिकाणीं जाऊं लागलीं. पण तो मुळींच रागावला नाहीं. अगर त्यांनीं दिलेल्या त्रासाचा त्यानं विचारहि केला नाहीं.

अशा तऱ्हेनं अल्लाउद्दिनाच्या महालाकडे येईपर्यंत त्यानं आपला हा क्रम सोडला नाहीं. तिथं आल्यावर त्यानं मोठ्यानं आरोळी दिली आणि मुलांनीं वेडा वेडा म्हणून त्याला सतावण्यास सुरवात केली.

ह्याच वेळीं दैवगतीमुळं राजकन्या बाद्र आपल्या महालांत बसली होती. तिनं तो दिवेवाल्याचा आवाज आणि मुलांचा गोंगाटही ऐकला. काय चाललं आहे तें मात्र तिला कळलं नाहीं. तिनं एका दासीला खालीं जाऊन काय चाललं आहे तें पाहून येण्यास सांगितलं. दासी झटकन खालीं गेली तेव्हां तो दिवेवाला ओरडत होता. " जुने दिवे द्या व नवीन घ्या ! " आणि बच्चे लोक त्याचा पाठलाग करून त्याची टर उडवीत होते.

राजकन्येला ही हकीगत समजल्यावर ती खूप हंसली. अल्लाउद्दिनानं तो जादूचा दिवा कडीकुलपांत बंदोबस्तानं न ठेवतां आपल्या महालांत उघडयावरच ठेवला होता व एका दासीनं तो पाहिला होता. ती दासी म्हणाली, " बाईसाहेब, अल्लाउद्दीनसाहेबांच्या महालांत मी एक जुना दिवा पाहिला आहे. तो आपण त्याला देऊं आणि तो वेडा ओरडतो आहे त्यांत कांहीं सत्य आहे कीं नाहीं तें पाहूं या ! "

ज्या दिव्यानें तिच्या नवऱ्याला एवढ्या मोठ्या पदावर चढविलं होतं त्या दिव्याबद्दल राजकन्या बाद्र हिला कांहींसुद्धां माहिती नव्हती. तेव्हां सहाजिकच ती दासीला म्हणाली, " तुझ्या मालकाच्या महालांत आहे म्हणालीस तो दिवा आण बघूं ! " तिचा उद्देश फक्त त्या फेरीवाल्याच्या मनाची चांचणी घेण्याचा होता. दासीनं तिच्या हुकुमाप्रमाणं अल्लाउद्दिनाच्या महालांतून दिवा आणून तिच्याकडे दिला. तिनं लगेच एका आगाला हांक मारून तो दिवा देऊन नवीन दिवा घेऊन यायला सांगितलं. तो विचारा खालीं गेला व जुना दिवा देऊन नवा दिवा घेऊन आला. राजकन्येनं जेव्हां तो नवा कोरा चकचकीत दिवा पाहिला तेव्हां तिनं त्या फेरीवाल्याच्या अकलेची तारीफ केली !

परंतु त्या जादूगाराच्या हातांत तो दिवा पडतांच त्यानं ताबडतोब ओळखलं कीं तो दिवा त्या जादूच्या खजिन्याचा आहे. त्यानं तो आपल्या खिशांत घातला आणि जे लोक जुने दिवे देऊन नवीन घेण्यासाठीं आले होते त्यांना ते सर्व नवीन दिवे देऊन टाकून तो सरळ निघून गेला. नंतर तो

पळत पळत नगराच्या बाहेर गेला. बाहेरच्या मैदानांत आल्यावर तो स्वस्थ बसून राहिला. रात्र पडेपर्यंत आणि ती जागा निर्मनुष्य होईपर्यंत तो स्वस्थ राहिला. नंतर त्यानं तो दिवा काढला व घासला.

त्यावरोबर दिव्याचा सेवक राक्षस त्याच्यापुढं उभा राहून म्हणाला, " आपला सेवक आपल्यापुढं उभा आहे. आपल्याला काय पाहिजे तें सांगा ! "

" माझी अशी इच्छा आहे कीं, अल्लाउद्दिनाचा महाल त्यांतील सर्व माणसांसह, सर्व सामानासुमानासह उचलून माझा देश जो आफ्रिका त्यामध्यें नेऊन ठेव. तुला माझं शहर माहीत आहेच. त्यांतील उद्यानाच्या जवळ नेऊन तो महाल ठेंव आणि मलाहि तिथें घेऊन जा ! " जादूगार म्हणाला.

" आपली आज्ञा प्रमाण ! " राक्षस म्हणाला, " आपण डोळे मिटा व उघडा. तेवढ्या अवधींत तुम्हांला तो महाल त्यांतील लोकांसह आणि सामानासुमानासह तेथें गेलेला दिसेल ! "

आणि एका क्षणांत तो जादूगार, अल्लाउद्दिनाचा महाल आणि आंतील सर्व लोक आफ्रिकेंत पावते झाले.

अशा तऱ्हेनं त्या मग्रावी जादूगारानं आपला डाव साधला. आतां इकडे सुलतान आणि त्याचा जांवई यांनीं काय केलं तें पाहूं या.

सकाळीं झोपेंतून जागा होतांच समोरची खिडकी उघडायची आणि आपल्या कन्येच्या निवासस्थानाचं दर्शन घ्यायचं हा सुलतानाचा नेहमींचा क्रम होता. या नियमाप्रमाणं सकाळ होतांच तो उठला आणि त्यानं खिडकी उघडून समोर पाहिलं. पण काय आश्चर्य ! तेथें अल्लाउद्दिनाचा महाल नव्हता ! पूर्वीसारखं तिथं ओसाड मैदान होतं. त्याला आश्चर्याचा धक्काच बसला. त्यानं आपले डोळे चोळले आणि पुन्हां बाहेर पाहिलं. परंतु कांहीं दिसेना. त्याचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना. आपल्याला कांहीं तरीच भास होत आहे असं त्याला वाटूं लागलं. आपल्या डोळ्यांत तर कांहीं बिघाड झाला नसेल ना अशी त्याला शंका आली. परंतु पुन्हां पुन्हां प्रयत्न करूनहि जेव्हां महाल दिसेना तेव्हां त्याची खात्री झाली कीं, तिथं महाल नाहीं. महाल कसा नाहींसा झाला ह्याचं त्याला मोठं नवल वाटलं. त्याच्या आश्चर्याला पारावार उरला नाहीं. त्याची मती अगदीं गुंग झाली. तो

आपले हात चोळूं लागला. आपल्या लाडक्या कन्येचं काय झालं असेल ह्या चिंतेनं त्याच्या काळजाचं पाणी पाणी झालं. त्याच्या डोळ्यांतून अश्रूंचा पूर वाहूं लागला. त्याच्या दाढीवरून अश्रूंचीं टिपें गळूं लागलीं. त्यानं तत्काळ वझीराला निरोप पाठविला.

वझीर आला आणि सुलतानाला दुःखांत पाहून त्यानं विचारलं, "खाविंद, परमेश्वर आपल्याला सदैव दुःखापासून दूर ठेवो. आपण आज कष्टी कां ? आपल्या दुःखाचं कारण काय ?"

"मला वाटतं तुला माझ्या दुःखाचं कारण माहीत नाहीं." सुलतान म्हणाला.

"नाहीं !" वझीर म्हणाला, "आपल्या दुःखाची मला कल्पना नाहीं."

"यावरून तूं अल्लाउद्दिनाच्या महालाकडे लक्ष टाकलेलं दिसत नाहीं."

"खरं आहे !" वझीर म्हणाला, "कदाचित् तो बंद असेल ?"

"तर मग तूं खिडकींतून त्या बाजूला नजर टाक आणि तो बंद आहे कीं उघडा आहे तें पहा !"

सुलतानाच्या आज्ञेप्रमाणं वझीरानं पाहिलं परंतु त्याला त्या बाजूला कांहींच दिसलं नाहीं. आश्चर्याच्या झटक्यांतच तो सुलतानाकडे परतला. तेव्हां सुलतानानं विचारलं, "आतां तरी तुला माझ्या दुःखाचं कारण कळलं ना ? महाल बंद केलेला अगर कुलूप ठोकलेला आहे काय ?"

"खाविंद !" वझीर म्हणाला, "मी आपणांस अगोदरच सांगितलं होतं कीं, तो महाल आणि आंतील सर्व वस्तू जादूच्या आहेत म्हणून !"

हें ऐकतांच सुलतानाला भयंकर राग आला. त्यानं विचारलं, "या क्षणाला अल्लाउद्दीन कुठं आहे ?"

"तो शिकारीला गेला आहे."

त्याबरोबर सुलतानानं आपल्या लष्करी अधिकाऱ्यांना बोलवून आणून त्यांना तावडतोब अल्लाउद्दिनाला जसा असेल तसा बेड्या ठोकून आणावयास सांगितलं.

सुलतानाचा हुकूम ऐकतांच ते सरळ अल्लाउद्दिनाकडे गेले व म्हणाले, "आम्हांला क्षमा करा. सुलतानानें तुम्हांला बेड्या घालून कैद करून

आणायला सांगितलं आहे. सुलतानाची आज्ञा आम्हांला पाळलीच पाहिजे. तुम्ही याबद्दल आम्हांला क्षमा करा !"

अल्लाउद्दिनाला सुलतानाची आज्ञा ऐकून आश्चर्य वाटलं. काय घडलं असावं हें विचार करूनहि त्याला समजेना. थोडा वेळ स्तब्ध राहून त्यानं विचारलं, " सुलतानानं अशी आज्ञा कां दिली याची तुम्हांला कल्पना आहे काय ? माझी खात्री आहे कीं, मीं सुलतानाविरुद्ध अगर त्याच्या राज्या-विरुद्ध जराहि गुन्हा केलेला नाहीं कीं पापहि केलेलं नाहीं ! "

" आम्हांला त्याबद्दल कांहींहि माहिती नाहीं. " ते म्हणाले.

अल्लाउद्दीन आपल्या घोड्यावरून खालीं उतरला आणि म्हणाला, " तुम्हांला सुलतानानं जस सांगितलं आहे तसं करा. मला सुलतानाची आज्ञा शिरसामान्य आहे !"

आगांनीं त्याला दोऱ्यांनीं गच्च बांधलं आणि त्याचे हात पाठीमागं नेऊन हातांत बेड्या ठोकल्या. नंतर त्यांनीं त्याला शहरांत आणलं.

जेव्हां लोकांनीं त्याला अशा तऱ्हेनं कैद करून आणलेलं पाहिलं तेव्हां त्यांना वाटलं कीं, सुलतानाच्या मनांतून त्याला ठार मारायचं आहे. लोकांचं त्याच्यावर फार प्रेम होतं. लगेच त्यांनीं आपलीं हत्यारं उपसली आणि आपल्या घरांतून बाहेर पडून ते सैन्याच्या मागोमाग चालूं लागले.

जेव्हां सैन्यानं सुलतानाला कळविलं कीं आपण अल्लाउद्दिनाला आणलं आहे तेव्हां त्यानं मागचा पुढचा कांहीं एक विचार न करतां अल्लाउद्दिनाचं डोकं उडविण्याचा हुकूम सोडला. पण लोकांना जेव्हां सुलतानाचा हुकूम कळला तेव्हां ते वेशींत जमावानं उभे राहिले. राजवाड्याचे दरवाजे त्यांनीं बंद केले आणि सुलतानाला निरोप पाठविला कीं, " जर अअल्लाउद्दिनाच्या शरीराला जराही दुखापत झाली तर या क्षणाला तुमचा प्रासाद जमीन दोस्त केला जाईल. इतकंच नव्हे तर तुमच्यासकट सारं कांहीं धुळीला मिळविलं जाईल !"

वझीरानं तत्काळ हा निरोप सुलतानाला कळविला आणि तो म्हणाला, " लोक भयंकर खवळलेले आहेत. तुमच्या आमच्यासह राजमहाल जमीन-दोस्त होईल. तेव्हां कांहीं गंडांतर यायच्या आंत आपण आपल्या जांवयाला

क्षमा करावी. कारण आपल्यापेक्षां त्याच्यावर त्यांचं जास्त प्रेम आहे आणि त्याच्यासाठीं कांहींहि करायची त्यांची तयारी आहे !"

त्या क्षणाला शिरच्छेद करणाऱ्या माणसानं तांबडा गालिचा जमिनीवर टाकला होता. अल्लाउद्दिनाचे डोळे बांधले होते आणि त्याला त्यावर बसवून तो त्याच्याभोंवतीं तीन प्रदक्षिणा घालीत होता. परंतु प्रदक्षिणा घालतांना तो वारंवार थांबून सुलतानाची शेवटची आज्ञा काय येते हें पहात होता.

इतक्यांत सुलतानानं खिडकी उघडून बाहेर पाहिलं. तों सर्व प्रजेनं एकत्रित होऊन राजवाड्यावर हल्ला केलेला आहे आणि ते भिंती पाडून टाकण्याच्या बेतांत आहेत असं त्याला दिसून आलं. त्यानं ताबडतोब शिरच्छेद करणाऱ्याला थांबण्याचा हुकूम केला; आणि ललकारीवाल्याला मोठ्यानं ओरडून लोकांना सांगण्यास फर्माविलं कीं, जांवयाला माफि केली आहे.

जेव्हां अल्लाउद्दिनाला आपण सुटल्याचं कळलं तेव्हां तो तत्काळ सुलतानाजवळ गेला आणि त्याला म्हणाला, " आजपर्यंत आपण मला जवळ केलं होतं, मग आतांच मी काय पाप केलं आहे तें मला सांगा. "

" या क्षणाला तूं काय पाप केलं आहेस तें मला सांगतां यायचं नाहीं." असं म्हणून सुलतान वझीराकडे वळून म्हणाला, " याला खिडकीबाहेर पहायला लाव व नंतर त्याला समोरच्या महालाचं काय झालं तें विचार. "

सुलतानाच्या आज्ञेप्रमाणं अल्लाउद्दिनानं केलं, तेव्हां त्याला कळून चुकलं कीं, आपला महाल तिथं नाहीं. त्याला मोठं आश्चर्य वाटलं. महालाचं काय झालं तें त्याला समजेना.

तो खिडकीपासून मागं आला तेव्हां सुलतानानं त्याला विचारलं, " बोल, तूं समोर काय पाहिलंस ?"

" समोर कांहींसुद्धां नाहीं !" अल्लाउद्दीन म्हणाला, " आणि काय झालं ह्याची मला कांहींच कल्पना नाहीं."

" आतां मी तुझा अपराध माफ केला आहे. " सुलतान त्याच्याकडे पहात म्हणाला, " तेव्हां माझ्या मुलीचं काय झालं तें तूं शोधून काढ आणि तिच्याशिवाय माझ्या राज्यांत पाऊल टाकूं नकोस. तूं जर तिला आणलं नाहींस तर तुझी गर्दन छाटली जाईल हें लक्षांत ठेव."

" आपली आज्ञा मला मान्य आहे." अल्लाउद्दीन म्हणाला, " मला चाळीस दिवसांचा अवधि द्या. त्या अवधींत मी तिला आणली नाहीं तर खुशाल माझा शिरच्छेद करा अगर तुम्हांला माझं जें करायचं असेल तें करा ! "

" तुझ्या म्हणण्याप्रमाणं मी तुला चाळीस दिवसांची मुदत देतों पण लक्षांत ठेव कीं, तूं माझ्यापासून सुटणार नाहींस. पृथ्वीवर न राहतां तूं आकाशांत जरी गेलास तरी मी तुला खालीं आणीन. "

" सुलतानसाहेब," अल्लाउद्दीन म्हणाला, " माझ्या म्हणण्याप्रमाणं दिलेल्या मुदतींत मी तिला आणूं शकलों नाहीं तर स्वत: होऊन मी आपणांपुढं शिरच्छेदासाठीं उभा राहीन."

जेव्हां लोकांनीं अल्लाउद्दिनाला सुटलेला पाहिलं तेव्हां त्याना आनंदीआनंद झाला. परंतु अल्लाउद्दिनाला आपल्या मित्रांपुढं यायला लाज वाटत होती. शिवाय शत्रूंच्या आनंदामुळं त्याला मान वर काढायचीही शरम वाटत होती. त्यामुळं तो एकटाच शहरांतल्या रस्त्यानं भटकूं लागला. महाल एकाएकीं कसा नाहींसा झाला हें त्याला समजेना. तो सारखा विचार करूं लागला. अशा तऱ्हेनं त्यानं राजधानींत दोन दिवस घालविले. परंतु बायको आणि महाल यांचा शोध कसा करावा हें त्याला समजेना. या दोन दिवसांत लोकांनीं स्वत: होऊन त्याला जेवण आणून दिलं.

दोन दिवसांनंतर शहर सोडून तो शहराच्या वेशीबाहेरील मैदानांत आला. कुठं जायचं, कसा शोध करायचा ह्याबद्दल अजूनही त्याच्या मनांत निश्चित असं कांहींच ठरलं नव्हतं. शेवटीं चालत चालत तो नदीकांठीं आला. दु:खानं आणि अपमानानं तो वेडा झाला होता. नदी दिसतांच निराशेनं त्यानं नदींत जीव देण्याचा विचार केला. परंतु थोडा विचार करून हातपाय धुण्यासाठीं तो जरासा पाण्यांत उतरला. थोडंसं पाणी हातांत घेऊन तो हात धुऊं लागला. असं करतांना त्याच्या हातांतली आंगठी घासली गेली आणि त्या आंगठीचा राक्षस त्याच्यापुढं उभा राहून म्हणाला, " तुला काय पाहिजे त्याची मला आज्ञा कर. "

त्या राक्षसाला पाहून अल्लाउद्दिनाला एकदम हर्ष झाला. तो आनंदानं त्याला म्हणाला, " सेवका, माझी अशी इच्छा आहे कीं, माझा महाल, माझी

बायको बाद्र अल् बुदूर हिच्यासह आणि आंतील सर्व माणसांसह माझ्या समोर यावा."

"मला जें करतां येणार नाहीं तें तूं करायला सांगतो आहेस." तो राक्षस म्हणाला. "ती गोष्ट दिव्याच्या सेवकाची आहे. त्यामध्यें मी कांहीं करूं शकत नाहीं."

"तुझ्या शक्तीबाहेरचं आहे तें तूं करूं नकोस." अल्लाउद्दीन म्हणाला, "आणि मी तुला तें सांगतहि नाहीं. फक्त तो महाल ज्या प्रदेशांत आहे त्या ठिकाणीं तूं मला नेऊन सोड म्हणजे झालं!"

"आपली आज्ञा मला मान्य आहे." सेवक म्हणाला.

आणि त्याला घेऊन तो उंच आकाशांत उडाला व थोड्याच वेळांत आफ्रिकेंत त्याच्या महालाशेजारीं उतरला. ती रात्रीची वेळ होती. परंतु एकच दृष्टिक्षेपांत त्यानं तो महाल ओळखला. आतां त्याची सर्व काळजी नाहींशी झाली. देवाच्या अस्तित्वाबद्दल त्याला विश्वास वाटूं लागला. आतां पुन्हां आपल्या पत्नीचं दर्शन होणार असा आत्मविश्वासही त्याला वाटूं लागला. निराशा झाली असतांना आंगठी दाखवून देवानं आशेचा किरण दाखविला हें पाहून त्याच्या मनांतले दुःखद विचार निघून गेले. त्याचं मन आनंदित झालं. गेले चार दिवस त्यानं काळजीमुळं व दुःखामुळं झोपे-शिवाय घालविले होते. त्यामुळं महालाजवळच्या एका झाडाखालीं त्यनं ताणून दिली व स्वस्थ चित्तानं सकाळ होईपर्यंत तो झोपला.

त्याला जाग आली ती पक्ष्यांच्या गोड किलबिलाटानं! त्यानं डोळे उघडले आणि उठून बसला. नंतर नदीवर जाऊन त्यानं हातपाय धुतले आणि प्रार्थना केली. प्रार्थना संपल्यावर तो पुन्हां महालाजवळ आला आणि राजकन्या बाद्र अल् बुदूरच्या खिडकीखालीं असलेल्या लतामंडपांत त्यानं आपलं आसन ठोकलं.

राजकन्या बाद्र अल् बुदूर पतीच्या आणि बापाच्या विरहामुळं व दुष्ट मग्रावी जादूगाराच्या कचाटचांत सांपडल्यामुळं दुःखानं काळोख असतांना उठत असे व खिडकींत बसून अश्रू ढाळीत असे. तिची नेहमींची दासी प्रार्थनेपूर्वीं तिचे कपडे बदलण्यासाठीं म्हणून नेहमीं तिच्या महालांत येत असे. दैवगतीनं तिनं महालांत येतांच त्या दिवशीं महालाची खिडकी

उघडली. खिडकी उघडी करून तिनं सहज खालीं पाहिलं तों तिला अल्लाउद्दीन खालीं बसलेला दिसला. त्याबरोबर ती तत्काळ राजकन्येला म्हणाली, " बाईसाहेब, बाईसाहेब, अल्लाउद्दीनसाहेब खालीं भिंतीजवळ बसलेले आहेत ! "

त्याबरोबर राजकन्या झटकन उठली आणि तिनं खिडकींतून खालीं पाहिलं. त्याच वेळीं अल्लाउद्दिनानं मान वर करून पाहिलं. दोघांच्या नजरा एकमेकांना भिडल्या. राजकन्या म्हणाली, " तो दुष्ट इथं नाहीं. तेव्हां गुप्त दरवाजानं तुम्ही चटकन वर या ! "

आणि तिनं दासीला खालीं जाऊन गुप्त दरवाजा उघडण्यास सांगितलं. दासीनं खालीं जाऊन गुप्त दरवाजा उघडला आणि अल्लाउद्दिनाला आंत घेतलं. तो लगेच वर आला आणि आपल्या पत्नीला भेटला. बऱ्याच दिवसांच्या विरहानंतर प्रथम भेट झाल्यामुळं त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू गळूं लागले. भावनांचा वेग कमी झाल्यावर तो तिला म्हणाला, " प्रथम तुला एक प्रश्न विचारायचा आहे. माझ्या महालांत मी एक जुना तांब्याचा दिवा ठेवीत असें त्याचं काय झालं ? "

" त्याच दिव्यामुळं आपण एवढ्या संकटांत पडलों ! " दुःखाचा एक सुस्कारा टाकून ती म्हणाली.

" तें कसं काय ? " त्यानं विचारलं.

तिनं पहिल्यापासून शेवटपर्यंत जी गोष्ट घडली ती सांगितली आणि जुना दिवा देऊन नवा कसा घेतला तें सांगून ती म्हणाली, " दुसरे दिवशीं आपण कांहीं एकमेकांना भेटलों नाहीं. आणि मी या भयंकर देशांत येऊन पडलें. ज्यानं मला ठकवून तो दिवा हस्तगत केला तो मूर जातीचा असून ह्याच देशाचा रहिवासी आहे. त्यानं मला सांगितलं, त्याच्या जादूमुळें व दिव्याच्या प्रभावामुळं त्यानं हा सारा चमत्कार घडवून आणला ! "

राजकन्येची हकीगत संपल्यावर त्यानं विचारलं, " तुझ्याशीं त्याचं वर्तन कसं काय आहे ? "

" दिवसांतून फक्त एकदांच तो मला भेटायला येतो. तुम्हांला कायमचं विसरण्यास मला तो सांगत आहे. सुलतानानं तुमचं डोकं मारलं असंहि त्यानं मला सांगितलं. तुम्ही कंगाल आईबापांच्या पोटीं जन्मलां आणि

त्याच्यामुळंच श्रीमंत बनलां आहांत असं बोलून तो तुमची भरपूर निंदा करतो. रडणं आणि विव्हळणं ह्यांशिवाय माझ्याकडून त्याला कांहींच ऐकायला मिळत नाहीं."

"त्यानं तो दिवा कुठं ठेवला आहे, तुला कांहीं माहिती आहे काय ?" त्यानं विचारलं.

"सदासर्वदा तो आपल्या जवळच दिवा ठेवतो. एक क्षणभरसुद्धां तो बाजूला ठेवीत नाहीं !" ती म्हणाली, "त्यानं जेव्हां मला त्याबद्दल सांगितलं तेव्हां त्यानं तो मला आपल्या आंगरख्यांतून काढून दाखविला होता !"

ही बातमी ऐकून अल्लाउद्दिनाला फार आनंद झाला. तो म्हणाला, "आतां मी जें काय सांगतों तें नीट कान देऊन ऐक. आतां मी तुझी रजा घेणार आहें. जेव्हां मी परत येईन तेव्हां कपडे बदलून येईन. तेव्हां माझ्यांत झालेला बदल पाहून आश्चर्य वाटून घेऊं नकोस. तुझ्या एका दासीला मागील गुप्त दरवाजापाशी उभी कर आणि जेव्हां जेव्हां मी येईन तेव्हां तेव्हां तिला झटकन दार उघडण्यास सांग. त्या दुष्ट मनुष्याला ठार करण्याचा मार्ग मी शोधून काढला आहे." असं म्हणून तो तत्क्षणींच तिथून निघाला.

रस्त्यावर आल्यावर त्याला एक खेडवळ शेतकरी दिसला. त्याला पहातांच अल्लाउद्दीन त्याच्याजवळ जाऊन त्याला म्हणाला, "भल्या गृहस्था, माझे हे उंची कपडे तूं घे आणि तुझे जुनेपुराणे कपडे मला दे !"

परंतु त्या शेतकऱ्यानं तसं करण्याचं नाकारतांच अल्लाउद्दिनानं जबरदस्तीनं त्याचे कपडे घेऊन आपल्या अंगावर चढविले व त्या मनुष्याला आपले मौल्यवान कपडे व अलंकार दिले. एवढं झाल्यावर मग तो मोठ्या रस्त्यानं जवळच्या शहरांत गेला. तेथील एका गंध्याकडून त्यानं अगदीं जहरी विष विकत घेतलं आणि त्याच वेषांत तो पुन्हां महालाकडे परतला.

तो आल्याबरोबर दासीनं मागील दरवाजा उघडला. तेथून तो सरळ बाद्र अल् बुदूरकडे गेला आणि म्हणाला, "आतां माझं म्हणणं नीट ऐक. तूं आपले मौल्यवान कपडे आणि अलंकार घाल. तुझ्या तोंडावर जी काळजीची छाया दिसते ती काढून टाक व चेहऱ्यावर प्रसन्नता दाखव. जेव्हां तो मग्राबी जादूगार तुला भेटायला येईल तेव्हां आनंदानं त्याचं स्वागत कर, आणि त्याला जेवायला बोलाव. त्याला पटवून दे कीं तूं आतां मला विसरली आहेस.

नंतर तांबड्या रंगाच्या दारूची तूं मागणी कर. त्याला चांगले तीन चार कप पिऊं दे. नंतर तो जरा निष्काळजी बनला कीं, मी आणलेल्या ह्या औषधांतील दोन तीन थेंब मिश्रण केलेली दारू त्याला दे. ती दारू पोटांत जातांक्षणींच तो मेल्यासारखा पडेल ! ''

त्याचं हें बोलणं ऐकल्याबरोबर राजकन्या कांहींशा आश्चर्यानं आणि कांहींशा भीतीनं म्हणाली, '' माझ्या हातून हें होईलसं मला वाटत नाहीं. तरी पण ज्यानं तुमची, माझी आणि माझ्या वडिलांची फारकत केली त्याला ठार करण्यासाठीं व त्याच्यापासून मुक्त होण्यासाठीं मी तें करीन. ''

नंतर अल्लाउद्दिनानं आपल्या बायकोसह भोजन केलं व तिथं जराही वेळ न घालवितां तो तेथून निघाला. तो गेल्यावर राजकन्येनं आपल्या कपडे करणाऱ्या दासीला बोलावून तिला आपले कपडे आणण्यास फर्माविलं. तिचं कपडे घालणं चालू असतांनाच तो दुष्ट जादूगार आला. तिला आनंदांत पाहून त्याला फार आनंद झाला. आणि जेव्हां तिनं सुहास्य मुद्रेनं त्याचं स्वागत केलं तेव्हां तर त्याचा आनंद गगनांत मावेना.

ती त्याला म्हणाली, '' आज तुम्ही माझ्याकडे जेवायला आलं पाहिजे. आजपर्यंत मी जेवढा शोक केला तेवढा पुरे आहे. आतां ह्यापुढं शोक करण्यांत कांहींच अर्थ नाहीं. कारण मी जरी हजार दोन हजार वर्षं शोक करीत बसलें तरी ते कांहीं कबरींतून माझ्याकडे येणं शक्य नाहीं. तेव्हां त्याच्या-बद्दल शोक करून काय फायदा ? आतां मला तरी तुमच्याशिवाय दुसऱ्या कुणाचा आधार आहे ? पण आज तुम्ही मला तुमची आफ्रिकेंतली दारू आणली पाहिजे. कारण ती दारू आमच्या चीन देशांतल्या दारूपेक्षां चांगली असते असं म्हणतात. ''

त्याचा आनंद हृदयांत मावेना. तिनं अल्लाउद्दिनाबद्दलच्या साऱ्या आशा सोडल्या असं वाटून तो अगदीं खूष होऊन गेला आणि म्हणाला, '' तुझं म्हणणं मला अक्षरशः मान्य आहे. तुझ्या आज्ञेप्रमाणं सारं कांहीं होईल. माझ्या घरीं आठ वर्षं पुरून ठेवलेली एक बरणीभर दारू आहे. आतांच्या आतां जाऊन मी ती दारू घेऊन येतों ! ''

असं म्हणून तो जादूगार निघून गेला आणि थोड्याच वेळांत दारू

घेऊन परत आला. " मी तुमचीच वाट पहात बसलें होतें." त्याला पहातांच ती म्हणाली, " तुम्ही माझ्यासाठीं फार श्रम घेतलेत ! "

" त्यांत श्रम कसले ? " तो खूष होऊन म्हणाला, " तुझी चाकरी करण्यांतच मी स्वतःला धन्य मानतों ! "

नंतर राजकन्येनं जेवणाचीं ताटं आणायला सांगितलं आणि ताटं येतांच तीं दोघं जेवायला बसलीं. नंतर राजकन्येनं दासीला दारूचे पेले आणायला सांगितलं. त्याबरोबर त्यानं मदिरापान करण्यास सुरुवात केली. राजकन्येनं त्याला बोलण्यांत गुंतवून त्याला भरपूर दारू पाजली. त्यानं डोकं भ्रमण करूं लागलं. सर्व जग त्याला तुच्छ वाटूं लागलं. त्याचं मन, शरीर सारं कांहीं धुंद झालं.

त्याला मदिरा खूप चढली आहे असं पाहिल्यावर राजकन्येनं दासीला खूण केली. त्याबरोबर वीष मिसळलेली दारू तिनं पुढं आणून ठेवली.

तिनं अगोदरच आपल्या सर्व दासींना व नोकरांना काय करायचं तें सांगून ठेवलं होतं आणि तेहि सर्व एकदिलानं त्याचा वध करण्याच्या कटांत सामील झाले होते.

दासीनं राजकन्येच्या हातांत पेला दिला. राजकन्येनं तो घेतला आणि त्याला दिला.

एका घोटांत त्यानं तो पेला रिकामा केला. त्यांत विषारी पदार्थ आहे असा पुसटहि संशय त्याला आला नाहीं. परंतु ती दारू पोटांत जातांच तो एकदम खालीं कोसळला. त्याच्या हातांतून पेला गळून पडला आणि तो मरणाच्या पंथाला लागला.

तें पहातांच राजकन्येची दासी महालाचा दरवाजा उघडून अल्लाउद्दिनाला आंत घेण्यासाठीं खालीं धावली. अल्लाउद्दीन शेतकऱ्याच्या वेषांत आला होता. दरवाजा उघडतांच तो सरळ आपल्या बायकोच्या दालनांत गेला. राजकन्या बाद्र टेबलाशीं बसलेली होती आणि तिच्यासमोर मग्राबी जादूगार मरून पडलेला होता.

अल्लाउद्दिनानं तिच्याजवळ जाऊन केलेल्या कामगिरीबद्दल तिला शाबासकी दिली. नंतर तो तिला म्हणाला, " तूं आतां आपल्या दासींसह दुसऱ्या दालनांत जा. म्हणजे पुढं काय करायचं हें मी शांतपणानं ठरवितों. "

त्याबरोबर जरासुद्धां वेळ न दवडितां राजकन्या आपल्या दासींसह बाहेर गेली. नंतर अल्लाउद्दिनानं उठून खोलीचा दरवजा आंतून घट्ट लावून तला व त्या जादूगाराजवळ जाऊन त्यानं त्याच्या आंतल्या खिशांतून दिवा ाढून घेतला. नंतर आपली कटचार बाहेर काढून त्यानं त्याला ठार केलं. एवढं झाल्यावर त्यानं तो जादूचा दिवा घासला. त्याबरोबर राक्षस त्याच्या समोर प्रगट होऊन म्हणाला, " तुला काय पाहिजे तें सांग ! "

" माझी इच्छा आहे कीं तूं हा महाल येथून उचलून चीन देशांत ाऊन पूर्वीं ोता त्या जागीं ठेवावास ! " अल्लाउद्दीन म्हणाला.

" आपली आज्ञा मान्य ! " राक्षस म्हणाला.

नंतर अल्लाउद्दीन उठून आपल्या पत्नीजवळ जाऊन बसला आणि यांनीं गप्पागोष्टींत वेळ घालविला. इतक्या वेळांत राक्षसानं तो महाल ांगितलेल्या जागीं नेऊन ठेवला. नंतर अल्लाउद्दिनानं आणि राजकन्येनं ोजन उरकलं आणि तीं दोघंहि निद्रादेवीच्या आधीन झालीं.

दुसरे दिवशीं सकाळींच अल्लाउद्दीन उठला. दासींनीं राजकन्येला ल्यवान कापड्यांनीं आणि अलंकारांनीं भूषविली. अल्लाउद्दिनानंही मौल्य- न कपडे परिधान केले. दोघांच्याहि हृदयांतून आनंद ओसंडून जात होता. ाजकन्या तर अधिकच आनंदित दिसत होती. कारण बऱ्याच दिवसांच्या ारहानंतर ती पुन्हां आपल्या बापाला भेटणार होती.

ही झाली अल्लाउद्दीन आणि राजकन्या बाद्र अल् बुदूर ह्यांची गोष्ट. ातां सुलतानाकडे वळूं.

सुलतानानं रागानं आपल्या जावयाला हांकलून लावलं खरं ! परंतु ्या मुलीच्या विहराचं दुःख तो एक दिवसहि विसरूं शकला नाहीं. ती एकुलती एक मुलगी होती. तिच्यावर त्याचं जिवापाड प्रेम होतं. ृदयाशीं धरायला मुलीशिवाय त्याला दुसरं कुणीच मायेचं नव्हतं. रोज बायकांसारखा रडत असे. रोज सकाळीं जागा झाला कीं खिडकींत जाऊन अल्लाउद्दिनाचा महाल दिसतो कीं काय तें आणि तो दिसला नाहीं कीं दुःखानं टिपें गाळीत असे. रडून ोळे सुजत असत.

नेहमींच्या संवयीप्रमाणं एक दिवस सकाळीं उठतांच तो खिडकीजवळ गेला आणि पहातो तों काय ! समोर महाल दिसत होता. त्याचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना ! त्यानं आपले डोळे चोळले आणि पुन्हां पाहिलं. त्याची खात्री पटली कीं महाल आपल्या जावयाचा आहे. त्याचं हृदय एकदम आनंदानं भरून आलं. त्यानं तत्काळ आपला घोडा मागविला आणि खोगीर टाकतांच तो त्यावर बसून महालाकडे जायला निघाला.

आपला सासरा येत आहे हें पहातांच अल्लाउद्दिनानं अर्ध्या वाटेवर जाऊन त्याचं स्वागत केलं. त्याच्या हाताला धरून त्याला त्याच्या मुलीच्या दालनांत आणलं. राजकन्या आपल्या बापाला भेटण्यास इतकी उत्सुक झाली होती कीं, त्याला भेटण्यासाठीं ती खालीं आली. बापाला पहातांच एकदम पुढं होऊन तिनं त्याला कडकडून मिठी मारली. तिच्या डोळ्यांतून आनंदाश्रू गळूं लागले. सुलतानानं प्रेमानं तिला पोटाशीं धरलं. त्याच्या डोळ्यांतूनहि आनंदाश्रू गळूं लागले. भावनांचा वेग कमी झाल्यावर मग अल्लाउद्दिनानं त्यांना वरच्या महालांत नेलं.

तिथं आरामांत बसल्यावर सुलतानानं आपल्या कन्येला एकंदर सविस्तर हकिकत विचारली. तिनं त्याला सविस्तर हकिगत सांगितली आणि ती शेवटीं म्हणाली, "आणि जेव्हां काल मी त्यांना पाहिलं तेव्हां माझ्या जिवांत जीव आला. त्यांनींच मला मग्रावी जादूगाराच्या कचाट्यांतून सोडवून आणलं. त्या जादूगाराइतका दुष्ट प्राणी ह्या जगांत दुसरा कोणी असेल असं मला वाटत नाहीं हे नसते तर मी त्याच्या कचाट्यांतून सुट[illegible] नसतें आणि तुम्हांलाहि कधीं पुन्हां भेटलें नसतें." असं म्हणून तिनं त्य[illegible] जादूगाराला दारूतून वीप पाजून त्याला ठार करीपर्यंतची सारी हकीक[illegible]त सांगितली.

अल्लाउद्दिनानंहि आपण त्या जादूगाराचा कसा खून केला [illegible] त्याच्यापासून तो जादूचा दिवा पुन्हां कसा मिळविला हें सांगि[illegible]लं. तो म्हणाला, "तुम्हांला जर अजूनहि शंका वाटत असेल तर म[illegible]ला [illegible]बरोबर चला आणि त्या दुष्ट जादूगाराचं प्रेत पाहून स्वतःची खात्री [illegible]रासींसह [illegible]रों." असे [illegible]लं.

सुलतानानं अल्लाउद्दिनाबरोबर जाऊन जादूगाराचं प्रे[illegible]

28300

आणि सेवकांना बोलावून त्याचं प्रेत दूर नेऊन जाळून त्याची राख वाऱ्यावर फेंकून देण्याचा हुकूम सोडला.

नंतर त्यानं अल्लाउद्दिनाला प्रेमानं पोटाशीं धरलं, तो गहिंवरून म्हणाला, " बेटा, मला क्षमा कर ! त्या दुष्ट जादूगाराच्या कारवाईमुळं मी नाहक तुझा जीव घेणार होतों. माझ्या मुलीच्या प्रेमामुळं मी तसं करायला तयार झालों. आईबापांचीं हृदयं मुलांसाठीं कशीं तळमळत असतात आणि विशेषेंकरून ज्यांना एकच मुलगी आहे अशा माझ्यासारख्याची कल्पना तुला येणार नाहीं. म्हणून म्हणतों कीं, तूं मला माझ्या निष्ठुरपणाबद्दल क्षमा कर ! "

" आपण कांहीं सत्याच्या विरुद्ध वर्तन केलेलं नाहीं ! " अल्लाउद्दीन म्हणाला, " आणि मीही आपल्याशीं पापानें वागलों नाहीं. हें सारं संकट आलं तें त्या मग्राबी जादूगारामुळं ! तेव्हां उगीच तुम्ही ती गोष्ट आपल्या मनाला लावून घेऊं नका. सारं कांहीं विसरून जा. "

त्यानंतर सुलतानानं शहरभर रोषणाई करण्यास फर्माविलं. तत्काळ सेवकांनीं दवंडी पिटविली, ' आज राजकन्या बाद्र अल् बुदूर आणि तिचा पति अल्लाउद्दीन पुन्हां आपल्या घरीं सुखरूप परत आलीं आहेत. तेव्हां आनंदाप्रीत्यर्थ सर्व प्रजाजनांनीं आजपासून तीस दिवसपर्यंत रोषणाई करून मोठ्या आनंदांत दिवस साजरे करावे ! '

अशा तऱ्हेनं पुन्हां सर्वत्र आनंदीआनंद झाला. त्या दुष्ट जादूगाराचा नाश झाला. तरी पण अल्लाउद्दीन पुरा संकटमुक्त झाला नव्हता. त्या दुष्ट जादूगाराला एक धाकटा भाऊ होता. शिवाय भावापेक्षांहि त्याला जादूचं, आकडेशास्त्राचं आणि खगोलाचं जास्त ज्ञान होतं. तो आफ्रिकेच्या दुसऱ्या भागांत रहात असे.

एकदां त्या धाकट्या भावाला आपला मोठा भाऊ काय करतो हें पहाण्याची इच्छा झाली. त्याबरोबर त्यानं आपली धुळपाटी काढली आणि त्यावर चौकट काढून त्यानं आंकडे मांडले. खूप विचार केल्यावर त्याला कळून आलं कीं, आपला भाऊ मृत्यु पावला आहे. त्याला फार दुःख झालं. परंतु तो कसा मेला हें न समजल्यामुळं त्याच्या मनाचं समाधान झालं नाहीं. तेव्हां त्यानं पुन्हां गणित मांडलं व तो कसा आणि कुठं मेला हें पाहूं लागला.

पूर्णपणं विचार केल्यावर त्याला कळलं कीं, चीन देशांतल्या अल्लाउद्दिनावाच्या एका तरुणानं आपल्या भावाचा खून केला आहे.

हें समजतांच त्याला भयंकर राग आला. सूडाच्या भावनेनं त्या मन भरून गेलं. त्यानं लगेच प्रवासाची तयारी केली आणि कित्येक दिव प्रवास करून तो चीनच्या राजधानींत आला. एका खानावळींत त्यानं ए खोली भाड्यानं घेऊन त्यांत आपला मुक्काम ठोकला. जरा वेळ विश्रांत घेतल्यावर तो खोलीच्या बाहेर पडून हमरस्त्यावरून भटकूं लागला. अल्ला उद्दिनाचा नाश करण्यासाठीं कांहीं मार्ग सांपडतो कीं काय हें त्याला पहायच होतं. फिरून फिरून दमल्यावर तो एका कॉफिगृहांत आला. तें कॉफिगृ भरवस्तींतल्या एका प्रशस्त इमारतींत होतं आणि तिथं नेहमीं वरेच लोक जुगार, पत्ते, वगैरे खेळ खेळण्यासाठीं येत असत. त्या ठिकाणीं जाऊन तो बसला आणि त्या लोकांचं काय बोलणं चाललं आहे हें लक्ष देऊन ऐकूं लागला ते फतिमा नांवाच्या एक वृद्ध, सद्वर्तनी वाईबद्दल बोलत होते. ती बाई शहराबाहेरच्या आपल्या मठींत भक्ती करीत कालक्रमणा करीत असे. महिन्यांतून ती फक्त दोनदांच शहरांत जाई. तिनं वरेच चमत्कार करून दाखविले होते.

जेव्हां ही माहिती त्या जादूगाराला मिळाली तेव्हां त्याला एकदम आनंद झाला. तो स्वतःशींच म्हणाला, ' मला जें पाहिजे होतं तें मिळालं. दैवानं मदत केली तर या थेरडीकरवींच मी माझं उद्दिष्ट साधीन. '

आणि नंतर जे लोक तिच्याबद्दल बोलत होते त्यांच्याजवळ तो गेला. त्यांपैकीं एकाला तो म्हणाला, " काका, तुम्ही एका फतिमा नांवाच्या संतिणीविषयीं बोलत होतांत. तेव्हां ती कोण व कुठं रहाते तें मला कृपा करून सांगाल काय ? "

" आतां काय म्हणावं ! " तो इसम आश्चर्यानं म्हणाला, " अरे, तूं ह्या शहरांत रहातोस आणि तुला फतिमाबद्दल माहिती नाहीं हें कसं ? ज्या अर्थीं अजूनपर्यंत तुझ्या कानावर त्या संतीणीच्या साधुत्वाबद्दल व दयेबद्दल कांहीं गेलं नाहीं त्या अर्थीं तूं ह्या शहरांत अगदीं नवखा असला पाहिजेस ! "

" होय, खरं आहे ! " तो जादूगार म्हणाला, " मी काल रात्रींच ह्या शहरांत आलों. माझ्यावर फारच संकटं कोसळलेलीं आहेत. तिच्या आशीर्वादानं संकटमुक्त व्हावं असं म्हणतों मी ! "

हें ऐकून त्या इसमानं तिच्या चमत्कारांबद्दल आणि दानधर्माबद्दल त्याला सविस्तर माहिती सांगितली; आणि त्याला शहराबाहेरील टेकडीवर असलेल्या मठीचा मार्ग दाखविला. जादूगारानं त्याच्या ह्या सौजन्याबद्दल त्याचे आभार मानले आणि तो आपल्या खाणावळींतल्या खोलींत आला.

दैवगतीनं फातीमा दुसऱ्याच दिवशीं शहरांत फेरी मारायला आली. जादूगारानं जेव्हां सकाळींच आपली खोली सोडली तेव्हां लोकांच्या झुंडीच्या झुंडी त्याला रस्त्यानं जात असलेल्या दिसल्या. तोहि गर्दींत घुसला आणि काय आहे तें पाहूं लागला. लोकांच्या गर्दीमध्यें उभी असलेली ती संतीण त्याला दिसली. अपंग, दुःखीकष्टी, पीडलेले, गांजलेले लोक तिची करुणा भाकत होते व आशीर्वाद मागत होते. ती ज्यांना ज्यांना हात लावी ते ते संपूर्ण बरे होत होते. हें पाहून तो जादूगार अगदीं चकित होऊन गेला आणि तिच्यामागें जाऊन तिच्या मठीपर्यंत गेला.

फातिमा मठींत जाऊन एका चटईवर आराम करण्यासाठीं म्हणून झोपली. इतक्यांत तो जादूगार आंत आला आणि आपल्या कमरेचा जंबिया काढून तिला दरडावीत तो म्हणाला, " म्हातारडे ऐक ! तूं जर मोठ्यानं ओरडलीस तर तुला मी ठार केल्याशिवाय रहाणार नाहीं. तेव्हां मुकाट्यानं ऊठ आणि मी सांगतों तसं कर ! "

तिनं त्याच्या म्हणण्याप्रमाणं वागायची शपथ घेतल्यावर त्यानं जंबिया बाजूला ठेवला. ती उठून उभी राहिल्यावर तो तिला म्हणाला, " माझा वेष तूं घे व तुझा मला दे. "

त्याच्या म्हणण्याप्रमाणं तिनं आपला सारा पोशाख त्याला दिला. तेव्हां तो म्हणाला, " आतां तूं कशानंतरी माझं तोंड रंगव म्हणजे माझा रंग तुझ्यासारखा होईल ! "

तेव्हां ती आपल्या गुहेंत गेली व काजळाचं भांडं आणून तिनं त्याच्या तोंडाला काजळ फांसून त्याचा रंग आपल्यासारखा काळा केला. नंतर त्याला आपली काठी दिली. चालायचं कसं ते त्याला दाखवलं. शहरांत प्रवेश करतांना

काय काय करायचं ह्याच्या सूचना त्याला दिल्या. आपल्या गळ्यांतली त्याच्या गळ्यांत घातली व शेवटीं त्याच्या हातांत आरसा देऊन ती म्हण "पहा, तुझ्यांत आणि माझ्यांत आतां जरासुद्धां फरक नाहीं!"

त्यानं आरशांत पाहिलं तेव्हां त्याला कळून चुकलं कीं आपण अ हुबेहुब तिचीच प्रतिमा बनलों आहोंत. इतकं झाल्यावर त्यानं तिच्याक एक दोरखंडाचा तुकडा मागून घेतला आणि त्या दोरखंडाचा फांस ति गळ्याभोंवतीं टाकून तिचा जीव घेतला. नंतर तिचं प्रेत फरफटत ओ नेऊन एका खड्ड्यांत फेकून दिलं व तो तिच्या मठींत जाऊन झोंपला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो उठला आणि अल्लाउद्दिनाच्या महाला भिंतीशेजारीं उभा राहिला. हें पाहून लोक भराभर त्याच्याभोंवतीं जम त्यांना वाटलं, ही खरी फातिमाच आहे. ते तिचा आशीर्वाद मागूं लाग तेव्हां त्यानं आदल्या दिवशीं ती जशी वागत होती त्याप्रमाणं वागाय सुरवात केली.

खालीं चाललेला गोंगाट राजकुमारी बाद्र अल् बुदूरच्या कानीं गेल तेव्हां ती आपल्या नोकराला म्हणाली, "खालीं कसला गोंधळ चालला अ तें जरा पाहून ये पाहूं!"

तें ऐकून आगा खालीं गेला व पुन्हां वर येऊन म्हणाला, "बाईसाहे खालीं फातिमाबाई आली आहे. आपली आज्ञा असेल तर मागून मी तिल वर घेऊन येतों. आपणांला जर कांहीं मागायचं असेल तर मागून घे येईल."

"जा, तिला घेऊन ये." राजकुमारी म्हणाली. "तिच्या चमत्कारां बद्दल आणि गुणांबद्दल मी बरंच ऐकलं आहे. तिला पहायची मला इच्छ आहे. मला तिचा आशीर्वाद घ्यायचा आहे!"

राजकुमारीच्या हुकुमाप्रमाणं आगानं खालीं जाऊन फातिमाच्या वेषां तल्या त्या जादूगाराला वर आणलं. राजकुमारी आशीर्वादासाठीं पुढं उभी रहातांच त्यानं आशीर्वादाची मालिकाच लावली. कुणालाच त्याचा संशय आला नाहीं.

राजकुमारीनं त्याला नमस्कार केला. त्याला आपल्या शेजारीं बसवून घेऊन ती म्हणाली, "बाई फातिमे, माझी इच्छा आहे कीं तूं माझ्या इथं

ह्या महालांत रहावंस, म्हणजे मलाहि तुझ्यामुळं पुण्य संपादन करतां येईल. तुझ्या उपदेशाप्रमाणं वागून मला माझा उद्धार करून घेतां येईल !"

त्या दुष्ट जादूगाराचा हाच कावा होता. परंतु आपलं जाळं कितपत पक्कं आहे हें अजमावण्याच्या उद्देशानं तो म्हणाला, "बाई, मी वैराण भागांत रहाणारी एक गरीब बाई ! माझ्यासारखीनं ह्या राजमहालांत रहाणं योग्य नाहीं."

"पण त्यावद्दल तूं काळजी करूं नको !" राजकुमारी म्हणाली. "माझ्या महालांतील एक भागच मी तुला वेगळा देईन. म्हणजे तुला तुझ्या मनाप्रमाणं वागतां येईल. तुला तुझी प्रार्थना करतां येईल. तुला कुणीही त्रास देणार नाहीं. शिवाय इथं राहून तुला देवांची भक्तीहि करतां येईल !"

जरा विचार केल्यासारखं करून तो म्हणाला, "आपली आज्ञा मला मान्य आहे. तुमच्या शब्दाबाहेर मी नाहीं. परंतु माझी एक अट आहे !"

"कोणती ?" राजकुमारीनं विचारलं.

"माझं बसणं, उठणं, खाणं, पिणं सर्व कांहीं मला दिलेल्या खोलींतच व्हावं. आंत कुणीहि येऊं जाऊं नये. मला चमचमीत आणि स्वादिष्ट पदार्थ आवडत नाहींत. तेव्हां दासीनं फक्त भाकरी आणि पाणीच घेऊन यावं. जेव्हां मला भूक लागेल तेव्हां मी भाकरी खात जाईन !"

त्या दुष्ट जादूगारचा हेतू हा होता कीं, जेवणाच्या वेळीं तोंडावरचा पडदा उघडायला नको. कारण जर का त्याची दाढी आणि मिशा दिसून आल्या असत्या तर त्याचा साराच बेत फसला असता.

"बाई फातिमे," राजकुमारी म्हणाली, "माझ्यावर पूर्ण विश्वास ठेव. तुझ्या इच्छेविरुद्ध कांहींहि घडणार नाहीं. चल, तुला तुझी खोली दाखवितें."

असं म्हणून बाद्र अल् बुदूर उठली. संतिणीच्या वेशांतील त्या जादूगाराला घेऊन तिनं खोली दाखविली व ती म्हणाली, "बाई फातिमे, ही खोली तुझ्या नावानं वेगळी ठेवण्यांत येईल. तुला कसलाहि त्रास होणार नाहीं. तुला एकांतांत व शांततेनं राहतां येईल !"

जादूगारानं तिला तोंडभर आशीर्वाद दिला. नंतर राजकन्येनं त्याला

सारा महाल दाखविला. ज्याला चोवीस रत्नजडित खिडक्या होत्या तो महाल " दाखवून तिनं विचारलं, फातिमे, तुला ह्या महालाबद्दल काय वाटतं ?"

" बेटी," तो जादूगार म्हणाला, " हें कलाकौशल्य फार सुंदर आहे. याच्यासारखं दुसरं सांपडणं शक्य नाहीं. परंतु ह्यांत एका गोष्टीची उणीव आहे. ती गोष्ट आली कीं, हा महाल सौंदर्यानं परिपूर्ण होईल.

" कोणत्या गोष्टीची उणीव आहे ती सांग मला !" राजकन्या म्हणाली " मला हा महाल परिपूर्ण बनवायचा आहे !"

" राजकन्ये," जादूगार म्हणाला, " येथें जर कशाची उणीव असेल तर ती रूख पक्ष्याच्या अंड्याची ! तें या छताला टांगून ठेवायला पाहिजे. मग हा महाल सर्व जगांत अप्रतिम ठरेल !"

" पण हा पक्षी कोणता आणि त्याचं अंडं कुठं मिळणार ?"

" रूख हा अत्यंत मोठा पक्षी आहे. " जादूगार म्हणाला, " इतका मोठा आहे कीं, आपल्या पंजांत उंट, हत्तीसारखे प्राणी घेऊन तो आकाशांत भरारी मारूं शकतो. हा पक्षी विशेषेंकरून काफ नावाच्या पर्वतावर असतो. ज्या कारागिरानं हा प्रासाद बांधला तो असं एक अंडं खास आणून देईल !"

दुपारची जेवणाची वेळ झाल्यामुळं त्यांनीं बोलणं बंद केलं. राजकन्येनं त्या जादूगाराला आपल्याबरोबर जेवायला येण्याचा आग्रह केला. परंतु त्यानं आमंत्रण स्वीकारलं नाहीं. इततकंच नव्हे तर तो त्या ठिकाणीं न थांबतां आपल्याला दिलेल्या खोलींत निघून गेला. तेथेंच त्याचं जेवण पाठवून देण्यांत आलं.

सायंकाळ झाल्यावर अल्लाउद्दीन शिकारीहून परत आला. बायकोला भेटल्यावर त्यानं तिची चौकशी केली. परंतु त्याला तिचा चेहरा किंचित् दुःखी दिसला. ती नेहमींप्रमाणं त्याच्याकडे पाहून हंसलीहि नाहीं. तें पाहून त्यानं आश्चर्यानं विचारलं, " आज तूं अशी दुःखी कां ? तुला दुःख होण्याजोगं काय घडलं ?"

" तसं कांहीं नाहीं." ती म्हणाली, " मला आपलं वाटत होतं कीं, आपल्या महालांत कसलंच वैगुण्य नाहीं, पण त्यांत रूख पक्ष्याचं अंडं नाहीं. जर तें छताला टांगून ठेवलं तर त्याच्याइतका सुंदर महाल मगांत सांपडणार नाहीं !"

" ह्या क्षुल्लक गोष्टीसाठीं तूं इतकी झुरतेस ?" अल्लाउद्दीन म्हणाला. " तुला जी गोष्ट पाहिजे ती सांग. पृथ्वीच्या पोटांत असली तरी एका क्षणांत तुला मी ती आणून देईन !"

असं म्हणून अल्लाउद्दीन आपल्या महालांत गेला व त्यानं जादूचा दिवा घासला. तत्काळ त्या ठिकाणीं दिव्याचा राक्षस प्रगट होऊन म्हणाला, " काय आज्ञा आहे ?"

" माझी अशी इच्छा आहे कीं, तूं रूख पक्ष्याचं अंडं आणून तें महालाच्या छताला टांगून ठेवावंस."

हे शब्द ऐकतांच राक्षसाचा चेहरा लालेलाल झाला व तो अति भयंकर आवाजांत म्हणाला, " अरे कृतघ्ना ! तुझ्या सेवेला मी आणि दिव्याचे सर्व सेवक असतांना तूं आमच्या राणीला महालाच्या छताला टांगून ठेवायला सांगतो आहेस ? आणि तें केवळ तुझ्या वायकोच्या लहरीसाठीं ? तुझी व तुझ्या वायकोची क्षणांत राखरांगोळी करून वाऱ्यावर उडवून दिली असती. पण खरं म्हणजे तुम्ही दोघंहि निर्दोष आहांत. कारण तुम्हांला यांतला गुपित अर्थ माहीत नाहीं. गुन्हा त्या मग्राबी जादूगाराच्या धाकट्या भावाचा आहे. तो तुमच्या महालांत फातिमाबाईचा खून करून तिचा वेष घेऊन राहिला आहे. तुझा नाश करण्यासाठीं त्यानं तुझ्या बायकोला ही गोष्ट पटवून ठेवली आहे." असं म्हणून तो राक्षस क्षणांत नाहींसा झाला.

त्याचं बोलणं ऐकतांच अल्लाउद्दिनाचं देहभान हरपलं. त्याचं सारं अंग लटपटूं लागलं. परंतु लगेच भानावर येऊन तो आपल्या बायकोच्या महालांत गेला. त्यानं डोकं दुखण्याचं ढोंग केलं. आपलं डोकं दोन्ही हातांनीं

त्यानं सोंग केलं. बाद्र अल् बुदूरनं काय

झा. ९ ६ म्हणाला, " मला कांहीं कळंत नाहीं. काय झालंय तें. परंतु माझं डोकं मात्र भयंकर दुखत आहे !"

तें ऐकतांच तिनं फातिमेला आणायला दासीला सांगितलं. त्याबरोबर त्यानं विचारलं, " फातिमा कोण ?"

" ती एक संतीण आहे. माझ्या महालांत रहायला मी तिला जागा दिली आहे." राजकन्या म्हणाली.

इतक्यांत फातिमेच्या वेशांत जादूगार आंत आला. मनांतलं क एक न दाखवितां अल्लाउद्दिनानं त्याला सलाम केला आणि त्याच्या हात चुंबन घेऊन त्याचा सन्मान केलासं दाखवीत तो म्हणाला, "फातिमाबा आशीर्वाद देऊन मला ह्या जबरदस्त डोकंदुखींतून मुक्त करा. आ लोकांना दुःखांतून मुक्त करतां अशी आपली ख्याती आहे!"

जादूगाराला आपण स्वप्नांत आहोंत कीं जागे आहोंत हेंच समजे त्याला नेमकी हीच गोष्ट पाहिजे होती. तो अल्लाउद्दिनाच्या जवळ गे आणि त्यानं त्याच्या डोक्यावर एक हात ठेवला आणि दुसरा हात बुरख्य घालून अल्लाउद्दिनाला ठार करण्याच्या उद्देशानं जंबियाला हात घातला.

तो जंबिया कधीं बाहेर काढतो हें अल्लाउद्दीन पहातच होता. जे त्यानं जंबिया पूर्ण बाहेर काढला तेव्हां अल्लाउद्दिनानं झटकन त्याच हातांतून तो हिसकाहून घेतला आणि तो त्याच्याच हृदयांत खूप जोरा खुपसला.

"अहो, हें काय केलंत!" राजकन्या मोठ्यानं किंकाळली आ म्हणाली, "ह्या सद्वर्तनी बाईनं तुमचं असं काय केलं होतं? तिच्या रक्तां आपले हात बुडवून डोक्यावर हें पाप कशाला ओढवून घेतलंत? संकटां सांपडलेल्यांना ती संकटमुक्त करीत असे. तुम्हांला देवाचीसुद्धां भीति वाट नाहीं का?"

"पण मी फातिमेला मारलं नाहीं. मीं तिच्या खुनीला मारलं आहे. अल्लाउद्दीन म्हणाला, "ज्यानं तुला जादूच्या सहाय्यानं पळवून नेलं माझा महाल आफ्रिकेंत नेला त्या दुष्ट मग्रावी जादूगाराचा हा धाकटा भा आहे. आपल्या ह्या शहरांत येऊन त्यानं फातिमेला ठार मारलं, त्याच्य भावाला मी मारलं म्हणून माझा सूड घेण्यासाठीं तिच्या वेषानं तो इ आला. त्यानंच तुला रूख पक्ष्याचं अंडं आणायला सांगितलं. कारण त्यां माझं मरणच ओढवलं असतं. अजूनहि तुला संशय येत असेल तर मी ज्याल मारलं आहे त्याच्या चेहऱ्याकडे पहा!"

असं म्हणून त्यानं तिच्या चेहऱ्यावरचा बुरखा काढून टाकला. पुरुष सारखी ढी आणि मिशा असलेला तो चेहरा पहातांच तिला फारच आश्च

वाटलं. ती ओशाळून म्हणाली, " खरंच मी तुम्हाला दोन्ही वेळेला प्राण-संकटांत टाकलं ! "

" पण तुझ्या मनांत तसं नसल्यामुळें मी दोन्ही वेळेला वांचलों, " अल्लाउद्दीन म्हणाला, " तूं मला जें जें देशील त्याचा स्वीकार करायला मी नेहमींच तयार आहें. "

त्याचं बोलणं ऐकून राजकन्येचं शरीर आनंदानं फुलून गेलं. तीं म्हणाली, " खरंच मला यांतील कांहीं माहिती नाहीं. तुमचा माझ्यावरचा विश्वास पाहून मी स्वत:ला धन्य समजतें. "

सुलतान आला तेव्हां दोघांनीं त्याला झालेली हकीगत सांगितली व त्या मग्रावी जादूगाराचं प्रेत दाखविलं. सुलतानानं आपल्या सेवकांना बोलावून त्या जादूगाराचं प्रेत नेऊन जाळण्यास सांगितलं व राख वाऱ्यावर उधळून टाकण्याचा हुकूम केला.

आतां अल्लाउद्दिनाला कांहीं संकटं न राहिल्यामुळं तो आणि बाद्र अल् बुदूर मोठ्या सुखांत कालक्रमणा करूं लागलीं. सुलतानाच्या पश्चात् तो त्याचा जांवई म्हणून गादीवर बसला. त्यानं सर्व लोकांना चांगला न्याय दिला. त्यामुळं सारी प्रजा त्याच्यावर प्रेम करूं लागली. अशा तऱ्हेनं राहिलेले दिवस यमराजाचं आमंत्रण येईपर्यंत अल्लाउद्दिनानं आपल्या बायकोसह मोठ्या सुखांत घालविले.

गोष्ट संपल्यावर शहराझाद म्हणाली, " अशी ही अल्लाउद्दिनाची गोष्ट अहे. अशीच दुसरी एक गोष्ट सांगितली जाते. "

८९४३
२८३००
२८३८

# अरेबियन नाईट्स्

## सोज्वळ निवडक कथा

: अनुवाद :

सौ. आशा जोशी

—— सुमारें अडीचशें वर्षांपूर्वी अरेबियन नाइट्स् प्रथम उजेडांत आलं आणि सर्व जगाला त्याची ओळख झाली. या गोष्टी वाचून सबंध जग दिपून गेलं. अरबस्थानांत या गोष्टी सांगणारांना रावी म्हणतात. ते एका वसाहतींतून दुसऱ्या वसाहतींत जात असत आणि तेथील लोकांना या गोष्टी सांगत असत. अशा या अशक्यांतल्या अशक्य आणि आयुष्यांत कधींहि घडण्याचा संभव नसलेल्या अद्भुत आणि अति मनोहर गोष्टी अरब लोक तन्मयतेनं ऐकत असत. लहानथोर, स्त्री, पुरुष सर्व पुतळ्यासारखें स्तब्ध उभे राहून ऐकत आणि एखाद दिवस असे प्रसंग आपल्याहि आयुष्यांत घडतील अशी एक गोड भावना त्यांच्या मनांत तरंगत जाई. आणि आतां आपणहि त्या वाचतो तेव्हां एखाद वेळेस आपल्याहि आयुष्यांत या गोष्टींतील प्रसंग साकार होतील, अशा एका विचित्र आणि सुखद संवेदनेंत आपलें मन रंगून जातं. आणि तशा प्रकारें मन रंगून जाण्यांत एक प्रकारचा अवर्णनीय आनंद आपल्याला मिळत असतो. म्हणूनच या गोष्टी पूर्वी मराठींत झाल्या असल्या तरी आम्ही पुन्हां एकदां अनुवाद करून त्या जनतेला सादर करीत आहोत.——

**किंमत फक्त पांच रुपये**

**उत्कृष्ट छपाई** पृष्ठें ४३२ **अनेकरंगी मुखपृष्ठ**

**आपल्या नेहमींच्या पुस्तक विक्रेत्याकडे**

**अगर**

## मराठी साहित्य प्रकाशन

**१००५ सदाशिव पेठ, पुणें २.**

# इसापनीति

## मुळाबरहुकूम मार्मिक भाषांतर

—: अनुवादक :—

**रघुवीर सामंत** बी. ए. बी. टी.

— वाचकांना मूळ ग्रीकमधील कथांची कल्पना यावी या करितांच हें भाषांतर हेतुपूर्वक मुळाबरहुकूम करण्याचा प्रयत्न केला आहे. जगांतल्या बहुतेक सुधारलेल्या भाषांत इसापच्या कथांचीं भाषांतरें झालीं आहेतच. इसापच्या या कथा जरी मुळांत ग्रीक भाषेंत तयार झाल्या असल्या तरी त्यांची व्याप्ति ग्रीसपुरती मर्यादित न राहतां त्या आज सर्व मानवजातीला मार्गदर्शक ठरल्या आहेत.

इसापनीति म्हणजे नीतीच्या कथा. जगांत चांगल्या प्रकारें कसें जगतां येईल याबद्दलचा उपदेश ! रोजच्या व्यवहारांत लागणाऱ्या गोष्टी यांत सांगितलेल्या आहेत. सर्व कथा अत्यंत मार्मिक आणि सुटसुटीत आहेत. गोष्टींत फापटपसारा अत्यंत कमी. गोष्टींत जें तात्पर्य सांगायचें असेल तेथपर्यंत गोष्ट आली, कीं ती तेथेंच थांबते. अशा या जगद्विख्यात कथांचें भाषांतर श्री. रघुवीर सामंत यांनीं कौशल्यानें पार पाडलें आहे.—

**किंमत फक्त तीन रुपये**

पृष्ठें २६४ | **दुसरी आवृत्ती** | भरपूर चित्रें

**आपल्या नेहमीच्या पुस्तक विक्रेत्याकडे**

**अगर**

**मराठी साहित्य प्रकाशन, पुणें २.**

IRBK-010S143

# संपूर्ण चातुर्मास

## सर्व कुटुंबाचा धार्मिक मार्गदर्शक

—: संपादक :—

**काशिनाथ अनंत जोशी**

* शनिमहात्म्य, व्यंकटेशस्तोस्त्र, अकरावा अध्याय, …ळा सोमवार, तुलसीमहात्म्य, सर्व प्रकारच्या आरत्या, …जारत्या वगैरे.
* रामरक्षा, रोज लागणारीं स्तोत्रें, लहान स्तोत्रें, मनाचे श्लोक, भूपाळ्या, सूर्यनमस्कार, पूजा, इंग्रजी मराठी महिने वगैरे.
* सर्व वर्षातील सण व व्रतांची माहिती.
* संतांचे निवडक अभंग, हरीपाठ, चिरंजीवपद व इतर पुष्कळ धार्मिक माहिती.
* संपूर्ण सचित्र कहाण्या.

किंमत फक्त दोन रुपये

पृष्ठें २५६ आवृत्ती चौथी आकर्षक कव्हर

आपल्या …हमीच्या पुस्तक विक्रेत्याकडे

अगर

---

दाभाऊ जोशी

पेठ ७८/८० जीवनजी महाराज पथ,

२ मुगभाट मुंबई ४

पुस्तक – बांधणी
जयभारत प्रिंटिंग प्रेस,
नाईकवाडी, शिवाजी पथ, ठाणें